-देवाच्या कळपाची काळजी घेण्यासाठी पाचारण केलेले-

# देवाच्या लोकांचे मेंढपाळ

## पोर्टेबल बाइबल शाळांसाठी २०० पाठ

संपादिका

थेल्मा ब्राउन

Called to Shepherd God's People

- 200 Class Outlines for Portable Bible Schools -

विलिसला,
ज्यांनी ज़ायरेमध्ये
पोर्टेबल बाइबल स्कूल मूवमेंटला जन्म दिला,
आणि आमच्या तीन प्रशंसनीय मुलांना,
तसेच त्यांना ज्यांनी अफ्रीकेमध्ये
आमच्या जीवन व सेवेमध्ये
सृजनात्मकतता आणि आनन्द आणला होता.

Marathi Version of:
Called to Shepherd God's People
- 200 Class Outlines for Portable Bible Schools
**Edited By Thelma Braun**

Copyright © AIDA, New Delhi, India, July 2011
Published By AIDA:
Association for International Discipleship Advancement

**Not for Sale. For Private Circulation Only**

–देवाच्या कळपाची काळजी घेण्यासाठी पाचारण केलेले–

# देवाच्या लोकांचे मेंढपाळ

## अनुक्रमणिका

प्रस्तावना ....................................................४

भाग १ – पवित्र शास्त्रातील पुस्तके ..................................५

भाग २ – पवित्र शास्त्राचे सिद्धान्त ................................ ३१

भाग ३ – उपदेशाचे तंत्र ...........................................६४

भाग ४ – कळपाची काळजी घेणे ...................................७७

भाग ५ – पवित्र जीवन ..........................................१०७

भाग ६ – डिनॉमिनेशनसंबंधी अभ्यास ..........................१२२

संदर्भग्रंथसूची ...................................................१२४

# प्रस्तावना

हे पुस्तक विशेष लोकांसाठी तयार करण्यात आलेले आहे – प्रभू येशू ख्रिस्ताच्या अश्या अनुयायांसाठी ज्यांनी सुवार्ताप्रसाराची सेवा खेड्यापाड्यांत तसेच शहरांतही करण्यासाठी प्रभू येशूने केलेले पाचारण स्वीकारले आहे अशा विश्‍वासणाऱ्यांसाठी. प्रभूने तुमच्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी तुम्ही सुसज्ज व्हावे म्हणून अभ्यास, कार्य व प्रार्थनाकरण्यासाठी आठ आठवड्यांचा हा कालावधी तुम्हीं निश्‍चित केलेला आहे. तुम्ही अतिशय विशेष लोक आहात.

दररोज पाच तास याप्रमाणे चाळीस दिवसांत अभ्यासण्यासाठी या पुस्तकामधे एकूण २०० पाठ आहेत. आठ आठवड्यांच्या ह्या अभ्यासासाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे असावे असे आम्हाला वाटते:

| | | |
|---|---|---|
| ८:०० – ८:५० | – | पवित्र शास्त्रातील पुस्तके |
| ८:५० – ९:४० | – | सिद्धान्त |
| ९:४० – १०:३० | – | उपदेशाचे तंत्र |
| १०:३० – १०:५० | – | मध्यांतर |
| १०:५० – ११:४० | – | कळपाची काळजी घेणे |
| ११:४० – १२:३० | – | पवित्र जीवन (पहिले चार आठवडे) ; डिनॉमिनेशनसंबंधी अभ्यास (नंतरचे चार आठवडे) |

दुपारी आणि संध्याकाळी पाठांचा अभ्यास करवा, वर्गातील विषयांस अनुसरून चर्चा करवी आणि फार महत्त्वाचे म्हणजे वर्गात जे काही शिकवले त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून आसपासच्या लोकांमध्ये सुवार्तेचा प्रचार करून माणसे धरणारे बनण्यास शिकावे. हे करता दिवसाचे फारच महत्त्वपूर्ण तास ठरतील.

एक सावधगिरीची सूचना देऊ द्या. काही पाठ खूप लांबलचक अथवा कठीण वाटतील, व त्यामुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना तेवढ्या एकाच तासिकेत ते पूर्णपणे समजणार नाहीत. त्यामुळे दुसऱ्या दिवशीदेखील तोच धडा शिकवावा अथवा शिकावा असे तुम्हांस वाटेल, पण २०० तासांपैकी प्रत्येक तासासाठी हे पाठ अतिशय काळजीपूर्वक तयार केलेले आहेत आणि या २०० तासांपैकी प्रत्येक तास हा महत्त्वाचा असल्यामुळे राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करता येणे अशक्य होणार; म्हणून जर एखादा पाठ अपूर्ण राहिला तर दुपारच्या वेळात तो पूर्ण करावा व दुसऱ्या दिवशी नव्या पाठाची तयारी करावी.

देवाच्या अद्‌भूत वचनाचा अभ्यास करण्यासाठी व त्याच्या गौरवी सेवेसाठी तयार होण्यासाठी ठरवलेले हे चाळीस दिवस तुमच्या आयुष्यातील अत्यंत सुरेख असे दिवस असतील. येथे तुम्ही जे काही शिकाल, त्याचा उपयोग हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर तुम्ही अनेक लोकांना ख्रिस्ताकडे आणण्सासाठी व ख्रिस्ताच्या अधिकाधिक सहभागितेत वाढवण्यासाठी कराल, अशी आमची प्रार्थना आहे.

# १ पवित्र शास्त्रातील पुस्तके

## —: प्रस्तावना :—

पवित्र शास्त्रातील ६६ पुस्तकांचा सांगोपांग अभ्यास करून ती पूर्णत: आत्मसात करण्यासाठी ८ आठवड्यांचा कालावधी अतिशय कमी आहे — खरे तर पृथ्वीवरील सर्वांत वृद्ध गृहस्थाचे आयुष्यही या अभ्यासासाठी कमी पडेल. पण या पुस्तकातील प्रत्येक पानामध्ये असलेल्या धनसंपदेची, आशीर्वादांची चव या दिवसांत घेता येईल व येथून व पुढील आयुष्यात या पुस्तकातील आशीर्वाद रोज—रोज शोधण्याची सवय तुम्हांला लागेल! देवाचे वचन सुज्ञपणे म्हणते, "देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर" (२ तीमथ्य २:१५). पवित्र शास्त्राची जितकी अधिक ओळख तुम्हांला होईल, तितके तुम्ही त्यावर — व त्याच्या लेखकावर — प्रेम कराल. आणि त्यामुळे तुमच्या जीवनात आणि सेवेत अनेक अकथित आशीर्वाद जोडले जातील.

या रूपरेषा तयार करताना पुढील तीन अत्यंत उपयोगी पुस्तकांची मदत घेतली गेली — हेन्रीएटा सी. मीयर्सचे "*व्हाट द बाइबल इज ऑल अबाउट*", जे. व्हर्नान मॅक्‌गी यांनी लिहिलेले "*ब्रिफिंग द बाइबल,*" आणि जॉन बॉल्चिन यांचे "द कोम्पेक्ट सर्वे ऑफ द बाइबल". या पुस्तकांतील कोणत्या एका पुस्तकाचा अधिक अभ्यास तुमच्यासाठी व तुम्ही करीत असलेल्या सेवेसाठी अंत्यंत लाभदायक होइल.

## —: विषय :—

### भाग पहिला

जुन्या करारातील पुस्तके ..... ६

### भाग दुसरा

नव्या करारातील पुस्तके ..... १९

# भाग पहिला
# जुन्या करारातील पुस्तके

## पाठ १ : प्रस्तावना

पवित्र शास्त्र बाइबल हे मानवासाठी देवाच्या इच्छेचे लिखित प्रकटीकरण आहे. येशू ख्रिस्ताद्वारे तारण हा त्याचा प्रमुख, मध्यवर्ती विषय आहे. पवित्र शास्त्रात ६६ पुस्तके आहेत साधारणत: १६०० वर्षांच्या कालखंडामध्ये एकूण ४० लेखकांनी ती लिहिली आहेत. जूना करार हा बहुतांश इब्री भाषेत लिहिला गेला, तर नवा करार ग्रीक भाषेत लिहिला गेला. पवित्र शास्त्राचे लेखक कोणी राजे, राजपुत्र, कवी, तत्वज्ञ, संदेष्टे तर कोणी प्रवक्ते व राजकीय अधिकारी होते. काही अतिशय उच्चविद्याविभुषित होते, तर काही अडाणी कोळी होते.

आपल्या या शाळेच्या पहिल्या महिन्यात आपण जुन्या कराराचा अभ्यास करू. यात एकूण ३९ पुस्तके असून त्यांची विषयवार वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे:

५ — नियमशास्त्र
१२ — इतिहास
५ — काव्य
१७ — संदेष्टे — ५ प्रमुख संदेष्टे व १२ कनिष्ठ संदेष्टे

पवित्र शास्त्र हा मानववंशाविषयी उपलब्ध असलेला सर्वांत मोठा दस्तावेज आहे. त्याचे वाचन केले पाहिजे, अभ्यास केला पहिजे, त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे व त्याचे आज्ञापालन केले पाहिले.

## पाठ २ : उत्पत्ती

पवित्र शास्त्रातील पहिली पाच पुस्तके मोशेने लिहिली असून त्यांना ग्रंथपंचक असे म्हणतात. “उत्पत्ती” या शब्दाचा अर्थ प्रारंभ, किंवा जन्म असा होतो. उत्पत्ती हे प्रारंभाविषयीचे पुस्तक आहे — जगाचा प्रारंभ, १:१—२५; मानववंशाचा प्रारंभ, १:२६—२७; जगातील पापाचा प्रारंभ, ३:१—७; उद्धाराविषयीचे अभिवचन, ३:८—२४; कौटुंबिक जीवनाचा प्रारंभ, ४: १—१५; मानवनिर्मित संस्कृतीचा प्रारंभ, ४:१६—९:२९; जगातील राष्ट्रांचा प्रारंभ, १०, ११; आणि इब्री वंशांचा प्रारंभ, १२—५०.

उत्पत्ती हा मानवाच्या अपयशाचा इतिहास आहे. त्याचा आरंभ “देवानें” होतो आणि शेवट “शवपेटींत” होतो. या पुस्तकाचे तीन प्रमुख भाग करू शकतो. त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे —

१. जगात पापाचा प्रवेश, अध्याय १–११
   १. निर्मिती, अध्याय १–२
   २. पतन, अध्याय ३–४
   ३. जलप्रलय, अध्याय ५–९
   ४. बाबेलचा बुरूज आणि भाषांमधील गोंधळ, अध्याय १०–११
२. येणाऱ्या उद्धारकासाठी तयारी
   १. अब्राहम, विश्वास ठेवणारा मनुष्य, अध्याय १२–२३
   २. इसहाक, आवडता पुत्र, अध्याय २४–२६
   ३. याकोब, देवाने प्रीती केलेला व देवाद्वारे शुद्ध केला गेलेला मनुष्य, अध्याय २७–३६
   ४. योसेफ, दु:खसहन करणारा व देवाशी विश्वासू राहणारा मनुष्य, अध्याय ३७–५०

## पाठ ३ : निर्गम

निर्गम – याचा अर्थ "बाहेर जाणे" आहे.

मिसर देशामध्ये जाणारे लोक फक्त ७० होते, पण मिसर देश सोडण्यापूर्वी त्यांचे ३० लक्ष लोकांचे मोठे राष्ट्र झाले होते. उत्पत्ती हे मानवाच्या पतनाविषयी सांगते; निर्गम हे सार्वभौम देवाच्या उद्धार करणाऱ्या कामाविषयी सांगते. या पुस्तकाची सुरुवात अंधार आणि निराशेने होते, तर अखेर गौरवाने होते।

निर्गमच्या १२ व्या अध्यायामध्ये वल्हांडणाचे रोमांचक वर्णन आहे. प्रभू येशू ख्रिस्ताच्या रक्तावर विश्वास ठेवण्याद्वारे मिळणाऱ्या आमच्या वैयक्तिक तारणाचे हे जुन्या करारातील अतिशय सुस्पष्ट चित्रण आहे. निर्गमच्या पुस्तकाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे–

१. देव मोशेची – सुटका करणाऱ्याची – जडणघडण करतो, अध्याय १–११
२. रक्त आणि सामर्थ्याद्वारे सुटका, अध्याय १२–१४
३. सीनाय पर्वताकडे जाणे, लोकांचे आध्यात्मिक शिक्षण, अध्याय १५–१८
४. नियमशास्त्र–आमचा अत्यंत पापीष्टपणा दाखवण्यासाठी देवाचा आरशा–देणे, अध्याय १९–२४
५. निवासमंडपाचा–देव आपल्या लोकांमध्ये राहतो याच्या दर्शकाचा–नकाशा आणि उभारणी, अध्याय २५–४०.

## पाठ ४ : लेवीय, गणना अणि अनुवाद

लेवीय – हे इस्राएल लोकांच्या धार्मिक प्रशिक्षणामध्ये सहायता देण्यासाठी दिलेले देवाचे चित्रमय पुस्तक आहे. यातील प्रत्येक चित्र हे येशू ख्रिस्ताच्या कार्याकडे संकेत करते. याला

'बलीदानाचे पुस्तक' असे म्हटले आहे. "आपली वर्तणूक सुधारा" किंवा "पश्चाताप करा" असा अर्पणांचा संदेश आहे, अशी पाप प्रकारची अर्पणे आहेत होमार्पणें, अन्नार्पणें, शांत्यर्पणें, पापार्पणें आणि दोषार्पणें। "सरळपणे वागा" असे सण व पवित्र मेळे सांगतात. असे आठ सण—पवित्र मेळे—आहेत: शब्बाथ, वल्हांडण, पेन्टेकॉस्ट अथवा पन्नासाव्या दिवसाचा सण, रणशिगांचा सण, प्रायश्चित्ताचा सण, मांडवांचा सण, शब्बाथवर्ष आणि योबेलवर्ष. अर्पणे तारण देणाऱ्या रक्ताचा निर्देश करतात तर उत्सव, सण हे स्वर्गीय, आध्यात्मिक अन्नाचें रूपक आहेत.

गणना — हे सीनायपासून कनान देशाच्या सीमेपर्यंत अरण्यात केलेल्या प्रवासाचे पुस्तक आहे. कनान हा परमेश्वरने दिलेला वचनदत्त देश आहे. कुरकुरीचे पुस्तक असेही या पुस्तकाला म्हणता येईल. शिस्त हा या पुस्तकाचा प्रमुख विषय आहे. या पुस्तकात विश्वासणाऱ्याच्या चालचलणुकीचा, वर्तनक्रमाचा उहापोह केला आहे.

अध्याय २ ते १० मध्ये दैवी नियम — कायदेकानून सांगितले आहेत.

अध्याय ११ ते २० मध्ये देशाच्या अपयशाविषयी — पतनाविषयी — सांगितले आहे.

अध्याय २१ ते ३६ मध्ये इस्राएल लोक देवाच्या इच्छेनुरूप वागू लागले व अरण्यात त्यांनी अंतिम विजय कसा मिळवला याचे वर्णन आहे.

मोशे, अहरोन, मिर्याम, यहोशवा आणि कालेब हे या पुस्तकातील प्रमुख व्यक्ती आहेत.

अनुवाद — हे आठणींचा, स्मृतींचा संग्रह आहे. आपल्या मृत्युपूर्वी मोशेने इस्राएलचा निरोप घेतांना केलेल्या भाषाणांचा व गाण्यांचा यात संग्रह आहे. आज्ञापालनामूळे मिळणारे आशीर्वाद आणि आज्ञाभंगामुळे मिळणाऱ्या शापांचे वर्णन यात आहे. मोशेसाठी विलाप करण्याच्या एका महिन्याच्या कालावधीसह दोन महिन्यांच्या कालखंडाविषयी या पुस्तकात विचार केलेला आहे. येशूने अनेक वेळा अनुवादाच्या पुस्तकातून संदर्भ दिले आहेत. सैतानाला त्याने याच पुस्तकातून उत्तरे दिलीं. पृथ्वीवर स्वर्ग अनुभवण्याच्या आनंदाची झलक अनुवादाचे पुस्तक आपल्याला देते.

*उजळणी : उत्पत्तीच्या पुस्तकात आपण माणसाचे पतन झाल्याचे पाहतो; निर्गममध्ये मानवाचा उद्धार; लेवीयमध्ये आराधना करणारा मनुष्य; गणनामध्ये सेवा करणारा मनुष्य आणि अनुवादमध्ये आज्ञापालन करण्यास शिकणारा मनुष्य आपण पाहतो.*

## पाठ ५ : यहोशवा, शास्ते आणि रूथ

यहोशवा — ह्या पुस्तकाने इतिहासाच्या पुस्तकांची सुरुवात होते. आध्यात्मिक सत्य, उत्तेजना आणि सुज्ञपणा यांनी ते ओतप्रोत भरलेले आहे. मोशे मरण पावला होता, पण पुढे जाणे अवश्यच होते. मोशेने सुरू केलेले कार्य यहोशवा पूर्णत्वास नेतो. या महान नेत्याविषयी असलेल्या पुस्तकाचे दोन भाग पडतात:

१. वचनदत्त देश जिकून घेणे, अध्याय १–१२

२. वचनदत्त देशामध्ये वस्ती करणे, अध्याय १३–२४.

शास्ते – या पुस्तकात इस्राएल लोकांच्या अंधारयुगाची हकीकत सांगितलेली आहे. लोकांनी देवाला सोडले (शास्ते २:१३) आणि देवाने लोकांना सोडले (२:२३). इस्राएल लोकांचा महान पुढारी यहोशवा याच्या मृत्युपासून ते शौल इस्राएलचा राजा ठरवला गेला, येथपर्यंतच्या कालखंडाचे वर्णन शास्ते या पुस्तकात केले आहे. वचनदत्त देशातींल पहिली ३५० वर्षें इस्राएलचा कोणी राजा नव्हता. "ज्याला जसे बरे दिसे तसे तो करी," हे वाक्य या पुस्तकात पुन: पुन: लिहिले आहे. मनुष्याचे सतत होणारे पतन, अपयश आणि देवाची सततची दया ही या पुस्तकात दिसते. सात वेळा धर्मभ्रष्टता, सात विदेशी राष्ट्रांची सात वेळा गुलामगिरी आणि सात वेळा सुटका अशी या पुस्तकाची थोडक्यात रूपरेषा सांगता येईल.

रुथ – हे पुस्तक आपणांस आपल्या आप्त–उद्धारक येशू ख्रिस्ताविषयी सांगते. हे शास्तेच्या अंधाऱ्या पार्श्वभूमीवर एक तेजस्वी चित्र असून यात येशू ख्रिस्त व मंडळी यांचे अतिशय सुंदर चित्रण केलेले आहे. या पुस्तकात नोंद केलेली घटना गिदोन किंवा इफ्ताहच्या शासनकालातील आहे. रूथ ही येशू ख्रिस्ताचा पूर्वज दावीद याची पणजी होती. मशीहाच्या वंशाची आणि ज्या देशात मशीहा जन्मणार होता त्या देशाच्या सुरूवातीविषयीं या पुस्तकात लिहिले आहे. रूथ ही मवाबी स्त्री होती, मवाबी लोक हे लोटाचे वंशज होते. ते विदेशी होते. विदेशांना ख्रिस्ताच्या कुटुंबात आणणाऱ्या देवाच्या कृपेचे हे फार सुंदर चित्रण आहे.

## पाठ ६ : पहिले आणि दुसरे शमुवेल

पहिले शमुवेल – हे राजांविषयीच्या सहा पुस्तकांपैकी पहिले पुस्तक आहे. शमुवेल, राजे आणि इतिहास यांची प्रत्येकी दोन पुस्तकें आहेत. शमुवेलाच्या जन्मापासून शौलाच्या संकटग्रस्त काळाविषयी आणि दावीदाच्या राज्याची सुरुवात येथपर्यंतचा ११५ वर्षांचा कालखंड या पुस्तकात नमूद केलेला आहे. या पुस्तकातील तीन प्रमुख व्यक्ती वरून या पुस्तकाची तीन भागात विभागणी करता येते:

१. शमुवेल, देवाचा संदेष्टा, अध्याय १–७.

२. शौल, देवाचा आज्ञाभंग करणारा अपयशी राजा, अध्याय ८–१५.

३. दावीद, देवाचा मनुष्य, अध्याय १६–३१

दुसरे शमुवेल — मनुष्यांचा राजा शौल याच्या अध:पतनाचे वर्णन पहिले शमुवेल या पुस्तकात केले आहे. दुसऱ्या शमुवेलमध्ये, देवाच्या इच्छेनुरूप चालणारा राजा दावीद ह्याचे सत्ताधीश होणे व ज्या घराण्यातून मशीहा येणार त्या दावीदाच्या घराण्याची स्थापना यांचे वर्णन आहे. दावीद हा देवाच्या मनाप्रमाणे चालणारा राजा होता, देवाच्या इच्छेप्रमाणे चालणारा राजा होता — तो परिपूर्ण नव्हता, पण पतन झाल्यावर पश्चात्ताप करणारा होता. तो अष्टपैलू

होता — मेंढरे राखणारा युवक, राजदरबारातील संगीतकार, सैनिक, खरा मित्र, पदभ्रष्ट नेता, राजा, महान सेनानी, प्रेमळ पिता, कवी, पापी आणि भग्नहृदयी वृद्ध पण नेहमीच देवावर प्रीती करणारा गृहस्थ होता. या पुस्तकाचे दोन भाग पडतात:

१. दावीदाचें विजय, अध्याय १—१०.
२. दावीदावर आलेली संकटे, अध्याय ११—२४

## पाठ ७ : पहिले आणि दुसरे राजे

ही पुस्तके १ व २ शमुवेल या पुस्तकांचा पुढचा भाग आहे. ४०० वर्षांच्या काळाचे वर्णन त्यांच्यामध्ये केले आहे. हे पुस्तक राज्याची वाढ, त्याचा ऱ्हास आणि विभागणी याविषयी सांगते. यहूदा या दक्षिणेकडील राज्यात २० राजे झाले व उत्तरेकडील इस्राएल राज्यात १९ राजे झाले. यहूदा आणि इस्राएल या दोन्ही राज्यांचा पाडाव होऊन त्यांना बंदीवासात जावे लागले. १ राजेमध्ये न्यायी आणि कठोर संदेष्टा एलीया व २ राजेमध्ये दयाळू आणि कृपाळू संदेष्टा अलीशा असे दोघेजण या काळात देवाचा प्रभावी आवाज म्हणून होऊन गेले. या दोन पुस्तकांची महत्त्वपूर्ण विभागणी पुढीलप्रमाणे आहे:

१. दाविदाचा मृत्यु, १ राजे १—२
२. शलमोनाच्या राज्याचे वैभव, १ राजे ३—११
३. राज्यांचीं विभागणी, १ राजे १२—२ राजे १६
४. अश्शूर इस्राएलाला बंदीवान करतो, २ राजे १७
५. यहूदाच्या राज्याचा ऱ्हास आणि बाबेलमधील बंदीवास, २ राजे १८—२५

## पाठ ८ : पहिले आणि दूसरे इतिहास

१ व २ इतिहासमध्ये राजे या पुस्तकांत सांगितलेल्या घटना निराळ्या दृष्टीकोनातून लिहिल्या आहेत. राजेमध्ये राजसत्तेच्या दृष्टीकोनातून राष्ट्राचा इतिहास लिहिला आहे, तर इतिहासमध्ये तो परमेश्वराच्या दृष्टीकोनातून लिहिला आहे. राजेमध्ये राजवाडा हा, तर इतिहासमध्ये देवाचे मंदिर हा केंद्रबिंदू आहे. राजेमध्ये राजकीय तर इतिहासमध्ये धार्मिक इतिहास सांगितला आहे. राजेमध्ये मानवाचा दृष्टीकोन, तर १ व २ इतिहासमध्ये देवाचा दृष्टीकोन आपल्याला दिसतो. २ इतिहासमध्ये ५ महान संजीवने सांगितली आहेत : आसाच्या कारकिर्दीत, अध्याय १५; यहोशाफाटाच्या कारकीर्दीत, अध्याय २०; योवाशाच्या कारकीर्दीत, अध्याय २३, २४; हिज्कीयाच्या कारकीर्दीत, अध्याय २९—३१; आणि योशीयाच्या कारकिर्दीत, अध्याय ३५.

पहिल्या इतिहासाची रूपरेखा पुढीलप्रमाणे आहे:

१. वंशावळया, अध्याय १—९

२. शौलाची कारकीर्द, अध्याय १०

३. दावीदाची कारकीर्द, अध्याय ११—२९

दूसऱ्या इतिहासची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे:

१. शलमोनाची कारकीर्द, अध्याय १—९

२. राज्याची विभागणी आणि यहूदाचा इतिहास, अध्याय १०—३६

## पाठ ९ : एज्रा, नहेम्या आणि एस्तेर

एज्रा व नहेम्यामध्ये देवाच्या निवडलेल्या लोकांचे बाबेलच्या बंदीवासातून पुन्हा परतणे याविषयी लिहिले आहे. एज्रा याजक होता. नहेम्या हा अदीक्षित पुढारी होता. इस्राएल लोकांचे पहिले निर्गमन मोशेच्या नेतृत्वाखाली मिसर देशातून झाले; दुसरे निर्गमन एज्राच्या नेतृत्वाखाली बाबेलमधून झाले. काही यहूदी अगोदरच परत आले होते आणि जेव्हा एज्रा परत आला, तेव्हा त्याला त्याच्या अपेक्षेपेक्षाही अधिक वाईट परिस्थिती आढळली. यहूदी लोकांनी विदेशी लोकांशी विवाहसंबंध जोडले होते आणि विदेश्यांप्रमाणेच ते आचरण करीत होते (९:१—४). एज्राला खूप दु:ख झाले (९:५—१५). मग लोक त्याच्याभोवती जमा झाले आणि त्यांना त्यांच्यां पापांच्यां भयानकतेची जाणीव झाली (१०:१—४४). एज्रा ताबडतोब त्यांना देवाबरोबर पवित्र करार करावयास लावतो.

एज्रानंतर तेरा वर्षांनी नहेम्या इस्राएलला आला. तो यरुशलेमचा कोट बांधण्यासाठी पारसाच्या राजाची परवानगी घेऊन आला. तो खरा स्थापत्य अभियंता होता आणि खूप विरोध असतांनाही ५२ दिवसांत त्याने काम पूर्ण केले.

दोन्ही पुस्तकांची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे:

१. जरुब्बाबेलच्या नेतृत्वाखाली बाबेलमधून परतणे, एज्रा १—६.

२. एज्राच्या नेतृत्वाखाली बाबेलमधून परतणे, एज्रा ७—१०

३. यरुशेलमच्या कोटाची उभारणी करणे, नहेम्या १—७

४. संजीवन आणि पुन: स्थापना — सुधारणा, नहेम्या ८—१३.

एस्तेर — या सुंदर पुस्तकामध्ये देवाचे नाव लिहिलेले नाहीं, पण प्रत्येक पानात देवाचे अस्तित्व व प्रत्येक शब्दामधून त्याची समक्षता जाणवते. देवाद्वारे होणारी तरतूद, याविषयी आपणांस या पुस्तकात शिकायला मिळते. या विश्वाचे नियंत्रण देवाच्या हाती आहे. या पुस्तकातील सर्व घटना तीन सणांभोवती, मेजवान्यांभोवती केंद्रीत झाल्या आहेत:

१. पारसाचा राजा अहश्वेरोश याने दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगी वश्तीचे राणीपद काढून घेण्यात आले व त्यामुळे एस्तेरला राणी बनण्यासाठी मर्दखयला संधी मिळाली. एस्तेर ही अनाथ असून मर्दखयाने तिचा सांभाळ केला होता. अध्याय १ व २.

२. एस्तेरने दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगी, इस्राएलचा शत्रू हामान याला मृत्युदंडाची शिक्षा फर्मावण्यात आली व त्याच्या जागी मर्दखयाची नेमणूक झाली, अध्याय ७.
३. भयंकर संकटातून सुटका झाल्याबद्दल इस्राएल लोकांनी आनंदोत्सव केला व पुरीमच्या सणाच्या वेळी मेजवान्या केल्या, अध्याय ९.

## पाठ १० : ईयोब

ईयोब – हे कवितेच्या पाच पुस्तकांपैकी पहिले पुस्तक आहे. अंतःकरणाला आलेल्या अनुभवांचे वर्णन ही पुस्तके करतात. पवित्र शास्त्रातील हे कदाचित् सर्वांत जुने पुस्तक आहे. "धार्मिकांस क्लेश, दुःखे का होतात?" या प्रश्नाला देवाचे काय उत्तर आहे, हे या पुस्तकात आढळते. या पुस्तकाचा आरंभ स्वर्गातील एका दृश्याद्वारे होतो, आणि नंतर संपन्न ईयोबाच्या विपन्नावस्थेविषयी लिहिले आहे. त्यानंतर ईयोब व त्याच्या मित्रांमधील मोठ्यामोठ्या, लांबलचक चर्चांचे निवेदन आहे.

१. स्वर्गातील दृश्याद्वारे पुस्तकाची सुरूवात होते. १:१–१२, २:१–६, त्यानंतर,
२. ईयोबाचे संपन्नवस्थेतून विपन्नवस्थेत पतन, १:१३–२२; २:७–१०, नंतर,
३. अलीफज, बिल्दद, सोफर आणि अलीहू या ईयोबाच्या तीन मित्रांशी संभाषण व चर्चा २:११–३७:२४ आणि अखेरीस,
४. ३८–४२ या अध्यायांत जेव्हा देव बोलतो तेव्हा या पुस्तकाचा परमोच्च बिंदू गाठला जातो. यहोवा परमेश्वर ईयोबाला समजावून सांगतो की, जेव्हा मनुष्य देवाला पाहतात तेव्हा नेहमीच काहीतरी घडते. धार्मिक लोकांना आत्मपरीक्षण करता यावे म्हणून त्यांना दुःखसहन करावे लागते, त्यानंतर देव त्यांना दुःखमुक्त करतो. देवाजवळ सर्व दुःखांसंबंधी सुज्ञ हेतू असतो. अग्नीने सोन्याची परीक्षा करावी, तसे तो धार्मिकास पारखतो.

## पाठ ११ : स्तोत्रसंहिता

स्तोत्रसंहिता – हे भक्ती, प्रार्थना आणि स्तुतीचे पुस्तक आहे. स्तोत्रे देवाचे गौरव व स्तुती करतात. प्रत्येक मानवी अनुभव, अनुभूती ही देवाशी संबंधित आहे. आनंद व दुःख, विजय आणि पराजय यांनी भरलेत्या विश्वासणाऱ्याच्या जीवनाचे चित्रण यांत केले आहे, स्तोत्रे ख्रिस्ताविषयी सांगतात. त्याचे दुःखसहन आणि मरण यांवषयी त्यात सविस्तर सांगितले आहे. मोशेच्या ग्रंथपंचकांची तुलना करुन कोणीतरी स्तोत्रसंहितेची रूपरेषा सांगितली आहे:

१. उत्पत्ति, स्तोत्र १–४१, मनुष्याची आशीर्वादित, सुखमय स्थिती आणि नंतर त्याचे पतन, सुधारणा व पश्चात्ताप.

२. निर्गम, स्तोत्र ४२—७२, इस्राएलाचा नाश आणि उद्धाराचे चित्रण.
३. लेवीय, स्तोत्र ७३—८९, अंधारात आणि प्रकाशत, दुःखात आणि सुखात दोन्ही प्रसंगी आमचा आश्रय देव आहे हे सांगितले आहे.
४. गणना, स्तोत्र ९०—१०६, पृथ्वी, तीवरील संकटे आणि संरक्षण यावर लक्ष केंद्रीत केले आहे.
५. अनुवाद, स्तोत्र १०७—१५०, या स्तोत्रांमध्ये देवाच्या वचनाची परिपूर्णता आणि स्तुती दिसून येते.

## पाठ १२ : नीतिसूत्रें, उपदेशक आणि गीतरत्न

नितिसूत्रें — शलमोन हा महान राजा होता. तो त्याच्या ज्ञानासाठी आणि संपत्तीसाठी प्रसिद्ध होता. त्याने ३,००० स्तोत्रें आणि १,००५ गीतें लिहिलीं (१ राजे ४:३१,३२). शलमोन हा तत्वज्ञानी, शास्त्रज्ञ, मंदिराचा अभियंता, स्थापत्यविशारद आणि राजा होता. त्याने बांधलेले मंदिर हे त्या काळी जगातील महान आश्चर्यांपैकी एक होते. नीतिसूत्रें हे सुज्ञतेने, ज्ञानाने भरलेले पुस्तक आहे. त्याची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल.

१. तरुणांना सल्लामसलत व उपदेश, अध्याय १—१०.
२. सर्वमनुष्यांसाठी सल्ला, अध्याय ११—२०.
३. राजे आणि अधिपतींसाठी उपदेश, अध्याय २१—३१.

उपदेशक — ह्या पुस्तकात मानवी विचारांमुळे आणि निसर्गवादामुळे जीवनाचा जो अर्थ आणि उद्देश समजला आहे, त्याचे वर्णन, नोंद आहे. या पुस्तकातील विधाने व वादविवाद हे देवाचे नाहीत, तर मानवाच्या वादांचे व सकल्पनांचे देवाने केलेले संकलन आहे. या पुस्तकाचा लेखक शलमोन आहे. त्याने देवाची सहभागिता सोडल्यानंतर त्याला जे अनुभव आले त्यांचे वर्णन असणारे हे त्याचे नाट्यपूर्ण आत्मचरित्र आहे. शलमोन शहाणा, सुज्ञ होता, पण तो शहाणपणाने वागला नाही. आपल्या स्वतःच्या शहाणपणाचे अनुसरण तो करू शकला नाही.

“व्यर्थ” आणि “भूतलावर” हे या पुस्तकातील प्रमुख शब्द आहेत.

गीतरत्न — या पुस्तकास ख्रिस्ती व्यक्तीचे प्रेमगीत असे म्हटले जाते. या पुस्तकातून चार महत्त्वाचे अर्थ निघू शकतात:

१. ते वैवाहित प्रेमाचे गौरव दाखवते.
२. ते यहोवाची इस्राएलवरील प्रीती दाखवते.
३. ते ख्रिस्त आणि मंडळीचे चित्र आहे.
४. ते विश्वासणाऱ्याचा ख्रिस्ताशी असणारा वैयक्तिक संबंध दाखवते.

ख्रिस्तावरील वैयक्तिक प्रेम वाढावे ही मंडळीची आजची गरज आहे.

## पाठ १३ : यशया

हे भविष्यविषयक १७ पुस्तकांपैकी पहिले पुस्तक आहे. संदेष्टे हे इस्राएलाच्या अंधारयुगाच्या काळात देवाने ज्यांना निवडले, वाढवले व मार्गदर्शन केले अशे लोग होते. ते त्या काळातील सुवार्तिक होते. संदेष्टांचा काळ ख्रिस्तपूर्व ९ व्या शतकापासून ख्रिस्तपूर्व ४ थ्या शतकापर्यंतची ५०० वर्षे होता. राजे आणि लोकांच्या पापांविषयी, पतनाविषयी व अपयशाविषयी हे संदेष्टे सारखेच निर्भीडपणे बोलत असत. यशयाच्या पुस्तकात दोन महत्त्वपूर्ण गोष्टींवर जोर दिलेला आहे. पहिल्या भागात संदेष्टा इस्राएलाचे चित्रण करतो, तर येशू ख्रिस्त मानवाचा पापभार घेतो व नंतर त्याला उंच केले जाते आणि त्याचे गौरव केले जाते हे दुसऱ्या भागात सांगितले आहे.

यशया हे पवित्र शास्त्राची छोटीशी प्रतिकृती आहे. पवित्र शास्त्रात ६६ पुस्तके आहेत, त्याचप्रमाणे या पुस्तकात ६६ अध्याय आहेत. पवित्र शास्त्राचे दोन भाग आहेत, तसेच याचेही दोन भाग पडतात. जुन्या करारात ३९ पुस्तके आहेत, त्याप्रमाणे या पुस्तकाच्या पहिल्या भागात ३९ अध्याय आहेत. आणि नव्या कराराप्रमाणे याच्या दुसऱ्या भागात २७ अध्याय आहेत. “यशयाकृत शुभवर्तमान” असे या पुस्तकाला म्हटले जाते. कुमारीच्या पोटी ख्रिस्ताचा जन्म, त्याचे व्यक्तीमत्व, त्याचे जीवन, त्याचा मृत्यु, त्याचे पुनरुत्थान आणि त्याचे द्वितीयागमन हे यामध्ये निश्चित आणि नि:संदिग्ध भाषेत सांगितले आहे.

## पाठ १४ : यिर्मया आणि विलापगीत

यिर्मया — यिर्मयाला “रडणारा संदेष्टा” म्हटले जाते. जो संदेश देण्यासाठी त्याला पाचारण करण्यात आले होते, त्यामुळे त्याचेच हृदय विदीर्ण झाले. त्याने दिलेला संदेश हा लोकांसाठी सर्वांत अप्रिय संदेश होता. इस्राएल लोकांनी बाबेलला शरण जावे हे त्याने सांगितले म्हणून त्याला फितूर म्हटले गेले (३८:१७—२३). लोकांसाठी फक्त शरणागती हा एकच मार्ग उरला होता. दानीएलाच्या दृष्टान्तातील पुतळयाचे सोन्याचे शरीर असलेल्या बाबेलसोबतच विदेश्यांचा काळ सुरू झाला होता.

यिर्मयाने बोबेलमधील ७० वर्षांच्या बंदीवासाचे भविष्य केले (२५:९—१२). तरीदेखील अंधारापलीकडील प्रकाश त्याने जाणला. उज्ज्वल व सुखी भविष्याविषयी त्याच्याइतके आग्रहाने कोणीच सांगितले नाही (२३:३—८; ३०; ३१; ३३:१५—२२). यिर्मयाने जशे देवाने सांगितले त्यानुसार अनेक वेळा वस्तुनिष्ठ पाठांच्या मदतीने लोकांना शिकवले. त्याचा संदेश लोकांना आवडला नाही, एवढेच नव्हे तर त्यांनी त्या संदेशाचा स्वीकारही केला नाही. त्याच्या शत्रूंनी त्याला ठार मारावे असा आग्रह त्यांनी धरला.

विलापगीत — हे पुस्तक यिर्मयाने लिहिले असे समजले जाते. हा अत्यंत उत्कृष्ट अशा पाच कवितांचा संग्रह आहे. त्यामध्ये फक्त दु:खाचेच वर्णन नाही, लोकांच्या पापांसाठी कवी

अश्रू ढाळतो, त्या अश्रूंच्या ढगांमध्ये देवाचा सूर्य अद्यापही प्रकाशत असलेला दिसतो, ३:२२—२७ वाचा.

## पाठ १५ : यहेज्केल

यहेज्केल हा इस्राएल लोक बाबेलमध्ये बंदीवासात होते त्या काळातील संदेष्टा होता. लवकरच पॅलेस्ताईनला परत जायला मिळेल ही इस्राएली लोकांची आशा निरर्थक आहे हे त्याने पटवून देण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या परमप्रिय यरुशलेमच्या दु:खद नाशाविषयी त्यांची मने तयार केली.

इतर संदेष्ट्यांपेक्षा त्याचा संदेश अधिक आध्यात्मिक स्वरूपाचा होता, कारण व्यक्तीश: देवाशी त्याचा संबध होता. राष्ट्राच्या अत्यंत दु:खद, कठीण, अंधकारमय काळामध्ये त्याने संदेश दिले. लोक त्याच्याकडे लक्ष देत नसत व त्याचे संदेश ऐकत नसत, म्हणून त्याने एक नविन पद्धत वापरली. लोकांशी दृष्टान्तरूपाने बोलण्याऐवजी तो त्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवू लागला (२४:२४). यहेज्केल हा देवाच्या गौरवाचा संदेष्टा आहे. या पुस्तकाचा थोडक्यात गोषवारा असा — यरुशलेमच्या नाशाविषयी हे पुस्तक सांगते.

१. बंदिवासापूर्वीचा काळ, अध्याय १—२४. यरुशलेमचा नाश होण्याअगोदर सहा वर्षे यहेज्केलाने त्याविषयी सांगण्यास सुरुवात केली व ही घटना होईपर्यंत तो त्याविषयी दृढपणे बोलत राहिला.
२. बंदीवास, अध्याय २५—३२. त्यानंतरचे त्याचे संदेश हे यहूदाच्या शत्रूंविषयी व त्या राष्ट्राच्या पाडावाविषयी आहेत.
३. बंदीवासानंतर, अध्याय ३३—४८. यहूदाची सुटका व त्याची पुन:स्थापना याविषयी अखेरीस सांगितले आहे.

## पाठ १६ : दानीएल

दानीएलाला स्वप्ने पाहणारा संदेष्टा असे म्हटले आहे, कारण देव त्याच्याशी स्वप्नांद्वारे बोलून आपली रहस्ये प्रगट करीत असे. अतिशय दूरवरचा भविष्यकाळ त्याने पहिला व प्रकटीकरणामध्ये त्याचे जास्तीत जास्त संदर्भ आहेत. त्याने सत्तर वर्षे सेवा केली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याला पकडून बाबेलमध्ये कैदी म्हणून नेले आणि तो ९० वर्षे जगला. आणि जरी तो कैदी होता, तरी बाबेलच्या पंतप्रधानपदापर्यंत तो चढला. तो यहोवा देवाशी नेहमी एकनिष्ठ व विश्वासू रहिला.

या पुस्तकाची रूपरेषा पुठीलप्रमाणे आहे:

१. दानीएलाचे खाजगी जीवन, १:२—३

२. दानीएलाचे सार्वजनिक जीवन — विदेश्यांच्या काळाचे चित्रण, ४:७:२८.

३. त्याला झालेले दृष्टान्त — देशाचा भविष्यात्मक इतिहास, ८—१२.

## पाठ १७ — होशेय, योएल आणि आमोस

होशेय — हे सामान्य, छोटे संदेष्टे म्हटले जाणाऱ्या १२ पुस्तकांपैकी पहिले पुस्तक आहे. या पुस्तकांतील मजकूर कमी असल्यामुळे त्यांना लहान संदेष्टे म्हटले आहे. होशेय या नावाचा अर्थ "तारण" आहे. त्याला उत्तरेकडील राज्याचा यिर्मया म्हटले जाते. हा एक साधारण मनुष्य होता ज्याला देवाने देवापासून भटकलेल्या इस्राएल लोकांवर देव प्रीती करतो हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यासाठी पाचारण केले होते.

देवाने त्याला सांगितले, वेश्येशी लग्न कर. तिच्यापासून त्याला दोन मुले आणि एक मुलगी झाली. त्यांतर तिने आपला वेश्याव्यवसाय पुन्हा सुरू केला आणि होशेयने तिला घराबाहेर काठले. पण तिला पुन्हा घरात घेऊन तिच्यावर प्रेम कर अशी आज्ञा देवाने त्याला दिली. याचा अर्थ हाच की इस्राएल राष्ट्र देवाशी विश्‍वासूपणे राहिले नाही, पण देव त्यावर अद्यापही प्रेम करतो व तो त्या लोकांना आपल्या मायदेशी पुन्हा आणील.

होशेयची रूपरेषा:

१. संदेष्टा आणि त्याची अविश्‍वासू पत्नी, गोमर — अध्याय १—३.

२. देव आणि अविश्‍वासू राष्ट्र, इस्राएल — अध्याय ४—१४.

योएल — हा यहूदातील संदेष्टा होता. टोळधाडीच्या भयंकर काळात त्याने आपला संदेश लिहिला. या टोळधाडीची तुलना त्याने भावी न्यायाशी केली. न्यायदिनाविषयीचा संदर्भ देतांना त्याने "प्रभूचा दिवस" हा शब्दप्रयोग पाच वेळा केला आहे.

आध्यात्मिक सुटका हे योएल या पुस्तकाचे मध्यवर्ती अभिवचन आहे. सर्व मानवजातीवर देव आपल्या आत्म्याचा वर्षाव करील हे सांगण्याचा बहुमान योएलला मिळाला (२:२८). पेन्टेकॉस्टच्या दिवशी याची पूर्तता झाली (प्रे.कृ. २:१६).

आमोस — हा गुराखी होता आणि त्याचे संदेश मुख्यत: उत्तरेकडील राज्याला उद्देशून होते. तो देवाला इतका भीत होता की, इतरांची त्याला अजिबात भीती वाटत नसे. शेजारच्या सहा राष्ट्रांवर देवाचा न्याय ओढवणार आहे, असे सांगून त्याने आपला संदेश सांगणे सुरू केले. नंतर यहूदा आणि इस्राएल यांच्याविरुद्ध संदेश सांगण्यास त्याने सुरुवात केली.

## पाठ १८ : ओबद्या, योना आणि मीखा

ओबद्या — हे जुन्या करारातील सर्वांत लहान पुस्तक आहे — फक्त १ पान, २१ वचने! पण आजही हे पुस्तक आपल्यासाठी उपयुक्त व महत्त्वपूर्ण आहे. अदोमाविरुद्धच्या न्यायाविषयीचा

संदेश या पुस्तकात आहे. या पुस्तकात दोन महत्त्वाचे विषय आहेत: (१) गर्विष्ठ आणि बंडखोरांचा नाश आणि (२) दीन व नम्र जनांची सुटका. अदोमी हे एसावाचे वंशज होते. एसावाने आपले ज्येष्ठत्व धिक्कारले होते. अदोम हा इस्राएलाचा शत्रू राहिला. ओबद्याने संदेश दिल्यानुसार अदोमाचा नाश झाला.

इतर संदेष्ट्यांप्रमाणेच ओबद्यानेही प्रभूचा दिवस येणार आहे आणि मशीहाचे राज्य स्थापित केले जाईल हे सांगितले.

योना – योना संदेष्टा होता पण योनाच्या पुस्तकात भविष्यवाणी वा संदेश नाही. योनाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनेचे वर्णन या पुस्तकात केले आहे. जगाच्या इतिहासातील अतिशय महत्त्वपूर्ण घटनेचे म्हणजे येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे दर्शक अशी ही घटना होती. या पुस्तकात, देवाने चार गोष्टी तयार केल्या : (१) मोठा मासा – १:१७, (२) तुंबीचा वेल – ४:६, (३) किडा – ४:७, आणि (४) पूर्वेचा झळईचा वारा – ४:८. देव आपल्या संदेष्ट्याची काळजी घेत होता!

अतिशय महत्त्वाच्या अशा दोन घटना या पुस्तकात आहेत : (१) प्रचंड मासा योनाला गिळतो आणि (२) एक अप्रसिद्ध परदेशी मिशनऱ्याच्या कार्यामुळे अतिशय थोड्या दिवसांत निनवेसारख्या मोठ्या शहराचे परिवर्तन होते.

या पुस्तकात आपण दोन गोष्टी लक्षात घ्याव्यात. पहिली: योना हा ख्रिस्ताच्या मरणाचे, पुरले जाण्याचे व पुनरुथानाचे चिन्ह आहे. दूसरी: योना हा इस्राएल राष्ट्राचे दर्शक आहे – इस्राएल राष्ट्राने परमेश्वराच्या आज्ञांचे पालन न केल्यामुळे या राष्ट्राला जगातल्या राष्ट्रांनी गिळून टाकले आहे, जे ख्रिस्ताच्या पुन: येण्यावर त्याला ओकून टाकतील. तेव्हा इस्राएल सर्वत्र देवाचे साक्षीदार होईल.

मीखा – ह्याने यरुशलेमचा व इस्राएलमधील इतर शहरांचा न्याय होईल असा संदेश दिला. तसेच त्याने आशेचाही संदेश दिला. दु:ख आणि शिक्षेच्या पलीकडे, ख्रिस्ताच्या राज्यातील गौरवाकडे त्याचे लक्ष होते – मशीहा येईल (४:८), त्याचा जन्म बेथलेहेमात होईल (५:२–४).

मीखाच्या तीन संदेशांमधून संकटाचा इशारा मिळतो. प्रत्येक संदेशाची सुरुवात “ऐका” या शब्दाने होते.

१. पहिला संदेश (१:२), हा सर्व लोकांना उद्देशून होता.
२. दूसरा संदेश (३:१), हा इस्राएलच्या पुढाऱ्यांना उद्देशून होता.
३. तिसरा संदेश (६:१), हा इस्राएल लोकांनी पश्चात्ताप करून देवाकडे वळावे म्हणून केलेली विनवणी आहे.

## पाठ १९ : नहूम, हबक्कूक आणि सफन्या

नहूम – योनाने ज्या निनवे शहराला इशारा देऊन सावध केले होते, त्या शहराचा नाश, हा नहूम या पुस्तकाचा विषय आहे. योनाच्या काळी जे संजीवन झाले त्यानंतर सधारणतः १५० वर्षांनी हे पुस्तक लिहिले गेले. त्या वेळेस निनवे शहराने केलला पश्चात्ताप फार काळ टिकला नाही आणि पापामुळे त्या शहराचा नाश झाला (३:१–७).

देवाकडे पाठ फिरविणाऱ्या राष्ट्रांचा निनवे हा नमूना आहे. जी व्यक्ति अथवा राष्ट्र जाणूनबुजून देवाला नाकारते, ती व्यक्ति अथवा राष्ट्र जाणूनबुजून सर्वनाशाची निवड करते.

हबक्कूक – हा प्रश्न विचारतो आणि उत्तरे मिळवितो. "दुष्टांची भरमराट का होते?" या प्रश्नाची चर्चा येथे केलेली आहे. त्याच्या सर्व अडचणीच्या वेळी तो प्रार्थनापूर्वक देवाकडे गेला आणि त्याच्याकडून मिळणाऱ्या उत्तराची त्याने धीराने वाट पाहिली (२:१). प्रामाणिकपणे केलेल्या प्रार्थनेनंतर (३:१–१६) देवाचे गौरव प्रगट झाले. "नीतीमान आपल्या विश्वासाने जगेल" (२:४) हे शब्द नवीनकरणाच्या प्रक्रियेत फार महत्त्वपूर्ण आहेत. हे शब्द नव्या करारात रोम १:१७; गलती ३:११ आणि इब्री १०:३८ येथे उदधृत केले अहित.

या पुस्तकाची सुरुवात दुःखाने होते, पण शेवट गीतगायनाने होतो.

सफन्या – देवाच्या न्यायाने आणि क्रोधाने सफन्या भरला आहे (१:१५;३:८), पण त्यामध्येही देवाच्या प्रीतीची झलक आहे (३:१७). मूर्तीपूजेच्या सर्व प्रकारांचा सफन्याने निषेध केला आहे. योशीयाच्या वेळी झालेल्या संजीवनाला बहुधा तोच सर्वस्वी जबाबदार होता.

## पाठ २० : हाग्गय, जखऱ्या आणि मलाखी

जुन्या करारातील बहुतेक सेदेष्टे बंदिवासाच्या काळापूर्वी होऊन गेले. त्यांनी बंदिवासाच्या काळाअगोदर संदेश दिले. यहेज्केल आणि दानीएल या दोघांनीच बंदीवासाच्या काळात संदेश दिले. इस्राएल लोक बंदीवासातून परत आल्यानंतर, हाग्गय, जख्याऱ्या आणि मलाखी या तिघांनी संदेश दिले.

हाग्गय – मंदिराची पुर्नबांधणी आणि नूतनीकरण याविषयी हाग्गय संदेष्ट्याला फार कळकळ व आस्था होती. मंदीर बांधण्यास लोक दिरंगाई करीत होते, म्हणून त्याने त्यांना दोष दिला, आणि हे कार्य पुरे करण्यासाठी त्यांना उत्तेजन दिले व मदत केली. चार महिन्याच्या कालावधीत त्याने दिलेल्या चार संदेशांच्या मालिकेवर हे पुस्तक आधारित आहे.

त्याने लोकांना कार्य करण्यासाठी कडकपणे केलेले आव्हान परिणामकारक व उत्साहवर्धक ठरले. लोकांनी उठून मंदीर बांधण्यास सुरूवात केली (१:१२–१५).

जखऱ्या – वयोवृद्ध हाग्गय संदेष्ट्याच्या सोबत तरुण संदेष्टा जखऱ्या उभा रहिला. त्याने इस्राएल लोकांना मंदीर बांधण्यास चालना दिली, पाठबळ दिले आणि ज्याप्रमाणे त्यांच्या

पूर्वजांनी देवाला नाराज व निराश केले त्याप्रमाणे त्यांनी वागू नये असा इशारा त्याने दिला. पुढच्या युगांमध्ये इस्त्राएल लाकांना मिळणाऱ्या देवाच्या अविनाशी आशीर्वादांचे अतिशय सुंदर चित्रण त्याने केले आहे.

जखऱ्याने, यशयाचा अपवाद वगळता, इतर सर्व संदेष्ट्यापेक्षा अधिक वेळा तारणाऱ्याबद्दल भविष्य वर्तवले आहे. त्याने नम्र आणि दु:ख सहन करणाऱ्या मशीहाचे भविष्य सांगितले आणि नंतर त्याच्या राजपदाचे व महान गौरवाचे भविष्य सांगितले.

मलाखी – हा जुन्या व नव्या करारांना जोडणारा दुवा आहे. "त्याच्या वाटा नीट करा," अशी घोषणा करणारा व बाप्तिस्मा करणारा योहान आणि मलाखी यांच्यामध्ये सुमारे ४०० वर्षांचा स्तब्धतेचा काळ आहे.

जुन्या कराराचा शेवट "शाप" या शब्दाने होतो, तर नव्या कराराचा शेवट आशीर्वादाने होतो. संजीवनाच्या कालखंडानंतर (नहेम्या १०:२८–३९), लोक आध्यात्मिकदृष्ट्या थंड पडले होते, त्यांचे नैतिक जीवन खालावले होते. मलाखी हा सुधारक होता. त्याने लोकांवर दोषारोप केला. त्यांच्या पापांविषयी त्यांना दोष दिला, त्याच सोबत त्यांनी सुधारावे म्हणून त्यांना उत्तेजन दिले.

येशू ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याची आपण वाट पाहत आहोत, त्या द्वितीयागमनाबद्दल मलाखीने जी घोषणा केली ती मलाखी ३:१६–४:३ या वचनांत वाचा.

# भाग दुसरा
# नव्या करारातील पुस्तक

## पाठ २१ : शुभवर्तमानांची प्रस्तावना

"शुभवर्तमान" म्हणजे "चांगली बातमी." शुभवर्तमानाच्या चार लेखकांना सुवार्तिक म्हटले जाते, ज्याचा अर्थ आहे 'चांगली बातमी सांगणारा.' मत्तय, मार्क आणि लूक या तीन शुभवर्तमानांना 'समान–दृष्टीकोणात्मक शुभवर्तमाने' (Synoptic Gospels) असे म्हणतात कारण ते, योहानापासून वेगळे, ख्रिस्ताच्या जीवनाचे समान–दृष्टीकोणात्मक म्हणजे मिळते–जुळते वर्णन करतात.

'समान–दृष्टीकोणात्मक' शुभवर्तमाने मुख्यत: येशूच्या गालीलातील सेवेविषयी सांगतात तर योहानकृत शुभवर्तमान त्याच्या यहुदियातील सेवेविषयी सांगते. मत्तय, मार्क, लूक हे येशूचे चमत्कार, दाखले व त्याने समुदायास उद्देशून केलेले उपदेश याविषयी सांगातात तर

योहान त्याची सखोल प्रवचने, संवाद व प्रार्थना याविषयी सांगते. पहिले तीन ख्रिस्ताला कृतीत सादर करतात तर योहान मनन व सहभागता या भूमिकेत दाखवितो.

संदेष्ट्यांनी केलेले सम्पूर्ण कथन आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवन व कार्याकडे नेते, आणि त्यापासूनच पत्रांमध्ये जे काही लिहिले गेले आहे त्यासाठी माहिती प्राप्त होते.

शुभवर्तमाने आम्हाला येशू ख्रिस्त **केव्हा** व **कसा** आला ह्याविषयी सांगतात.

पत्रे आम्हाला येशू ख्रिस्त **का** व **कशासाठी** आला ह्याविषयी सांगतात.

## पाठ २२ : मत्तय

मत्तय येशू ख्रिस्ताला राजा म्हणून दाखवितो. प्राथमिकत: यहुद्यांसाठी लिहिलेल्या या शुभवर्तमानात त्याला दावीदाचा पुत्र म्हणून सादर केले आहे. अध्याय १ मध्ये त्याची राजकीय वंशावळी दिली असून ती अब्राहामापर्यंत जाते. येशू ख्रिस्त मशिहाच्या भविष्यांची पूर्तता होता असे दाखविणारे २९ संदर्भ यात दिले आहेत जे इतर शुभवर्तमानात नाहीत.

येशू ख्रिस्ताने मत्तयाला निवडले तेंव्हा तो रोमन कायद्यानुसार कफर्णहूमात कर वसुली करणारा होता (९:९, १०:३). इतर सुवार्तिक मत्तयाने येशूला दिलेली मेजवानी व त्याला अनुसरण्यासाठी केलेला सर्वस्वाचा त्याग याविषयी सांगतात. ती एक अर्थपूर्ण व्यक्ति होती यात संशय नाही.

मत्तय हे देवाचा अभिषिक्त — मशीहा — याच्याविषयी सांगणारे शुभवर्तमान आहे. या पुस्तकातील पवित्र आत्म्याचे महत्त्वाचे उद्दीष्ट म्हणजे मोशे व इतर संदेष्ट्यांनी सांगितलेला नासरेथातील येशू हाच मशीहा आहे हे दाखाविणे. पूर्वेकडून आलेल्या विद्वान लोकांच्या भेटीचा वृत्तान्त फक्त मत्तयच सांगतो. डोंगरावरील प्रवचन हे देवराज्याची राज्यघटना दाखविते. “राज्य” हा शब्द या शुभवर्तमानात पंचावन्न वेळा येतो, कारण हे राजाचे शुभवर्तमान आहे. मत्तय २४ व २५ यातील प्रवचने येशू ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्यासंबंधी सांगतात.

येशूच्या स्वर्गारोहणासंबधी या शुभवर्तमानात लिहिलेले नाही. मशीहा पृथ्वीतलावर असून दाविदाच्या पुत्राचे अद्यापही गौरवी आधिपत्य आहे, असे दाखवीत समारोप केला आहे.

## पाठ २३ : मार्क

मार्क येशूला सेवक असे दर्शवितो. रोमी लोकांसाठी लिहिलेल्या या शुभवर्तमानात वंशावळी नाही. कारण लोकांना सेवकाच्या वंशावळीसंबधी काही अभिरुची नसते.

लेखक हा मार्क योहान असून तो मरीयेचा पुत्र व बार्णबसाचा चुलत भाऊ होता. तो पौल व बार्णबस यांच्याबरोबर अंत्युख्यात होता व त्याच्यामुळे त्या दोघांत वितृष्ट निर्माण झाले होते (प्रे. कृ. १२:२५, १३:५), नंतर कदाचित त्रासामुळे तो त्यांना सोडून गेला (प्रेषित १३:१३). शेवटी पौलाला त्याची मोठी मदत झाली (कलस्सै ४:१०,११, २ तीमथ्य ४:११). पेत्रामुळे त्याचे तारण झाले व पेत्र त्यास 'माझा मुलगा' म्हणून संबोधतो (१ पेत्र ५:१३). या शुभवर्तमानात पेत्राचा प्रभाव दिसतो.

कृती व परिपूर्णता यांनी भरलले असे छोटेसे हे शुभवर्तमान आहे. हे शुभवर्तमान रोमी लोकांसाठी रोममध्ये लिहिले गेले होते. ते फार कार्यक्षम व सामर्थ्य आणि कृती यांवर विश्वास ठेवणारे लोक होते. ते शब्दापेक्षा कृतीवर अधिक भर देत असत. या पुस्तकात जुन्या करारातील संदर्भ फारच थोडे असून फक्त चारच दाखले सांगितलेले आहेत. यात कंटाळवाणी प्रस्तावना नाही. गती किंवा वेग दाखविणारे "लागलेच," "लागलीच," "लागलाच" असे शब्द त्यात चाळीस वेळा येतात.

मार्कमध्ये चमत्कारांना प्राधान्य दिले आहे, त्यात २० चमत्कारांचा उल्लेख केला आहे.

## पाठ २४ : लूक

लूक येशू ख्रिस्ताला परिपूर्ण मनुष्य असे दाखवितो. ग्रीक लोकांसाठी लिहिलेले हे पुस्तक असून यातील वंशावळ अब्राहामाऐवजी प्रथमपुरुष आदामापर्यंत जाते. येशू हा परिपूर्ण मानव असल्याने तो पुष्कळ प्रार्थना करताना दिसतो व देवदूत त्याची सेवा करताना दिसतात.

लूक हा वैद्य असून पौलाचा सोबती होता. शुभवर्तमानाच्या लेखकांमध्ये तो एकटाच यहूदी वंशातील नव्हता. तो सुशिक्षित असून सूक्ष्म निरीक्षण करणारा होता. प्रोषितांची कृत्ये या पुस्तकाचाही लेखक तोच आहे. लूक येशूला एक परिपूर्ण, आदर्श मानव असे सादर करतो.

हे शुभवर्तमान पाप्यांसाठी आहे. मानव होऊन मानवाच्या तारणासाठी असलेले ख्रिस्ताचे कळवळायुक्त प्रेम हे शुभवर्तमान दाखवते.

डॉक्टर लूक येशूच्या अद्भूत जन्माचा इत्यंभूत वृत्तान्त देतो. तो एकटा मेंढपाळाच्या भेटीचे वर्णन सांगतो. बारा वर्षाच्या येशूची मंदिरास भेट याविषयी तो एकटाच सांगतो. मानव होवून येशूने स्वहस्ते कष्ट केले, दु:ख सोसले. या शुभवर्तमानात सांगितलेल्या सहा चमत्कारांपैकी पाच आरोग्यदानाचे चमत्कार आहेत. मल्खचा कान बरा करण्यासंबंधी फक्त लूकच लिहितो (लूक २२:५१). लूकाचे शुभवर्तमान हे जगातील उपऱ्यांसाठी आहे. स्त्रीत्वाविषयी तो बरेच सांगतो. उत्तम गीते असलेले हे काव्यात्मक पुस्तक आहे. इतर सर्व लेखकांपेक्षा तो येशूच्या प्रार्थनेविषयी जास्त लिहितो.

## पाठ २५ : योहान

योहान येशूला देवाचा पुत्र अशा भूमिकेत नेतो. संपूर्ण शुभवर्तमानात त्याच्या दैवी नात्यासंबंधी दर्शविले व स्पष्ट केले आहे. गर्जनेचा पुत्र म्हणजे योहान याने हे शुभवर्तमान लिहिले आहे. त्याच्यावर येशूचे प्रेम होते. त्याचा बाप जब्दी एक समृद्ध कोळी होता. प्रभूचे अनुकरण करणारी, समर्पित सलोमी त्याची आई होती. याकोब हा त्याचा भाऊ होता.

इतर सुवार्तिकांनंतर, लगभग एका पिढीनंतर त्याने हे शुभवर्तमान लिहिले. येशूने त्यास पाचारण केले तेव्हा तो जवळपास २५ वर्षांचा असेल. तत्पूर्वी तो बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा अनुयायी होता. नंतर त्यास इ.स. ८० से १०० च्या काळात पात्म नावाच्या बेटावर हद्दपार केले गेले. त्यावेळी त्याच्या लिखाणाशिवाय बाकी नवा करार पूर्ण झाला होता. इतर शुभवर्तमानापेक्षा योहानकृत शुभवर्तमानात येशूला उंच केलेले व दृश्यस्वरूपात गौरविलेले आहे. ३५ वेळा येशू देवाला 'माझा पिता' म्हणून संबोधतो. अधिकारवाणीने बोलताना २५ वेळा तो 'खचित खचित' असे म्हणतो.

योहान म्हणतो, येशू हा ख्रिस्त आहे हे लोकांनी ओळखावे म्हणून त्याने हे पुस्तक लिहिले आहे. यासाठी तो ७ साक्षीदार आणतो – १:३४; १:५९; ६:६९; १०:३६; ११:२७; २०:२८; २०:३१. तो सात चमत्कारांची नोंद करतो – २:१–११; ४:४६–५४; ५:१४७; ७:१–१४; ६:१५–२१; ९:१–४१ व ११:१–५७. 'मी आहे' या शब्दांमध्ये ख्रिस्ताचा दैवी स्वभाव या पुस्तकात सात वेळा प्रगट होतो – ६:१५; ८:१२; १०:९; १०:११; ११:२५; १४:६; १५:१.

## पाठ २६ : प्रोषितांची कृत्ये

लूक त्याच्या शुभवर्तमानात येशूने पृथ्वीवर जे कार्य आरंभले त्याविषयी सांगतो, तर प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात ते काम पवित्र आत्म्याने कसे चालू ठेवले, हे दाखवितो.

येशूच्या स्वर्गारोहणाने लूकाच्या शुभवर्तमानाचा समारोप होतो, तर प्रेषितांच्या कृत्याच्या तो आरंभ आहे.

प्रेषितांच्या द्वारे झालेली पवित्र आत्म्याची कार्ये प्रेषितांच्या कृत्यात नोंदवली आहेत. त्याचे नाव सत्तर वेळा लिहिले आहे. 'साक्ष' हा शब्द तीस वेळा वापरला आहे.

यहूदी राष्ट्राचे प्रमुख शहर यरुशलेम येथे शुभवर्तमानाची घोषणा यापासून पुस्तकाचा आरंभ होतो, तर सर्व जगाचे सामर्थ्य असणाऱ्या रोममध्ये शुभवर्तमान सांगणे याने पुस्तकाचा शेवट होतो. एकाच पिढीत प्रेषित सर्व दिशांना गेले व त्यावेळच्या जगातील सर्व राष्ट्रांना सुवार्ता सांगितली (कलस्सै १:२३).

प्रेषितांची कृत्ये १–१२ या अध्यायात पेत्र यहूदी लोकांना साक्ष देताना आढळतो. त्याचा

संदेश आहे, “पश्चात्ताप करा.” प्रेषित १३ ते २८ मध्ये पौल गालीली लोकांना सुवार्ता सांगत असून तो म्हणतो, “विश्वास ठेवा.”

मिशनकार्य करणाऱ्या संस्थांसाठी हे उत्तम आदर्श असे पुस्तक आहे. येशू ख्रिस्ताच्या तारणाप्रत लोकांना आणण्याचे उद्दीष्ट ते दाखविते. पहिल्या मंडळीने आपले उद्दीष्ट साध्य करण्यासाठी सुनिश्चित अशी धोरणे आखून त्यानुसार कार्य केले.

त्यासाठी त्यांनी आपले कार्यक्षेत्र होण्यासाठी अधिक लोकसंख्येचे ठिकाण निवडले. त्यांचे कार्य पवित्र आत्म्यावर आधारित असून, त्यांच्या कार्यात मोठा जोश व आवेश होता. पौलाच्या ३ मिशनरी फेऱ्या मिशनकार्याचे परिणामकारक उदाहरण होत्या.

## पाठ २७ : रोमकरांस पत्र

नव्या करारात असणाऱ्या पत्रांतील हे पहिले पत्र आहे. पौलाने तेरा पत्रे लिहिली आहेत व त्यांना पौलाची पत्रे म्हणतात. (इब्री लोकांस लिहिलेले पत्र पौलाने लिहिले अशी खात्री नसली तरी ते पौलानेच लिहिले असे समजले जाते.) पौलाचा जन्म शुद्ध यहूदी वंशात झाला होता. रोमी नागरिकत्व, ग्रीक शिक्षण, इब्री धर्म या सर्वांमुळे तो त्याच्या मोठ्या कार्यासाठी अद्‌भुतप्रमाणे लायक ठरला.

वल्हांडणासाठी रोमहून यरुशलेमला भेट देणास आलेल्या लोकांपैकी ज्यांचे पेन्टेकॉस्टच्या दिवशी परिवर्तन झाले ते रोम ह्या राजधानीच्या ठिकाणी शुभवर्तमानाचे बीं घेऊन गेले व त्यांनी तेथे मंडळीचे रोपण केले. अट्ठावीस वर्षांनंतर पौल त्या मंडळीला भेटण्यास उत्सुक होता. तिसऱ्या मिशनरी प्रवासात तो करिंथ येथे तीन महिने राहिला होता. येथूनच त्याने हे पत्र लिहिले.

दोषी लोकांना चांगले बनविण्याची देवाची पद्धत रोमकरांस पत्र या पुस्तकात दिसते. हे पुस्तक आमच्या तारणाचा महान लेखी दस्तऐवज आहे.

रूपरेषा : १ ते ८ अध्याय तात्त्विक आहेत. पहिले तीन अध्याय विशेषत: मानवाची भयानक पापमय अवस्था दाखविते (१:१८ व ३:२०). तेथून पुढे न्यायाद्वारे देवाची धार्मिकता आढळले (३:२१—५:११). नंतर संतांच्या पवित्रीकरणाचा संदेश आढळतो (५:१२—८:३९).

अध्याय ९ ते ११ हे इस्राएलासाठी देवाची दैवी योजना दर्शवितात.

शेवटचे चार अध्याय (१२—१६) व्यावहारिक असून, ख्रिस्ती मानवाची कर्तव्ये दर्शवितात.

## पाठ २८ : करिंथकरांस पहिले व दुसरे पत्र

पौलाच्या काळात दैहिक करिंथ हे रोमी साम्राज्यामधील पापाचे केंद्र होते. हे ग्रीसमधील अत्यंत महत्त्वाचे शहर होते. हे अतिशय श्रीमंत शहर होते आणि येथे अनैतिकतेला उधाण आले होते.

या सर्व भ्रष्टाचाराच्या परिस्थिमिमध्ये पौलाने शुभवर्तमान गाजविले. मंडळीची स्थापना केली व ही दोन पत्रे लिहिलीं.

करिंथकरांनी पत्राबरोबर शिष्टमंडल पाठविले होते (७:१; १६:१७) व १ ले करिंथ हे तेथील मंडळीच्या परिस्थितीविषयी पौलाचे उत्तर आहे. तेथे दैहिकतेचा शिरकाव झाला होता, फुटी पडल्या होत्या, ख्रिस्ती लोकांविरुद्ध ख्रिस्ती लोक कोर्टामध्ये जात होते. प्रभूभोजनासंबंधी भ्रष्टाचार वाढला होता, स्त्रियांचे वर्तन नीट नव्हते. विवाह व आत्मिक देणग्यांवरुन मंडळीत विवाद होवू लागले होते.

अध्याय १५ मध्ये पौल ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे अनेक पुरावे देतो.

त्याच्या पहिल्या पत्राचा स्वीकार कसा झाला ह्यासंबंधी जी आनंददायक बातमी त्याला मिळाली त्यावर आपला आनंद प्रगट करण्यासाठी व आपल्या प्रेषितपणाचे समर्थन करण्यासाठी पौलाने करिंथकरांस २ रे पत्र लिहिले. इतर कोणात्याही पत्रापेक्षा या पत्रात तो आपला स्वतः चा इतिहास अधिक सांगतो.

हे पत्र “सांत्वना” ने सुरू होते (१:३) व “कल्याण” ने संपते (१३:११).

## पाठ २९ : गलतीकरांस पत्र

पौलाच्या दुसऱ्या मिशनरी फेरीत गलतीयामधील ग्रामीण भागात त्यांनी मंडळ्या रोपण केल्या. पौलानंतर तेथे कायद्याचे शिक्षक आले होते, कृतीने तारण होते असे ते सांगत होते. खोट्या शिक्षकांनी लोकांना, त्यांनी सपूर्ण नियमशास्त्रातील कृत्यांचे पालन करायला पाहिजे असे सांगून, “भूरळ घातली” होती. पण कृत्य किंवा इतर कोणत्याही कामाने तारण मिळत नाही हे त्यांनी जाणावे अशी पौलाची इच्छा होती. तारणप्राप्ती मात्र येशूवर ठेवलेल्या विश्वासानेच होते — इतर कशाने ही नाहीं. गलती येथील मंडळया खोट्या शिक्षाकांचे शिक्षण मान्य करणार असे समजताच पौलाला तो मामला इतका तातडीचा वाटला की त्याने स्वहस्ते हे पत्र लिहिले (६:११).

हे पत्र ख्रिस्ती मनुष्याचे स्वातंत्र्य घोषित करणारे पत्र आहे. हे नियमशास्त्र व कृपा यामध्ये फरक करते.

हा कडक, गंभीर व विधियुक्त संदेश आहे. त्यात तारीफ, स्तुती किंवा आभार यांचा समावेश नाही. कोणाच्याही नावाचा यात उल्लेख नाही. यात बळकट इच्छाशक्ती व भावना आहेत — हे झगडणारे पत्र आहे. मार्टीन लूथरचे हे आवडते पत्र होते. हे संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये, ‘विश्वासाने धर्मी ठरवले जाते’ या सिद्धांताचे जोरदार समर्थन व घोषणा करणारे दस्तऐवज आहे.

## पाठ ३० : इफिसकरांस पत्र

हे तुरुंगातून लिहिलेल्या चार पत्रांपैकी एक आहे (फिलिप्पै, कलस्सै व फिलेमोन ही तुरुंगातून लिहिलेली इतर पत्रे आहेत). हे पत्र मंडळीचे महान रहस्य दाखविते. काही वेळा याला पौलाचे "पवित्रातील—पवित्र" किवा पौलाचे "तिसऱ्या स्वर्गाचे पत्र" म्हणतात.

आशियात प्रवेश करण्यासाठी पवित्र आत्म्याकडून पौलाला मना करण्यात आली, तेव्हा त्याच्या दुसऱ्या प्रवासफेरीत इफिस हे एक महत्त्वाचे केंद्र होते. तो युरोपात करिंथ पर्यंत गेला व त्यानंतर इफिसमार्गे परतला. तिसऱ्या प्रवासफेरीत तो तेथे परत गेला व तेथे दोन वर्षे राहून सेवा केली (प्रेषित १८:१९ व १९:८—१०). पौलाकडून इतर कोणत्याही लोकांपेक्षा इफिसमधील लोकांनी सर्वांत जास्त पवित्र शास्त्राचे शिक्षण ऐकले. तेथे विरोध जरी झाला, तरी देवाने त्याचे रक्षण केले. इफिसातील मंडळीवर त्याचे प्रेम होते.

या आत्मिक पुस्तकाची पुढील रूपरेषा मदतपूर्ण होईल:

| | |
|---|---|
| १. विश्वासणाऱ्याचे "ख्रिस्तामध्ये," "स्वर्गातील" स्थान | (अध्याय १—३) |
| २. विश्वासणाऱ्याचे वर्तन | (अध्याय ४—६). |
| चर्चसंबंधी | (अध्याय ४) |
| नैतिकतेसंबंधी | (अध्याय ५) |
| सामाजिक जीवनासंबंधी | (अध्याय ५:२१ ते ६:९) |
| आत्मिक शस्त्रसामग्रीसंबधी | (अध्याय ६:१०—२४) |

## पाठ ३१ : फिलिप्पैकरांस व कलस्सैकरांस पत्र

इफिसकरास लिहिलेल्या पत्राप्रमाणेच ही पत्रे पण तुरुंगातून लिहिली आहेत.

फिलिप्पैकरांस पत्र हे पौल व तीमथ्य यांना मिळलेल्या भेटी संबंधी एपफ्रदीतामार्फत फिलिप्पै येथील मंडळीला पाठवलेले "आभार—पत्र" आहे.

फिलिप्पै येथील मंडळीविषयी पौलाला विशेष प्रेम होते. नदीकाठी स्त्रियांच्या समूहास तो भेटला, आणि तेथे लुदियाचे तारण झाले. नंतर पौल व सीला यांना बंदिखान्यात टाकून मारहाण करण्यात आली. ते रात्री प्रार्थना व उपकारस्तुती करत असतांना मोठा भूमिकंप होऊन तुरूंगाचे दरवाजे उघडले. तुरुंगाधिपती व त्याच्या कुटुंबाने येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला व बाप्तिस्मा घेतला (प्रेषित १६).

आनंद हा या पुस्तकाचा प्रमुख विषय आहे. दु:खात आनंद (अध्याय १), सेवेत आनन्द (अध्याय २), ख्रिस्तामध्ये आनंद (अध्याय ३), संतोषामध्ये आनंद (अध्याय ४). अशी या पुस्तकाची विभागणी करता येईल.

पौलाने कलस्सैकारांस पत्र लिहिले, कारण तेथे खोटे शिक्षण दिले जात होते व त्याला

ते दुरुस्त करायचे होते. ख्रिस्ती लोकांना वाटले की त्यांना सुंता, अन्नाविषयीचे निर्बन्ध व उत्सव (सण) यांना राखून त्यांचे पाळण करायला हवे. त्यांना येशू ख्रिस्ताच्या देवपणाविषयी समजले नव्हते, त्यामुळे त्यांना लागणारे सर्व काही येशूमध्ये मिळेल, असे त्यांना समजले नव्हते.

पौल त्यांची चूक दुरूस्त करतो:

१. तात्त्विकदृष्ट्या, अध्याय १—२

२. व्यावहारिकदृष्ट्या, अध्याय ३—४

## पाठ ३२. थेस्सलनीकाकरांस पहिले व दुसरे पत्र

पौलाच्या दुसऱ्या मिशनरी प्रवासात पौल व सीला यांनी थेस्सलनीकात मंडळी रोपण केली (प्रेषित १७:१—१०). ते तेथे एका महिन्यापेक्षा ही कमी दिवस थांबले, कारण यहूदी लोकांनी त्यांचा विरोध करण्यासाठी लोकांना एकत्रित केले होते. या नव्या मंडळीने भक्कम सामर्थ्य दाखविले. या मंडळीचे सभासद प्रामुख्याने गालीली असून ते विदेशी लोकांमधून तारलेले असून ते ख्रिस्तविरोधी व मूर्तीपूजक परिस्थितिमध्ये त्रास सोसत होते.

त्यांची प्रगती जाणून घेण्यासाठी पौल उत्सुक होता. तीमथ्याने बातमी आणली होती (३:६) व त्यांना विश्वासात टिकून राहण्यासाठी उत्तेजन द्यायची त्याची इच्छा होती. थेस्सलनीकाच्या पहिल्या पत्रात तत्त्व कमी पण प्रोत्साहन अधिक आहे. पौल येशूच्या दुसऱ्या येण्याविषयी अधिक बोलतो (१:१०, २:१९, ३:१३, ४:१६—१८ व ५:२३) असे की ते सत्य ख्रिस्ती जीवन व कार्य यासाठी प्रेरक गोष्ट आहे.

थेस्सलनीकाकरास दुसरे पत्र पहिल्या पत्रानंतर लगेच लिहिले गेले. ख्रिस्ताचे दुसरे येणे हा याचा मुख्य विषय आहे. पहिल्या पत्रामुळे काहीजण त्याविषयी गोंधळात पडले होते. हे पत्र येशूच्या येण्याआधी होणाऱ्या घटनेंसंबंधी सांगते आणि ख्रिस्ती लोकांना छळामध्ये टिकून राहण्याचे, परिश्रम करण्याचे आणि ख्रिस्ताच्या येण्याची वाट धीराने बघण्याचे उत्तेजन देते.

## पाठ ३३ : तीमथ्याला पहिले व दुसरे पत्र

१ व २ तीमथ्य व तीताचे पत्र यांना पाळकीय पत्रे म्हणतात कारण त्यात एका परिपक्व पाळकाने सेवेत येणाऱ्या तरुण पाळकांना, जे पुढे इतरांना सेवेसाठी तयार करणार आहेत अश्यांना, केलेला उपदेश आहे.

तीमथ्याचे वडील ग्रीक पण आई यहूदी होती. वयाच्या कदाचित् १५ व्या वर्षी त्याचे तारण झाले होते, जेव्हा त्याचे जन्मस्थान लुस्त्र येथे पौल आला होता (प्रेषित १६:१—३; १ तीमथ्य १:२). सात वर्षानंतर तो पौलाचा त्याच्या मिशनरी फेरीमध्ये सोबती झाला.

पहिले तीमथ्य — पहिल्या तुरुंगवासानंतर पौलाने इफिसला भेट दिली. जेव्हा तो इफिस सोडून जात होता तेव्हा तो तीमथ्याला तेथील कामकाज पाहण्यासाठी तेथेच सोडून गेला. तीमथ्य हा लाजाळू व अति संवेदनक्षम असल्यामुळे एकटे पाठीमागे राहणे त्यास कठीण वाटले. करिंथ येथून त्याला व्यावहारिक सल्ला व उत्तेजन देण्यासाठी पौलाने हे पत्र लिहिले.

यातील मुख्य वचन ३:१५ हे आहे. तीमथ्याला खोट्या शिक्षणापासून दूर राहण्याची व प्रार्थनेवर भर देण्याची सल्ला दिलेली आहे. चांगला पाळक व मंडळीतील वडील यांच्यासाठी स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

दुसरे तीमथ्य — रोमी बंदीशाळेत असताना, आपला शेवट जवळ आला आहे असे वाटत असतांना, पौलाने लिहिलेले हे शेवटचे पत्र आहे. त्याला त्रोवसांत इतक्या तातडीने अटक केली की त्याला त्याची पुस्तके, चर्मपत्रे व झगा घेता आला नाही (४:१३). तो एकटा होता व (४:१०—१२) प्राणदंड दिला जाण्याची वाट पाहत होता. राहिलेल्या वस्तू तसेच मार्कला घेऊन येण्यासंबंधी तो तीमथ्याला आग्रह करतो.

पुस्तकाचे प्रमुख विषय दु:ख—सहन, सेवा, विश्वासाचा त्याग आणि शास्त्रलेख आहेत.

## पाठ ३४ : तीताला व फिलेमोनाला पत्र

तीत हा यहूदीतर असून पौलाद्वारे बदललेल्या लोकांपैकी एक होता (१:४). करिंथ येथील मंडळीत निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याचे कठीण काम पौलाने तीताला दिले (२ करिंथ. ७:६, ७). पौलाचा तीतावर भरंवसा असल्याने त्याने तीताला एकट्यालाच त्या अवघड मंडळीत नेतृत्व करण्यासाठी क्रेत या ठिकाणी ठेवले (१:५). तीत "त्रासाल तोड देणारा," अवघड समस्या हाताळणारा मनुष्य होता. हा तीमथ्यापेक्षा अधिक धीराचा व परिपक्व व्यक्ती दिसतो.

खोट्या शिक्षणाविरुद्ध व्यावहारिक मार्गदर्शन असलेले हे पुस्तक आहे. चांगले कार्य, सल्लामसलत, तत्त्व यांचा यात समावेश आहे.

फिलेमोन — हे पळून गेलेल्या गुलाम अनेसिमला क्षमा करून त्याचा अंगीकार कर अशी फिलेमोनला विनंती करण्यासाठी लिहिलेले मध्यस्थीचे सुंदर पत्र आहे. फिलेमोन हा नक्कीच संपन्न व्यक्ती असून (५, ७, २२) बहुधा पौलाद्वारे त्याचे जीवन परिवर्तित झाले होते (१९). अनेसिमस पळून रोमला गेला व तेथे पौलाच्या सान्निध्यात आल्यामुळे त्याचे जीवन बदलले (१०).

या पत्रात अनेसिमसच्या बदललेल्या जीवनाचे प्रमाणपत्र व हळूवारपणे केलेली क्षमेची याचना आहे.

## पाठ ३५ : इब्री लोकांस पत्र

या पुस्तकात स्वाक्षरी नसली तरी ते पौलाने लिहिलेले आहे असा अनेकांचा विश्वास

आहे. हे पत्र इब्री ख्रिस्ती लोकांना लिहिलेले असून जुन्या करारातील याजकपणापेक्षा ख्रिस्ती प्रकटीकरणाचे गौरव अधिक आहे हे स्पष्ट करणे हा याचा उद्देश्य आहे. ख्रिस्त हा परिपूर्ण याजक आहे, त्याने परिपूर्ण यज्ञ केला आहे.

देवदूत, मोशे, यहोशवा, अहरोन व मलकीसदेक या सर्वापेक्षा देवाचा पुत्र सर्वश्रेष्ठ आहे असे पहिल्या दहा अध्यायात सांगितले आहे. ११ ते १३ हे अध्याय विश्वासाचे जीवन दाखवितात.

## पाठ ३६ : याकोबाचे पत्र

लेखक हा कदाचित् येशूचा भाऊ होता जो यरुशलेमातील मंडळीचा पुढारी झाला. इ. स. ६२ मध्ये तो मारला गेला (प्रेषित १२:१७, १५:१३).

हे पत्र स्पष्टपणे यहूदी लोकांमधून परिवर्तन झालेल्या व पवित्र भूमीपासून दूर राहणाऱ्या विश्वासी लोकांना उद्देशून लिहिलेले असले तरी त्यातील संदेश इतका व्यावहारिक व स्पष्ट आहे की तो सर्व काळांमध्ये राहणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या जीवनास लागू होतो. सत्कृत्यांद्वारे धर्म जाहीर करावा हा याचा उद्देश आहे.

काही परिच्छेद ख्रिस्ती लोकांना विशिष्ट परिस्थितीत लागू होतात: दबावाखाली असणाऱ्यासाठी (१:२—४); संपन्न ख्रिस्ती लोकांसाठी (१:९—११; ५:१—६); मंडळीच्या सदस्यांच्या दृष्टिकोनासाठी (२:१—९); नेतृत्व करणाऱ्यांसाठी (३:१) आणि जे बहकाणारे आहेत त्यांच्यासाठी (५:१९—२०).

याकोब आपले शिक्षण स्पष्ट करण्यासाठी ठळक व स्पष्ट चित्रमय भाषा वापरतो. उदा. १:६,११,१७,२३,२६; ३:३,५,७,१२; ४:१४, ५:१,२,७.

## पाठ ३७ : पेत्राचे पहिले व दुसरे पत्र

पेत्राचे पहिले पत्र हे दु:खसहन करणाऱ्या ख्रिस्ती लोकांना उद्देशून लिहिले आहे जे होणाऱ्या छळामुळे कावरेबावरे झाले होते. हे अंत:करणापासून लिहिलेले जिवंत पत्र असून ते वाचतांना निबंधाऐवजी प्रवचनासारखे वाटते. "दु:ख" हा या पुस्तकातील महत्त्वाचा शब्द आहे व तो १५ पेक्षाही अधिक वेळा आला आहे.

ख्रिस्तातील गौरवी तारण आणि विश्वासणाऱ्याचे जीवन, पद व कर्तव्ये यासंबंधी पेत्र सांगतो. तो नागरीक व सामजिक कर्तव्यांचे, सर्वसाधारण चांगले नागरिकत्व व विश्वासाच्या घरण्यामधील कर्तव्यांचे वर्णन करतो. तो ख्रिस्ताचे वर्णन आशेचे प्राप्तीस्थान — १:३, वधलेला कोकरा — १:१९, महत्त्वाची कोनशिला — २:६, नमूनेदार उदाहरण — २:२१, पाप वाहणारा — २:२४, आत्म्यांचा मेंढपाळ — २:२५, गौरवी ख्रिस्त — ३:२२, म्हणून करतो.

दुसरे पेत्र — खोटे शिक्षक, निंदक यांपासून सावध राहण्याविषयी हे पत्र आहे. देवाचे

वचन, दैवी अभिवचनांची पूर्तता यांवर यात भर दिला आहे. २ तीमथ्यप्रमाणे २ पेत्रही शेवट जवळ आला असून मंडळीसाठी हा कठीण काळ आहे ह्यावा जोर देतो.

पेत्राच्या दोन पत्रांत सात मोल्यवान बाबींची यादी आहे. कठीण परीक्षा — १ पेत्र १:७, येशूचे रक्त — १:१९, जिवंत धोंडा — २:४, स्वत: ख्रिस्त — २:६, लीन व सौम्य आत्मा — ३:४, विश्वासणाऱ्यांचा विश्वास — २ पेत्र १:१, आणि दैवी अभिवचने — २ पेत्र १:४.

## पाठ ३८ : योहानाचे पहिले, दुसरे, तिसरे पत्र व यहूदाचे पत्र

ही ३ पत्रे प्रेषित योहानाने लिहिली आहेत.

पहिले योहान — "निश्चिततेंचे पत्र" असे शीर्षक या पत्राला देता येईल. त्यातील मुख्य शब्द सहभागिता, ओळखा, प्रीती आहेत. विश्वासणाऱ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या आत्मिक ज्ञानावर यात भर दिला आहे. "ओळखा" किंवा त्या अर्थाचे शब्द यात तीस वेळा आले आहेत. मध्यवर्ती कल्पना पुढीलप्रमाणे आहे:

१. देव जीवन व प्रकाश आहे — अध्याय १ व २
२. देव नीतिमान प्रेम आहे — अध्याय ३ व ४
३. सर्व दुष्ट शक्ती व जग यांवर विजय मिळवणारी विश्वास व प्रेम ही दोन तत्त्वे आहेत — अध्याय ५

दुसरे योहान — पाखंडी मत व खोटे शिक्षक यांच्यासोबत मैत्री, संगती न करण्यासाठी बंधुजनांना सल्ला देण्यास हे पत्र लिहिले आहे (७–११). "प्रीती" शब्द चार वेळा व "सत्य" पांच वेळा आला आहे.

तिसरे योहान — गायस ह्या विश्वासू व पाहूणचार करण्याऱ्या ख्रिस्ती बंधूला उद्देशून हे पत्र लिहिले आहे. गायस व इतर दोघे ह्यांच्याभोवती हे पत्र केंद्रीत आहे. एक दियत्रफेस आहे ज्याला भेटल्यावर योहान त्याची खरडपट्टी काढणार होता. दुसरा देमेत्रिय आहे जो एक उत्कृष्ट चारित्र्याचा प्रसिद्ध आदर्श ख्रिस्ती होता.

यहूदाचे पत्र — हे पत्र येशू व याकोब यांच्या धाकट्या भावाने लिहिले होते. तो ख्रिस्ती लोकांच्या अश्या विशिष्ट गटाला लिहितो ज्यांना "चोरून आत" शिरलेल्या व चुकीचे शिक्षण देऊन मंडळीमध्ये दुफळी माजवण्याऱ्या लोकांकडून समस्या उभी राहिली होती. अश्या शिक्षकांना कडकडून विरोध करण्याविषयी यहूदा सांगतो.

## पाठ ३९ : प्रकटीकरण

योहानाने हे पुस्तक पात्म बेटावर असताना लिहिले. हे पुस्तक संकट व छळाच्या काळात लिहिलेले असून (२:१३) त्यापेक्षा वाईट दिवस येणार होते (२:१०), कारण रोमी बादशहाला

भजणे अनिवार्य होणार होते. म्हणून यात मंडळयांना लिहिलेली सात पत्रे व सम्पूर्ण पुस्तक सुद्धा ख्रिस्ती जनांना दृढ राहण्याचे उत्तेजन देण्यासाठी आवश्यक होतीं.

समजण्यासाठी कठीण असले तरी हे पुस्तक महत्त्वाचे आहे. कारण सारी भविष्ये पूर्ण होण्यामध्ये काय काय होणार, जेव्हां दुष्टांचा न्याय होईल व ख्रिस्ताचे सार्वकालिक गौरवी राज्य स्थापन होईल, याचे उत्तम चित्रण यात आहे.

पवित्र शास्त्र हे एकच असे पुस्तक आहे ज्यात लिहिलेल्या गोष्टी पाळणकरणाऱ्या वाचकांसाठी अभिवचन आहे (१:३), आणि जो या पुस्तकातील काही काढेल किंवा त्यात भर घालील त्यासाठी शाप आहे (२२:१८, १९).

## पाठ ४० : प्रकाटीकरणाची रूपरेषा

१. प्रस्तावना – १:१–२०
२. सात मंडळयांना सात पत्रे – २:१–३:२२
३. स्वर्गाचे दृश्य– ४:१–११
४. सात शिक्के – ५:१–८:५
५. सात तुताऱ्या – ८:६–११:१९
६. सात चिन्हे – १२:२–१४:२०
७. सात वाट्या – १५:१–१६:२१
८. ख्रिस्तविरोधकाचे राज्य व नाश – १७:१–२०:१५
९. देवाची नगरी – २१:१–२२:५
१०. परिशिष्ट – २२:६–२१

प्रकटीकरणाचे शेवटचे व उत्पत्तिचे सुरुवातीचे अध्याय यात विलक्षण विरोधाभास आहे.

सूर्याची निर्मिती, जगामध्ये पापाचा शिरकाव, शाप दिला जाणे, सैतानाचा विजय व जीवनाच्या झाडापासून हाकलून दिले जाणे याविषयी उत्पत्तिच्या पुस्तकात सांगितले आहे.

तेथे सूर्याची गरज नाही, तेथे पाप अजिबात नसणार, तेथे शाप नसेल व सैतानाचा शेवट होईल आणि जीवनाच्या झाडाकडे सर्वांना जाता येईल, असे प्रकटीकरणात सांगितले आहे.

“ये, प्रभू येशू, ये.”

# २ पवित्र शास्त्राचे सिद्धान्त

या अभ्यासक्रमाच्या शीर्षकामुळे असे वाटेल की, हा खूप कठीण व, कदाचित् कंटाळवाणा अभ्यास असेल. पण त्याऐवजी तुम्हाला आढळेल की आपल्या विश्वासाला पूरक अशी पवित्र शास्त्रातील महत्त्वपूर्ण व विखुरलेली सत्ये या पाठांमध्ये एकत्र केलेली आहेत. "सिद्धान्त" किंवा "तत्त्व" याचा अर्थ म्हणजे "शिकवण, शिक्षण." आणि तुमच्या सेवाकार्यात आलेल्या समस्या व प्रश्न तसेच सेवेच्या भावी काळात तुम्हांला लोक जे प्रश्न विचारतील, त्याची उत्तरे या सिद्धान्ताद्वारे मिळतील. तुम्ही जर काळजीपूर्वक अभ्यास केला, तर तुम्ही त्यांना चांगल्या प्रकारे शिकवू शकाल, व ते त्यांच्या विश्वासापासून ढळून "विविध आणि विचित्र शिक्षणाने बहकून" जाणार नाहीत (इब्री १३:९).

<u>टीप:</u> या पुस्तकातील बहुतेक पाठांचे साहित्य अल्बन डग्लस यांनी लिहिलेले व गॉस्पेल लिटरेचर सोसायटी, मुंबई, भारत यांनी प्रकाशित केलेले, १०० बाईबल लेसन्स (पवित्र शास्त्रविषयक १०० शास्त्रपाठ) आणि विल्यम इव्हान्स यांनी लिहिलेले व मूडी प्रेस, शिकागो यांनी प्रकाशित केलेले "द ग्रेट डौक्ट्रीन्स ऑफ द बाइबल" या दोन पुस्तकांमधून घेण्यात आलेले आहे.

## —: अनुक्रमणिका :—

भाग १ : देवाविषयीचा सिद्धान्त ..............३२
भाग २ : येशू ख्रिस्ताविषयीचा सिद्धान्त .....३५
भाग ३ : पवित्र आत्म्याविषयीचा सिद्धान्त ..३९
भाग ४ : मानवाविषयीचा सिद्धान्त ...........४२
भाग ५ : तारणाविषयीचा सिद्धान्त ...........४४
भाग ६ : मंडळीविषयीचा सिद्धान्त ...........५१
भाग ७ : पवित्र शास्त्राविषयीचा सिद्धान्त ....५३
भाग ८ : देवदूतांविषयी सिद्धान्त ..............५५
भाग ९ : सैतानाविषयीचा सिद्धान्त ...........५७
भाग १० : अंतिम गोष्टींविषयीचा सिद्धान्त ..५८

# भाग पहिला
# देवाविषयीचा सिद्धान्त

## पाठ १ : देवाचे अस्तित्व

देवाचे अस्तित्व सिद्ध करणारे अनेक पुरावे आहेत. या पाठात आपण काहींचा विचार करू.

१. पवित्र शास्त्रातील पुरावा — देख अस्तित्वात आहे, या निश्चित, होकारात्मक स्वरूपाच्या विधानाने पवित्र शास्त्राची सुरुवात होते (उत्पत्ती १:१) आणि देवाच्या आस्तित्वाचा नाकार करणारा मूर्ख आहे, असे ते स्पष्टपणे सांगते (स्तोत्र १४:१).

२. निर्मितीतील पुरावा — आकाशाचे सौंदर्य व महिमा हे देवाचे अस्तित्व सिद्ध करतात (स्तोत्र १९:१), आणि देवाने केलेली निर्मिती देवाच्या सार्वकालिक गौरवाविषयी सांगते (रोम १:२०).

३. विवेकबुद्धीचा पुरावा — मनुष्य एका सार्वत्रिक विश्वासासोबत जन्मला आहे की एक सर्वोच्च जीव (ईश्वर) आहे.

४. इतर पुरावे — देवाच्या अस्तित्वाचे इतर अनेक पुरावे आहेत. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे :

- या जागची निर्मिती कोणीतरी केली असल्यामुळेच ते अस्तित्वात आहे.
- या जगाची निर्मिती अतिशय कौशल्याने व योजनाबद्ध रीतीने केली आहे हे त्याच्या एकंदर रचनेवरून दिसून येते.
- मानवाची बुद्धिमत्ता व नैतिकता यांद्वारे निर्माणकर्त्याची बुद्धी, नैतिकता व अस्तित्व दिसते.
- सार्वकालिक जीवन असणाऱ्यापासूनच जीवनाची सुरुवात झाली असावी.

निष्कर्ष : इब्री ११:६ चा विचार करा, “देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पहिजे कि, तो आहे.” म्हणून आपण लहान मुलांप्रमाणे साध्या विश्वाससह जवळ येवू या, असा विश्वास जो शास्त्रातील व सृष्टीतील देवाच्या प्रकटीकरणावर आधारित आहे.

## पाठ २ : देवाचे व्यक्तित्व

देवाविषयीचे खरे ज्ञान पवित्र शास्त्रातूनच मिळते (योहान १:१८; १ योहान ४:१२). त्यांपैकी काहींचा आपण विचार करू.

१. त्याचे व्यक्तित्व — प्राप्त ज्ञान, भावना, इच्छाशक्ती यांवरून व्यक्तित्व ठरते. आमचा देव जिवंत असून त्याची निश्चित अशी गुणवैशिष्ट्ये आहेत (यिर्मया १०:१०; १ थेस्सल. १:९).
२. त्याचा स्वभाव — देव आत्मा आहे. आत्म्याला देह, अस्थी आणि रक्त नसते (योहान ४:२४).
३. त्याची एकता — आमचा प्रभू देव हा एकच देव आहे. इतर मूर्तीपूजक धर्मांप्रमाणे अनेक देव नाहीत (अनुवाद ६:४; यशया ४४:६).

निष्कर्ष : आपण देवाविषयी जितके अधिक शिकतो, तितकी अधिक त्याची महानता आपल्या लक्षात येते.

## पाठ ३ : देवाची स्वाभाविक गुणलक्षणे

विशेषण किंवा गुणलक्षण हा शब्द कठीण वाटतो का? त्याचा साधा, सरळ अर्थ म्हणजे एखाद्याचा विशेष गुणधर्म किंवा दर्जा. या पाठात आपण देवाच्या काही विशेष गुणलक्षणांचा अभ्यास करू.

१. तो सार्वकालिक आहे — खरा देव असल्यामुळे त्यास आरंभ किंवा शेवट नाही (स्तोत्र ९०:२; १ तीमथ्य १:१७).
२. तो न बदलणारा आहे — (१ शमुवेल १५:२९; मलाखी ३:६; याकोब १:१७).
३. तो सर्वशक्तिमान आहे — याचा अर्थ त्याला सर्व सामर्थ्य आहे (ईयोब ४२:२; यिर्मया ३२:२७).
४. तो सर्वव्यापी आहे — म्हणजे त्याचे अस्तित्व सर्वत्र आहे. तो एकाच वेळी सर्व जागेवर रहातो (स्तोत्र १३९:७—९)
५. सर्वज्ञानी — त्याला सर्व ज्ञान आहे (१ इतिहास २८:९; २ इतिहास १६:९; स्तोत्र ९४:११; ईयोब ४२:२; यशया ४०:२८).

निष्कर्ष : गरीब व केविलवाण्या मानवाला या पाठात आपण शिकलेल्या सर्व गुणलक्षणांनी युक्त अशा देवाची गरज आहे. त्यातील प्रत्येक गुणवैशिष्ट्य मानवांसाठी का आवश्यक आहे?

## पाठ ४ : दैवाचे नैतिक गुणविशेष

देवाचा प्रत्येक गुणविशेष हा एखाद्या प्रवचनाचा विषय होऊ शकतो. आपण त्यांपैकी काहींचा अभ्यास करू:

१. देव पवित्र आहे (निर्गम १५:११; यशया ६:३; १ पेत्र १:१६)
२. देव नीतिमान आहे (स्तोत्र ११६:५; एज्रा ९:१५; यिर्मया १२:१).

३. देव दयाळू आहे (स्तोत्र १०३:८; रोम ९:१८).

४. देव प्रेम करतो (१ योहान ४:८–१६; योहान ३:१६; १६:२७).

५. देव विश्वासू आहे (१ करिंथ १:९; २ तीमथ्य २:१३).

पुढील आठवड्यांमध्ये आपण देवाच्या इतर नैतिक गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करू : तो गौरवी (निर्गम १५:११; स्तोत्र १४५:५); कृपाळू (निर्गम ३४:६; स्त्रोत्र ११६:५); मंदक्रोध (गणना १४:१८; मीखा ७:१८); ईर्ष्यावान (येहोशवा २४:१९; नहूम १:२) दयाळू (१ राजे ८:२३); महान (२ इति. २:५, स्तोत्र ८६:१०); अनाकलनीय (ईयोब ११:७, स्तोत्र १४५:३); अदृष्य (ईयोब २३:८, ९; १ तीमथ्य. १:१७); चांगला (स्तोत्र २५:८; ११९:६८); सरळ (स्तोत्र २५:८, ९२:१५) अविकारी (स्तोत्र १०२:२६, २७; याकोब १:१७); प्रकाश (यशया ६०:१९; १ योहान १:५); सत्य (यिर्मया १०:१०); परिपूर्ण (मत्तय ५:४८); अदृष्य (रोम १:२३); सदाजीवी (१ तीमथ्य १:१७, ६:१६); भस्म करणारा अग्नि (इब्री. १२:२९) आहे आणि त्याच्यासारखा दुसरा कोणीही नाही (निर्गम ९:१४, अनुवाद ३३:२६).

निष्कर्ष : पापांची शिक्षा मिळावी अशी देवाच्या पावित्र्याची मागणी आहे. देव एकाच वेळी दयाळू आणि पावित्र्याची अपेक्षा करणारा किंवा आग्रहधरणारा कसा असू शकतो? याचे उत्तर फक्त कॅलव्हरीवर मिळू शकेल जेथे पापाविषयी असणारा देवाचा क्रोध आणि पाप्यांवरील त्याची दया प्रकट झाली आहें.

## पाठ ५ : त्रैक्यत्व

देव एक असून सनातन आहे. पिता, पुत्र व पवित्र आत्मा या तीन स्वरूपात त्याने स्वत:ला प्रकट केले आहे. खालील शास्त्रभाग त्याचे त्रैक्यत्व सिद्ध करतात.

१. येशूचा बाप्तिस्मा, मत्तय ३:१३–१७ — स्वर्गातून पिता बोलला, पुत्राचा बाप्तिस्मा झाला व पवित्र आत्मा कबुतराप्रमाणे तारकावर उतरला.

२. मत्तय २८:१९ मध्ये सांगितलेली बाप्तिस्म्याची पद्धत — “पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा द्या.”

३. २ करिंथ १३:१४ मधील समारोप — “प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा, देवाची प्रीती आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हां सर्वांसह असो.”

४. मानवाच्या निर्मितीच्या वेळी केलेला देवासंबंधी अनेकवचनी वापर — “मग देव बोलला, आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश्य असा मनुष्य आपण करू.”

निष्कर्ष — मानव देवाच्या प्रतिरूपाचा बनविला असल्यामुळे त्याच्यामध्येही तीन भाग आहेत — जीव, आत्मा व शरीर.

# भाग दुसरा
# येशू ख्रिस्ता विषयीचा सिद्धान्त

## पाठ ६ : भविष्यवचनांची पूर्तता

येशू ख्रिस्ताविषयी जुन्या करारात सांगितलेल्या भविष्यवचनांची हजारो वर्षांनंतर नव्या करारात पूर्तता झाल्याचे आपण पाहतो.

१. ख्रिस्त इस्राएलातून येईल, गणना २४:१७–११, मत्तय १:१७.

२. दाविदाच्या घराण्यात, यहूदाच्या वंशात त्याचा जन्म होईल, उत्पत्ति ४९:१०, यशया ११:१, लूक १:३१–३३.

३. त्याचा जन्म बेथलेहेमात होईल, मीखा ५:२, लूक २:४–७.

४. तो कुमारीच्या पोटी जन्मास येईल, यशया ७:१४, मत्तय १:१८,२२,२३.

५. ख्रिस्ताचे आगमन एका घोषणा करणाऱ्याद्वारे जाहीर केले जाईल, यशया ४०:३; मत्तय ३:३.

६. मशीहा हा देव असेल, यशया ९:६, योहान १:१४.

७. त्याचा बाळपणाचा काही काळ मिसर देशात जाईल, होशेय ११:१; मत्तय २:१३–१८.

८. तो छळ सहन करील व पापासाठी प्रायश्चित्त करील, यशया ५३:४,६; २ करिंथ ५:२१, इब्री २:१७.

९. तो शिंगरावर बसून यरूशलेमात प्रवेश करील, जखऱ्या ९:९, मत्तय २१:२–५.

१०. वधस्तंभावरील क्लेशात त्याला पित्तमिश्रित आंब देतील, स्तोत्र ६९:२१; मत्तय २७:३४.

११. रोमी प्रथेच्या विपरीत, वधस्तंभावर खिळल्यावर त्याचे एक ही हाड मोडले जाणार नाही, स्तोत्र ३४:२०; योहान १९:३३–३६.

१२. त्याचे वस्त्र वाटून घेण्यााठी लोक चिठ्या टाकतील, स्तोत्र २२:१८, मत्तय २७:३५.

१३. मुत्युसमयी तो ठराविक शब्दोचार करील, स्तोत्र २२:१, मार्क १५:३४.

१४. तो मृतांतून पुन्हा उठेल, स्तोत्र १६:१०; प्रेषित २:२३–२७.

निष्कर्ष : यांतील प्रत्येक भविष्यवाणी आपल्या देवाचे सामर्थ्य व सर्वज्ञतेचा पुरावा आहे.

## पाठ ७ : ख्रिस्ताचे देवत्व

देवाचे गुणविशेष ख्रिस्ताला कसे लागू होतात हे पुढील वचनांवरून दिसते व त्यावरून ख्रिस्त देव आहे ह्याचा पुरावा मिळतो.

१. तो सार्वकालिक आहे, मीखा ५:२, योहान ८:५८, कलस्सै १:१७, प्रगटी १:८.

२. तो कधी न बदलणारा आहे, इब्री १३:८

३. तो सर्वसमर्थ आहे, लूक ८:२५, मत्तय २८:१८.

४. तो सर्वव्यापी आहे, मत्तय १८:२०, योहान १:४८, ३:१३, मत्तय २८:२०

५. तो सर्वज्ञ आहे, मार्क ११:२–६, योहान २:२४, २५; लूक ५:२२; मत्तय २४:३–३१.

६. तो पवित्र आहे, मार्क १:२४, पापविरहीत — १ पेत्र २:२२; योहान १९:४.

७. तो न्यायी आहे — मंदिराचे शुद्धीकरण करताना, योहान. २:१४–१७; धार्मिक न्यायाधिश, प्रेषित. १७:३१.

८. तो प्रेमळ आहे — योहान १५:१३, योहान ११:३६.

९. तो कृपाळू आहे — तीत ३:५, तो आमच्यासाठी मरण पावला.

१०. तो विश्वासनीय आहे — २ तीमथ्य २:१३.

देवाच्या कार्यांपैकी पाच कार्यांचा संबंध येशूशी जोडलेला आहे: निर्मिती (योहान. १:३); सांभाळ करणे (इब्री. १:३), क्षमा करणे (लूक ७:४८); मृतांना पुन्हा जिवंत करणे (योहान ६:३९); आणि न्याय (योहन ५:२२).

निष्कर्ष : येशूचे पुनरुत्थान ही एक सत्य घटना तो देव आहे हे सिद्धकरण्यास भक्कम पुरावा आहे.

## पाठ ८ : ख्रिस्ताचे मनुष्यत्व

येशूला तारणारा होण्यासाठी देव असणे व कुमारीच्या पोटी जन्म घेणे याशिवाय मानव देखील होणे आवश्यक होते (१ तीमथ्य. २:५). त्याच्या मनुष्यपणाचे हे पुरावे पाहा:

१. त्याला मानवी नावे दिली आहेत (मत्तय १:२१); “मनुष्याचा पुत्र” हा वाक्यांश ७७ वेळा आला आहे.

२. त्याला मानवी वंशावळ होती (मत्तय १:१–१६)

३. त्याला भूक लागली होती (मत्तय ४:२); तहान लागली होती (योहान ४:७, १९:२८).

४. तो थकला होता (योहान ४:६); तो झोपला होता (मत्तय. ८:२४)

५. त्याने प्रीती केली (मार्क १०:२१; योहान ११:३६) त्याला कळवळा आला होता (मत्तय ९:३६).

६. त्याला राग येत होता व दु:ख होत होते (मार्क ३:४)

७. तो विव्हळ झाला (योहान ११:३३); तो रडला (योहान ११:३५; लूक १९:४१)

८. त्याला शरीर (योहान १:१४), जीव (मत्तय. २६:३८) आणि आत्मा (लूक. २३:४६) हे होते.

९. तो मृत्यु पावला (इब्री. ९:२७ आणि लूक २३:४६)

निष्कर्ष : देव आणि मनुष्य — हालेलूय्या! किती महान तारक!

## पाठ ९ : ख्रिस्ताचे जीवन, भाग १

आपल्या प्रभूच्या पृथ्वीवरील जीवनासंबंधी अनेक गोष्टी नोंदल्या आहेत.

१. देव म्हणून येशू ख्रिस्त सदैव अस्तित्वात आहे. सर्व गोष्टींच्या अगोदर तो होता.

२. कुमारी मरीयेच्या पोटी त्याचा जन्म झाला, ही घटना मत्तय व लूक यांनी लिहून ठेवली आहे.

३. आठव्या दिवशी त्याची सुंता झाली (लूक २:२१)

४. तो बारा वर्षांचा झाल्यावर त्याला यरुशलेमातील मंदिरात नेण्यात आले. (लूक २:४१—४८)

५. आपल्या आयुष्याची सुरुवातीची वर्षे त्याने नासरेथमध्ये सुतार म्हणून व्यतीत केली (मार्क ६:३).

६. सेवाकार्याच्या सुरुवातीचे सहा महिने त्याने यहूदा, शोमरोन व गालील प्रांतात सेवा केली.

७. सेवाकार्याच्या सहा ते आठ महिन्यांच्या दुसऱ्या टप्प्यात त्याने कफर्णहूम आणि गालील येथे सुवार्ताप्रसार केला, रोग्यांना बरे केले व निरनिराळे चमत्कार केले. त्याने केलेल्या चमत्कारांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे:

अ. निसर्गावर केलेले चमत्कार: मत्तय. ८:२६—२७

ब. भुतांवर केलेले चमत्कार: मार्क ५:१२—१३, मत्तय ८:२८—३२; ९:३२—३३; १५:२२—२८; १७:१४—१८; मार्क १:२३—२७.

क. रोगांवर केलेले चमत्कार— पक्षघात बरा केला—मत्तय ८:१३, ९:६. पंगु मनुष्याला बरे केले—योहान ५:९. वाळलेला हात बरा केला—मत्तय १२:१३. विकारापासून मुक्ति—लूक १३:१२. रक्तस्त्राव बंद केला—मत्तय ९:२२. जलोदर बरा केला—लूक १४:२. ताप बरा केला—मत्तय ८:१५. मुक्यास वाणी दिली—मत्तय ९:३३. आंधळ्यास दृष्टी दिली—योहान ९:१—३८. बहिऱ्यास बरे केले—मत्तय ११:५. कुष्ठरोग बरा केला—मत्तय ८:३, लूक १७:१.

येशूने कमीत कमी १० वेगवेगळ्या प्रकारचे आजार बरे केले.

ख मरणातून जीवंत केले— लाजारस (योहान ११:४३—४४), याईराची कन्या (मत्तय ९:१९—२६), नाईनमधील विधवेचा मुलगा (लूक ७:१२—१५).

ग इतर चमत्कार — पाण्याचा द्राक्षरस (योहान २:१—११), पाच हजारांना जेवण घालणे (योहान ६:१—१४), समुद्रावर चालणे (योहान ६:१५—२१), चार हजारांना

भोजन देणे (मत्तय १५:३२—३९), अंजिराच्या झाडाला शाप (मत्तय १७:२७), चमत्कारिकरीत्या मासे मिळू देणे (लूक ५:१—११, योहान २१:६).

घ त्याचे पुनरुथान हा सर्वांत मोठा चमत्कार होता (१ करिंथ १५:४, रोम १:४).

## पाठ १० : येशू ख्रिस्ताचे जीवन, समारोप

८. सेवाकार्याचा तिसरा टप्पा, गालील व आसपासच्या प्रदेशात साधारणत: एक वर्ष सेवा केली. लोकाचे थवे त्याच्या मागे चालले. त्याने 'डोंगरावरलें प्रवचन' केले (मत्तय अध्याय ५, ६, व ७).

९. या पुढच्या टप्प्यात, परूशी लोक त्याचा जीव घेण्यासाठी त्याला पकडण्याचा प्रयत्न करू लागले. या काळात त्याने कफर्णहूम, फेनिके, बेथसैदा, कैसरिया आणि फिलिप्पै येथे प्रवास केला व पुन्हा गालीलात आला.

१०. शेवटचे सहा महिने शिक्षण देण्यात, उपदेश करण्यात व प्रवासात व्यतीत केले.

११. शेवटच्या आठवड्यात झावळ्यांचा रविवार, शेवटचे भोजन, गेथशेमाने बाग, त्याची चौकशी आणि वधस्तंभावरील मरण यांचा समावेश होता.

१२. भविष्यसंदेशानुसार तो तीन दिवसानंतर पुन्हा उठला.

१३. पुनरुत्थानानंतर ४० दिवसांनी त्याचे स्वर्गारोहण झाले (प्रेषित १:१०, ११).

चर्चा —कोणत्या घटनांमुळे त्याच्या पृथ्वीवरील आयुष्यात त्याचे देवत्व दिसते? कोणत्या घटनामुळे त्याचे मनुष्यत्व दिसते?

## पाठ ११ : येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान

येशूच्या पुनरुत्थानाचा उल्लेख नव्या करारात १०४ वेळा आलेला असून, तो पवित्र शास्त्राचा पायाभूत सिद्धान्त आहे. ख्रिस्तीधर्म हा एकच धर्म आहे ज्याचा धर्मसंस्थापक जिवंत आहे.

१. पुनरुत्थानाचे पुरावे:

१. रिकामी कबर — मत्तय २८:६, लूक २४:३.

२. देवदूतांची साक्ष — मत्तय २८:४६, लूक २४:५—७.

३. पुनरुत्थानानंतर लोक त्याच्याशी बोलले — पेत्र, मरीया, क्लयपा व थोमा.

४. येशूने अन्नपाण्याचे सेवन केले व आपल्या जखमा दाखविल्या.

५. तो पाचशेपेक्षा अधिक जणांना एकाचवेळी दिसला — १ करिंथ १५:६.

६. स्तेफनाला दगडमार होतांना तो त्याला दिसला — प्रेषित ७:५६

७. दिमिष्काच्या वाटेवर तो पौलाला प्रगट झाला — प्रेषित ९:५

८. तो तारणारा आहे हे लाखों लोकांच्या जीवनांत दिसून आले (सिद्ध झाले) आहे.

९. इतर अनेक पुरावे — प्रेषित १:३.

२. पुनरुत्थित शरीर कसे होते?

१. त्याला हाडमांस होते — लूक २४:३९.

२. ते गौरवी शरीर होते — फिलिप्पै ३:२१.

३. त्याचे ते शरीर कधीही मृत्यू न पावणारे, अविनाशी होते — रोम ६:९

४. ते आत्मिक शरीर होते — १ करिंथ १५:४४.

निष्कर्ष : आज मृत्यु हा सर्वांत जास्त भयप्रद आणि पराभूत करणारा आहे, पण पुनरुत्थान हे अधिक समर्थी आहे. कारण ते मरणाची सत्ता पूर्णपणे उलथून टाकते.

# भाग तिसरा
# पवित्र आत्म्यासंबंधी सिद्धान्त

## पाठ १२ : पवित्र आत्म्याचे व्यक्तित्व

पवित्र आत्मा एक व्यक्ती आहे असे आम्ही कां म्हणतो? ह्याची काही कारणें पुढिलप्रमाणे आहेत.

१. पवित्र आत्म्याचा उल्लेख करण्यासाठी पवित्र शास्त्रामध्ये पुरूषवाचक सर्वनामांचा वापर केलेला आहे.

योहान १६:७—८, १३—१५ मध्ये पवित्र आत्म्यासाठी ग्रीक भाषेच्या 'तो' ह्या पुल्लिंगी सर्वनामाचा वापर केला आहे. तसेच योहान १५:२६ पण बघा.

२. त्याच्यामध्ये एका व्यक्तीमध्ये असणारी वैशिष्ट्ये आहेत:

१. इच्छाशक्ती — १ करिंथ १२:११

२. बुद्धिमत्ता — नहेम्या ९:२०; रोम ८:२७

३. ज्ञान — १ करिंथ २:१०—१२

४. शक्ती — प्रेषित १:८

५. प्रेम करण्याची क्षमता — रोम १५:३०

६. दु:ख किंवा शोक करण्याची क्षमता — इफिस ४:३०

३. एक व्यक्ती करू शकेल अशा गोष्टी तो करतो:

१. तो देवाच्या रहस्यांचा शोध करतो — १ करिंथ २:१०

२. तो बोलतो — प्रकटी २:७; आणि हाक मारतो — गलती ४:६

३. मध्यस्थी करतो — रोम ८:२६
४. साक्ष देतो — योहान १५:२६; योहान. १४:२६; १६:१२—१४.
५. मार्गदर्शन करतो व चालवतो — रोम ८:१४.
६. आज्ञा देतो — प्रेषित १६:६—७; काम, सेवा करण्यासाठी मानवांना पाचारण करतो व त्यांच्यांवर जबाबदाऱ्या सोपवतो — प्रेषित १३:२

तो अधिकृत सांत्वनदाता आहे — योहान १४:१६. "पॅरॅक्लेटॉस" या ग्रीक शब्दाचा अर्थ "सहकारी, सोबत करणारा" असा आहे. तो वैयक्तिक सांत्वनदाता आहे.

निष्कर्ष : पवित्र आत्मा हा व्यक्ती आहे, कारण तो विचार करतो, ध्येय व उद्देश बाळगतो, त्याला भावना आहेत, ज्ञान आहे, इच्छा करतो, प्रेम करतो, आणि शोक करतो व एक व्यक्ती करील अशी कामे करतो.

## पाठ १३ : पवित्र आत्म्याचे देवत्व

पवित्र आत्मा हा सर्वसमर्थ देव आहे. तो सर्व बाबतीत पिता व पुत्राशी समान आहे.

१. पवित्र आत्म्याची दैवी गुणवैशिष्ट्ये आहेत:

१. सार्वकालिक — इब्री ९:१४.
२. सर्वोपस्थित — स्तोत्र १३९:७—१०
३. सर्वसमर्थ — लूक १:३५; उत्पत्ति १:२
४. सर्वज्ञ — १ करिंथ २:१०, ११
५. पावित्र्य — लूक ११:१३
६. सत्य — १ योहान ५:७
७. सदिच्छा — नहेम्या ९:२०
८. सहभागिता — २ करिंथ १३:१४

२. फक्त देवच करू शकेल अशा गोष्टी पवित्र आत्मा करतो.

१. निर्मिती — ईयोब ३३:४
२. तारण — १ करिंथ ६:११; इफिस १:१३
३. जीवन देणे — योहान ६:६३
४. नवीन जन्मदाता — योहान. ३:५, ६
५. भविष्यसंदेश — २ पेत्र १:२१
६. धार्मिकतेविषयी, नीतिमत्त्वाविषयी व येणाऱ्या न्यायाविषयी लोकांची खातरी करतो — योहान १६:८—११.

अभ्यास : पवित्र आत्म्याविषयी वर सांगितलेल्या शास्त्र—संदर्भांना सोडून जुन्या करारातील इतर तीन संदर्भ सांगा.

## पाठ १४ : पवित्र आत्म्याची नावे व चिन्हें

१. पवित्र आत्म्याची काही नावें:

१. पवित्र आत्मा — लूक ११:१३.
२. कृपेचा आत्मा — इब्री १०:२९.
३. भस्म करणारा आत्मा — मत्तय ३:११—१२ आणि यशया ४:४.
४. सत्याचा आत्मा — योहान १४:१७; १५:२६; १६:१३; १ योहान ५:६.
५. जीवनाचा आत्मा — रोम ८:२
६. ज्ञान व शहाणपणचा आत्मा — यशया ११:२; ६१:१—२; लूक ४:१८.
७. अभिवचनाचा आत्मा — इफिस १:१३.
८. गौरवाचा आत्मा — १ पेत्र ४:१४
९. देवाचा आणि ख्रिस्ताचा आत्मा — १ करिंथ ३:१६; रोम ८:९.
१०. सांत्वनदाता — योहान. १४:१६.

२. पवित्र आत्म्याची प्रतीके

१. पाणी — योहान. ३:५; ७:३८—३९. पाणी सुपीक, ताजेतवाने, स्वच्छ करते. ते विनामुल्य दिले जाते व भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे.
२. अग्नी — मत्तय ३:११. अग्नी प्रकाश देतो, जाळतो, शुद्ध करतो व शोध घेतो.
३. वारा — योहान ३:८. वारा संजीवित करतो, तो सामर्थ्यवान, स्वतंत्र, अदृश्य पण परिणामकारक आहे.
४. तेल — स्तोत्र ४५:७. तेल पवित्र करते, सांत्वन देते, प्रकाशित करते व आरोग्य देते.
५. पाऊस व दंव — स्तोत्र ७२:६. पाऊस ताजेतवाने करतो, स्वच्छ करतो, भरपूर आहे व त्यामुळे फलोत्पादन होते.
६. कबुतर — मत्तय ३:१६. कबुतर सौम्य आहे.
७. आवाज — यशया ६:८. आवाज मार्गदर्शन व भाषण करतो व ताकीद देतो.
८. शिक्का — प्रकटी ७:२ आणि इफिस ४:३०. शिक्क्यामुळे सुरक्षितता लाभते व प्रमाणीकरण होते.

चर्चा : वरील प्रतिकांद्वारे दाखवलेली पवित्र आत्म्याची कार्ये ख्रिस्ती व्यक्तीसाठी महत्त्वाची कशी आहेत?

## पाठ १५ : पवित्र आत्म्याविरुद्ध अपराध

पवित्र आत्म्यासंबंधी होणारे काही अपराध अशे आहेत जे आविश्वासणाऱ्यांकडून होतात तसेच काही विश्वासणाऱ्यांकडून होतात. काही बाबतीत ते एकसारखेच घडतात. महत्त्वाची

गोष्ट ही आहे कीं पवित्र आत्म्याविरुद्ध पाप करणे हे भयानक असून त्याचे परिणाम भयंकर होतात.

१. अविश्वासणाऱ्यांकडून घडणारी पापे

१. पवित्र आत्म्याचा विरोध करणे — प्रेषित ७:५१.

२. पवित्र आत्म्याचा अपमान करणे — इब्री १०:२९.

३. पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करणे — मत्तय १२:३१—३२

२. विश्वासणाऱ्यांकडून होणारी पापे

१. पवित्र आत्म्याला खिन्न करणे — इफिस ४:३०—३१; यशया ६३:१०.

२. पवित्र आत्म्याशी लबाडी करणे — प्रेषित ५:३—४.

३. पवित्र आत्म्याला विझवणे — १ थेस्सल. ५:१९

निष्कर्ष : विरोध करण्याचा संबंध पवित्र आत्म्याच्या पुर्नजीवित करण्याच्या कार्याशी आहे. खिन्न करण्याचा संबंध अंत:करणात वास्तव्य करणाऱ्या पवित्र आत्म्याशी आहे. विझवण्याचा संबंध पवित्र आत्म्याद्वारे सेवेसाठी सामर्थ्य देण्याऱ्या कार्याशी आहे.

# भाग चौथा
# मानवाविषयीचा सिद्धान्त

## पाठ १६ : मानवाची मूळची स्थिती

मनुष्याला देवाच्या प्रतिरूपात व त्याच्या सादृश्यतेत बनविण्यात आले होते — उत्पत्ती १:२६ आणि ९:६. प्रतिरूप म्हणजे एखाद्या आकृतीची सावली किंवा रूपरेखा. सादृश्यता म्हणजे त्या सावलीचा त्या आकृतीशी सारखेपणा.

१. देवाचे प्रतिरूप म्हणजे शारीरिक सारखेपणा नव्हे, कारण देव आत्मा आहे.

२. मूळ मानव हुशार होता. त्याने प्राण्यांना नावें दिली (उत्पत्ती २:१९,२०). त्याला विचार करण्याची, बोलण्याची आणि युक्तिवाद करण्याची शक्ती होती.

३. त्याला नैतिक आणि आध्यात्मिक सामर्थ्य होते.

चर्चा : पूर्वीच्या पतनाअगोदरच्या मानवांसाठी जीवन आजच्या जीवनापेक्षा कसे वेगळे होते?

## पाठ १७ : मानवाचे पतन

ख्रिस्ती धर्माप्रमाणेच इतर धर्मातही मानवाच्या पतनाविषयी शिकविले जाते. उत्पत्तिच्या तिसऱ्या अध्यायात या भयानक शोकांतिकेचे समग्र वर्णन केलेले आहे.

ही घटना विश्वात पापाचा शिरकाव कसा झाला याविषयी सांगत नाही, कारण त्याअगोदरच सैतानाने पाप केले होते व त्याला स्वर्गातून खाली टाकण्यात आले होते (यहेज्केल २८:१२–१५ आणि यशया १४:९–१४). ही घटना, मानवामध्ये पाप कसे शिरले व त्याने आम्हा सर्वांना पापी कसे केले याविषयी सांगते.

१. पतनाचे काम करणारा — उत्पत्ति ३:१
   १. सैतान स्वतःच्या रूपात प्रगट न होता, एका सुंदर सापाच्या रूपात प्रकट झाला.
   २. त्याने हल्ला अश्या वेळी केला जेव्हा आदाम आणि एकमेकापासून दूर होते. — ऐक्यामध्ये सामर्थ्य असते.
   ३. त्याने योग्य त्या लालसांच्या, अभिलाषांच्या द्वारे हल्ला केला — ज्ञानाची आणि भुकेची इच्छा — पण त्यां लालसांवर नियंत्रण नव्हते.
२. पतनाकडे नेणाऱ्या पायऱ्या
   १. हवा झाडाच्या खूप जवळ होती — मोहाच्या ठिकाणापासून तिने दूर पळायला हवे होते.
   २. मना केलेल्या गोष्टीची ती प्रशंसा करत होती.
   ३. तिने सैतानाबरोबर संभाषण केले.
   ४. तिने देवाच्या वचनामध्ये फेरबदल केला. “त्याला स्पर्शीहि करू नका” हे आपल्या मनाचे शब्द तिने त्यात घातले. “यथेच्छ खा” हा शब्द तिने वगळला. तसेच “तूं खास मरशील” याऐवजी “मराल” असा शब्दप्रयोग करुन तिने देवाच्या आज्ञेची कठोरता कमी करण्याचा प्रयत्न केला. (उत्पत्ती २:१६–१७ आणि ३:२–३ यांची तुलना करा.)

चर्चा : लोकांना मोहात पाडण्याच्या कोणत्या युक्त्या आज सैतान वापरतो? त्यांच्यामध्ये खूप फरक पडला आहे की, त्या पूर्वीप्रमाणेच आहेत?

## पाठ १८ : पतनाचे परिणाम

१. ताबडतोब झालेले परिणाम:
   १. ते पापी झाले — त्यांचे आध्यात्मिक जीवन मृत झाले – इफिस २:१.
   २. त्यांचे डोळे उघडले आणि ते नग्न आहेत, हे त्यांच्या लक्षात आले.
   ३. ते देवाच्या समक्षतेपासून लपले — पाप मानवाला देवापासून विभक्त करते.
२. देवाने शाप दिले — उत्पत्ती ३:१४–१९
   १. सापाला — सर्व ग्रामपशू व वनचर यांच्यापेक्षा जास्त शापित केले.
   २. स्त्रीला — गर्भधारणेत खूप दु:ख व वेदना.
   ३. पुरुषाला — काटे आणि कुसळे उगविण्याविषयी जमिनीला शाप. त्याचे आयुष्य

दु:खाने भरले, घाम गाळून पोट भरणे आणि ज्या मातीतून तो आला त्या मातीलाच तो परत मिळेल.

३. अनुषंगिक परिणाम :

१. सर्वलोक देवासमोर पापी आहेत — रोम ५:१२.

२. सर्व जग दंडाज्ञेखाली आहे — रोम ३:१९

३. नव्याने जन्म न पावलेले सर्व सैतानाची मुले आहेत, देवाची नाहीत — योहान ८:४४.

४. सर्व मानवजात सैतानाची गुलाम बनली आहे — २ करिंथ ४:४.

५. मानवाच्या आध्यात्मिक नैतिक, मानसिक, शारीरिक स्वभावावर पापाचा परिणाम झाला आहे — इफिस ४:१८; रोम ७:१८.

निष्कर्ष : मानवाचे पतन झाल्याबरोबर देवाने तारणारा व उद्धाराच्या योजनेचे अभिवचन दिले (उत्पत्ती ३:१५). सुभारे ४००० वर्षानंतर देवाने काल्हवरीवर हे अभिवचन पूर्ण केले.

# भाग पाचवा
# तारणाविषयीचा सिद्धान्त

## पाठ १९ : पश्चात्ताप

पश्चात्ताप हा पवित्र शास्त्रातील अतिशय महत्त्वाचा विषय असून त्याचा उल्लेख १०० पेक्षा अधिक वेळा करण्यात आलेला आहे.

१. पश्चात्तापाची व्याख्या :

१. नकारात्मक — पश्चात्ताप म्हणजे पापासाठी फक्त दु:ख करणे नव्हे. अनेकजण पापासाठी दु:ख, शोक करतात, पण पुन्हा पापाकडे वळतात, फिरतात. यहूदा इस्कर्योत आणि एसाव (इब्री १२:१७) यांनी पापासाठी दु:ख व्यक्त केले, पण त्यांनी पश्चात्ताप केला नाही.

२. होकारात्मक — पश्चात्ताप हा मनात होणारा बदल असून त्यामुळे वागणुकीत बदल होतो (मत्तय २१:२८–३२).

२. पश्चात्तापाचे महत्त्व :

१. पश्चात्ताप हे बाप्तिस्मा करण्याऱ्या योहानाचे ध्येयवाक्य होते — मत्तय ३:१–२.

२. येशूने पश्चात्तापाची शिकवण दिली — मत्तय ४:१७.

३. पश्चात्तापाविषयी शिक्षण द्यावे, उपदेश करावा अशी त्याने आपल्या शिष्यांना

आज्ञा दिली — मार्क ६:१२.

४. पेन्टेकॉस्टनंतर शिष्यांनी पश्चात्तापाविषयी शिकवण्यास, उपदेश करण्यास सुरुवात केली — प्रेषित २:३८ आणि प्रेषित २०:२१.

५. सर्वांनी पश्चात्ताप करवा, अशी देवाची इच्छा आहे — २ पेत्र ३:९.

६. देवाची ही आज्ञा पाळण्याकडे दुर्लक्ष केल्यास सार्वकालिक नाश होईल — लूक १३:३.

३. पश्चात्तापाचे परिणाम

१. संपूर्ण स्वर्गाला आनंद होतो — लूक १५:७, १०.

२. पापाची क्षमा व माफी मिळते — यशया ५५:७, आणि प्रेषित ३:१९.

३. पश्चात्ताप करणाऱ्यांवर पवित्र आत्म्याचा वर्षाव होतो — प्रेषित. २:३८.

अभ्यास : वर उल्लेख केलेल्या मुद्दयापैंकी एकाचा उपयोग करुन पश्चात्ताप या विषयावर उपदेशाची रूपरेखा तयार करा.

## पाठ २० : विश्वास

ख्रिस्ती विश्वासांगिकार आणि सदाचार यासाठी विश्वास हा मूलभूत घटक आहे. कारण आपला उद्धार विश्वासानेच झाला आहे — इफिस. २:८. लोकांशी संभाषण करताना आणि त्यांना आरोग्य देत असताना, त्या प्रत्येकामध्ये विश्वास आहे का नाही, हे येशू ख्रिस्त पाहत असे. त्यांपैकी एखादी घटना तुम्हांला आठवते का?

१. सुरफूनिकी स्त्रीच्या ठायी टिकणारा विश्वास होता — मार्क ७:२६.

२. शत्पतीने नम्र विश्वास दाखविला — मत्तय ८:८–१०.

३. आंधळया माणसाने कळकळीचा, उत्सुक विश्वास दाखविला — मार्क १०:५१.

१. विश्वासाची व्याख्या :

१. विश्वास हा भरवसा, श्रद्धा, इमानीपणा, एकनिष्ठा (इब्री ११:१) आहे. ज्या विश्वासाने उद्धार मिळतो तो प्रभू येशूवर वैयक्तिकरित्या ठेवलेला भरोसा असतो.

२. तारणाच्या संदर्भात विश्वासाचे दोन प्रकार आहेत:

अ. बौद्धिक विश्वास — येशू ख्रिस्ताच्या ऐतिहासिक अस्तित्वाचे ज्ञान व पवित्र शास्त्राचा सर्वसाधारणपणे स्वीकार करणे.

ब. अंत: करणातील विश्वास — अंत करणापूर्वक ठेवलेल्या विश्वासामुळे माणसाला त्या विश्वासानुसार कृती करण्यास चालना मिळते. येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे म्हणजे त्याचा स्वीकार करणे — योहान १:१२ आणि कलस्सै २:६. केवळ ज्ञान किंवा कबूल करणे म्हणजे खरा विश्वास नाही. खरा विश्वास

म्हणजे त्यानुसार वर्तणूक करणे.

२. विश्वासाचे काही परिणाम :

१. आपले तारण विश्वासाने झाले — उत्पत्ती १५:६; रोम ५:१; गलती ३:२६.

२. विश्वासाद्वारे आपले पवित्रीकरण झाले — प्रेषित २६:१८.

३. विश्वासाद्वारे विसावा, शांती, खात्री आणि आनंद मिळाले आहे. यशया २६:३; फिलिप्पै ४:६; इब्री ४:१—३; १ पेत्र १:५.

४. विश्वासाद्वारे देवासाठी आम्ही महत्कृत्ये करीतो — इब्री ११:३२—४०; मत्तय. २१:२१; योहान १४:१२.

चर्चा : बौद्धिक विश्वासाची आणि अंत:करणापासून ठेवलेल्या विश्वासाची, तुम्हांला आठळलेली काही उदाहरणे द्या.

## पाठ २१ : पुनरुत्पत्ति अथवा नवा जन्म

नवा जन्म याशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गानी ख्रिस्ती होता येत नाही.

१. नवा जन्म म्हणजे काय?

१. नवा जन्म म्हणजे बाप्तिस्मा नाही. बाप्तिस्मा हा विधी, एखाद्या व्यक्तिने ख्रिस्ताचा स्वीकार केला आहे हे जाहीर करण्यासाठी आहे.

२. नवा जन्म म्हणजे सुधारणा नव्हे. सुधारणा ही एखाद्या पापापासून दूर जाण्याची मानवी पद्धत आहे, तर नवा जन्म आध्यात्मिकरित्या नव्याने जन्मणे, एक क्रांती असून ते देवाचे अलौकिक काम आहे.

३. पुनरुत्पत्ति, नवीकरण म्हणजे आध्यात्मिकरित्या नवा जन्म, नवी उत्पत्ति — २ करिंथ ५:१७; इफिस २:१.

२. नव्या जन्माची आवश्यकता

१. प्रत्येकाचा नव्याने जन्म झाला पाहिजे. याला काही अपवाद नाही. योहान ३:३—७; गलती ६:१५.

२. मानवाच्या पापी अवस्थेची ती गरज आहे — योहान ३:६; यिर्मया १३:२३; रोम ७:१८; ८:८.

३. देवाचे पावित्र्य त्याची मांग करते — इब्री १२:१४.

३. नव्या जन्माचे मार्ग

१. नवा जन्म हे दैवी कार्य आहे. — योहान १:१३; तीत ३:५; योहान ३:५. ते सर्वस्वी व पूर्णपणे देवाचे कार्य आहे.

२. यात मानवी बाजूदेखील आहे — योहान १:१२ आणि १३ यामध्ये दोन्हीं बाबींना

— दैवी आणि मानवी — एकत्र आणले आहे : “जितक्यांनी त्याचा स्वीकार केला . . . त्यांचा जन्म . . . देवापासून झाला.”

निष्कर्ष : शुभवर्तमानाचा संदेश स्वीकारल्याने (१ करिंथ ४:१५; याकोब १:१८; १ पेत्र १:२३), आणि येशू ख्रिस्ताचा वैयक्तिकरित्या स्वीकार केल्याने (योहान १:१२, १३ आणि गलती. ३:२६) मनुष्याचा नवा जन्म होता.

## पाठ २२ : नीतिमान ठरविले जाणे

१. अर्थ :

नीतिमान ठरविले जाणे म्हणजे मानवाचा देवा समोर असलेला संबंध बदलणे. नव्या जन्माचा संबंध विश्वासणाऱ्याचा स्वभाव बदलण्याशी असतो, तर नीतिमत्त्वामुळे त्याचा देवासमोर असलेला संबंध बदलतो. नीतिमान ठरविले जाणे माफी देण्यापेक्षा अधिक आहे, ते संबंधित व्यक्ति ही नीतिमान आहे असे जाहीर करणे आहे.

नीतिमान ठरविले जाणे ही देवाची न्यायीपणाची कृती आहे, जे येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतात, ते देवाच्या दृष्टीमध्ये धार्मिक आणि पाप व दोषापासून मुक्त ठरवले जातात.

२. नीतिमान ठरविले जाण्यामध्ये दोन गोष्टींचा समावेश आहे

१. पापांची क्षमा व त्याच्या सर्व दोषांपासून आणि शिक्षेपासून सुटका — मीखा ७:१८, १९; प्रेषित १३:३८; रोम ८:१, ३३, ३४.

२. ख्रिस्ताच्या धार्मिकतेचे कलम केले जाते (ख्रिस्ताची धार्मिकता दिली जाते) व देवाच्या दृष्टीने धार्मिक, नीतिमान ठरविले जाते — २ इति. २०:७; याकोब. २:२३; रोम ५:१७—२१.

३. नीतिमान ठरविले जाण्याची पद्धत

१. नकारात्मक : नियमशास्त्राच्या कृत्यांनी नव्हे — रोम ३:२० व २८; गलती. २:१६ व ३:१०.

२. होकारात्मक : देवाच्या विनामूल्य कृपेने — रोम. ३:२४.

३. येशू ख्रिस्ताच्या रक्ताने —नीतिमान ठरवण्याऱ्या कृपेने — रोम ३:२४; ५:९; २ करिंथ ५:२१; इब्री ९:२२.

४. येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने — ही नीतिमान ठरवण्याची अट आहे — गलती २:१६, रोम ३:२६, गलती ३:१०, प्रेषित १३:२९.

चर्चा : नीतिमान ठरविले जाणे हे क्षमेपेक्षा निराळे कसे आहे?

## पाठ २३ : दत्तक

१. दत्तकपणाचा अर्थ

"दत्तक"' म्हणजे "पुत्रा चे स्थान देणे." रोमी लोकांनी वापरलेला हा कादेशीर शब्द आहे. याचा अर्थ दुसऱ्याचे संतान स्वताचे म्हणून घेणे होतो. त्या कृतीमध्ये दत्तक घेतले गेलेल्या बालकाला जन्माद्वारे मिळणारे सर्व हक्क मिळतात. गलती ४:५; रोम ८:१५,२३; ९:४ आणि इफिस १:५ पाहा.

दत्तकपणाचा पवित्र शास्त्रातील अर्थ व त्याचा वापर यांची निर्गम २:१० व इब्री ११:२४ ही अतिशय सुंदर उदाहरणे आहेत.

२. दत्तकपणाचे काही आशीर्वाद :

— देवाचे विशेष प्रेम आम्हांस मिळते (योहान १७:२३) आणि
— पिता या नात्याने तो आमची काळजी घतो (लूक १२:१७—३३).
— आम्हांस देवाच्या कुटुंबाचे नाव (१ योहान ३:१, इफिस ३:१४, १५),
— कुटुंबाचा सारखेपणा (रोम ८:२९),
— कोटुंबिक प्रेम (योहान १३:३५, १ योहान ३:१४);
— दत्तकपणाचा आत्मा (रोम ८:१५, गलती ४:६) आणि
— कौटुंबिक सेवा (योहान १४:२३, २४; १५:८) मिळते.
— पित्याच्या नात्याने तो आम्हांस शुद्ध करतो (इब्री १२:५—११); व
— आम्हांस पैतृक सांत्वना (यशया ६६:१३, २ करिंथ १:४), आणि
— वारसहक्क (१ पेत्र १:३—५; रोम. ८:१७) मिळतो.

३. पुत्रत्वाचा पुरावा:

ज्या लोकांना देवाच्या कुटुंबात दत्तक घेतले आहे ते:
— आत्म्याच्या प्रेरणेने चालविलेले असतात (रोम ८:४; गलती ५:१८).
— त्यांचा देवावर बालकासारखा विश्वास असतो (गलती ४:५, ६).
— त्यांना देवाच्या ठायी जाण्यासाठी मोकळीक आहे (इफिस ३:१२).
— ते बंधूंवर प्रीती करतात (१ योहान २:९—११, ५:२).
— ते आज्ञा पाळणारे आहेत (१ योहान ५:१—३).

चर्चा : देवाचे मूल असणे व देवाचा सेवक असणे यात काय फरक आहे?

## पाठ २४ : पवित्रीकरण

पवित्रीकरणाचा संबंध आमचे चारित्रय व वागणूक यांच्याशी आहे. नीतिमान ठरविणे हे ते कार्य आहे जे देव आमच्यासाठी करतो, तर पवित्रकरण हे काम देव आमच्यामध्ये करतो.

१. पवित्रीकरणाचा अर्थ:

या व्याख्येत दोन विचार आहेत.

१. दुष्टाईपासून वेगळे होणे — २ इतिहास २९:५, १५—१८; १ थेस्सल. ४:३. पवित्रीकरणाचा संबंध देह व मन (आत्मा) यांना मलीन करणाऱ्या सर्व गोष्टींकडे पाठ फिरविण्याशी आहे.

२. देवाला समर्पित होणे — लेवीय २७:१४, १६; गणना ८:१७, योहान १०:३६. जे सर्व काही देवाच्या सेवेसाठी पूर्णांशाने, सर्वतोपरी दिले जाते, त्याचे पवित्रीकरण केले गेले आहे.

३. देव त्याचा वापर करतो — यहेज्केल ३६:२३.

२. पवित्रीकरणाचा समय:

पवित्रीकरण तीन प्रकारांत दिसते: भूतकालीन, वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन पवित्रीकरण किंवा तात्कालीक (ताबडतोब होणारे), क्रमशः होणारे व पूर्ण पवित्रीकरण.

१. तात्कालीक — १ करिंथ ६:११; इब्री १०:१०, १४. ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याच्या साध्यासुध्या कृतीद्वारे विश्वासणाऱ्याच्या पवित्रीकरणाची प्रक्रिया सुरू होते.

२. क्रमशः किंवा हळूहळू होणारे — २ पेत्र ३:१८; २ करिंथ ३:१८; १ थेस्सल ३:१२. आमच्या पवित्रतेचा अथवा गौरवाचा दर्जाही वाढत जातो.

३. पूर्ण आणि अंतिम पवित्रीकरण — १ थेस्सल ५:२३; ३:१३.

३. पवित्रीकरणाचे मार्ग:

पवित्रीकरणाची साधने ही दैवी आणि मानवी अशी दोन्ही प्रकारची आहेत : इच्छित हेतू साध्य होण्यासाठी मानव आणि देव हे दोघेही एकत्रितपणे कार्य करतात.

१. देवाच्या बाजूने, हे त्रिएक देवाचे काम आहे:

— देव पिता — १ थेस्सल ५:२३—२४; योहान. १७:१७

— येशू ख्रिस्त—पुत्र — इब्री १०:१०; इफिस ५:२५, २७; १ करिंथ १:३०.

— पवित्र आत्मा — १ पेत्र १:२; २ थेस्सल २:१३.

२. मानवी बाजू

— येशू ख्रिस्ताच्या मुक्तीच्या, उद्धाराच्या कार्यावर विश्वास करणे — १ करिंथ १:३०. पवित्र जीवनाचे रहस्य येथे सांगितले आहे : सर्व गरजांसाठी येशू ख्रिस्ताच्या कृपेच्या समृद्धीवर विश्वास ठेवणे व प्रत्येक क्षण त्यावर अवलंबून राहणे.

— पवित्र शास्त्राचा अभ्यास करणे व त्याचे आज्ञापालन करणे — योहान १७:१७; इफिस ५:२६,२७; योहान १५:३.

चर्चा : पवित्रीकरणामधील वेळ या घटकाविषयी म्हणजे प्रत्येक प्रक्रिया कधी सुरू होते, याविषयी चर्चा करा.

## पाठ २५ : प्रार्थना

प्रार्थनेशिवाय विश्वासणाऱ्याचे आध्यात्मिक जीवन टिकूच शकत नाहीं. प्रार्थना हा विश्वासणाऱ्यांसाठी अत्यावश्यक असा श्वास आहे.

१. प्रार्थनेचे महत्त्व :

   १. प्रार्थना टाळणे म्हणजे प्रभूला दुखवणे
      — यशया ४३:२१—२२; ६४:६—७.
   २. प्रार्थनेच्या अभावाने अनेक संकटे, दुष्टता येतात
      — सफन्या १:४—६; दानी. ९:१३—१४.
   ३. प्रार्थनेकडे दुर्लक्ष करणे हे पाप आहे
      — १ शमुवेल १२:२३.
   ४. सतत, अखंड प्रार्थना करा, अशी आज्ञा आहे
      — कलस्सै ४:२; १ थेस्सल ५:१७.
   ५. देवाकडून दाने, देणग्या मिळवण्यासाठी प्रार्थना करावी ही देवाची पद्धत आहे
      — दानी. ९:३०; मत्तय ७:१७; ९:२४—२९; लूक ११:१३.
   ६. प्रेषितांनी प्रार्थनेला आपली अतिशय महत्त्वाची कृती मानले होते
      — प्रेषित ६:४; रोम १:९.

२. प्रार्थना कशी करावी ?

   प्रार्थनेत कमीत कमी चार भाग असावेत
   — ACTS हा शब्द लक्षात ठेवा.
   १. Adoration – उपासना – देवाची स्तुती व उपासना करणे — स्तोत्र १५:६.
   २. Confession – पाप—कबुली – माहीत असलेल्या सर्व पापांचा पश्चात्ताप करणे — स्तोत्र ३२:५.
   ३. Thanksgiving – उपकारस्तुती करणे – फिलिप्पै ४:६.
   ४. Supplication – नम्र अर्ज, विनंती – मध्यस्थी, विनंत्या, इच्छा सादर करणे — १ तीमथ्य २:१.

३. प्रार्थनेतील अडथळे :

   १. अविश्वास —याकोब १:६—७
   २. क्षमा न करण्याचा आत्मा — मार्क ११:२५.
   ३. दुष्टता — स्तोत्र ६६:१८.

४. चुकीने मागणे — याकोब ४:३.

४. प्रार्थनेची काही अभिवचने :

मार्क ११:२४; योहान १५:७, १ योहान ५:१४, १५; इफिस ३:१२, २०; फिलिप्पै ४:६, १९; मत्तय ७:७, ८; लूक ११:९–१३; इब्री ४:१६.

चर्चा : अलीकडे तुमच्या कोणत्या प्रार्थनांची उत्तरे तुम्हांला मिळाली? आता तुम्ही कशासाठी प्रार्थना करीत आहा?

# विभाग सहावा
# मंडळीविषयक सिद्धान्त

## पाठ २६ : मंडळीची व्याख्या आणि स्थापना

या काळातील देवाचे महत्त्वपूर्ण कार्य मंडळीला एकत्र करणे आहे.

१. मंडळीची व्याख्या :

१. ख्रिस्ती मंडळी ही पेन्टेकॉस्टनंतर सुरू झालेली नव्या करारातील संस्था आहे. येशू ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी मंडळीला वर उचलले जाईल, तेव्हा बहुधा तिचा शेवट होईल.

२. एक्लेसिया या ग्रीक शब्दापासून मंडळी किंवा चर्च हा शब्द आलेला असून, त्याचा अर्थ “वेगळे केलेले, बोलावलेले” असा होता. ख्रिस्ती लोक हे “ख्रिस्तामध्ये” राहण्यासाठी जगातून वेगळे केलेले आहेत (१ करिंथ. १:२).

३. विश्वासणाऱ्यांच्या स्थानिक गटालाही मंडळी असे म्हणता येईल — कलस्सै ४:१५.

४. सार्वत्रिक मंडळी असाही त्याचा अर्थ होतो — १ करिंथ १५:९. सर्वत्र असलेल्या ख्रिस्ती लोकांचा या व्याख्येमध्ये समावेश होतो.

५. ज्या लोकांची नावे मंडळीच्या सभासद नोंदणीपुस्तकात नोंदली गेली आहेत, मग त्यांचे तारण झालेले असो वा नसो, त्या लोकांची बनलेली मंडळी ही दृश्य स्वरूपातील मंडळी आहे. ज्यांची नावे कोकऱ्याच्या पुस्तकात लिहिलेली आहेत, ज्यांचे तारण झालेले आहे, त्यांची मिळून बनलेली मंडळी ही अदृश्य मंडळी आहे — प्रकटी २१:२७.

६. आध्यात्मिक युद्धात लढणारी मंडळी ही पृथ्वीवरील खरी मंडळी आहे, तर विजीय मंडळी म्हणजे स्वर्गात असणारी मंडळी.

२. मंडळीची स्थापना

१. येशू हा देवाचा पुत्र—मशीहा होता, या पेत्राने दिलेल्या कबुलीवर (मत्तय १६:१६—१८) येशू ख्रिस्ताने मंडळीची स्थापना केली. आपल्या तारकाने मंडळीची स्थापना पेत्रावर केली नाही, तर पेत्राने जे सत्य सांगितले, घोषित केले त्या सत्यावर त्याने मंडळी स्थापन केली.

२. ऐतिहासिक दृष्ट्या मंडळीची स्थापना पेन्टेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्म्याचा वर्षाव झाल्यावर झाली. प्रेषित अध्याय २. तसेच प्रेषित १:१३; २:४७; २:४६; ५:१२; १२:१२ हे शास्त्रभाग पाहा.

चर्चा : "मंडळी किंवा चर्च" या शब्दाचे निरनिराळे कोणते अर्थ होतात?

## पाठ २७ : मंडळीचे सभासदत्व आणि मंडळीचा उद्देश

१. मंडळीतील सभासदत्वाच्या अटी:

१. पश्चात्ताप करणे — प्रेषित २:३८.

२. येशू ख्रिस्त हा तारक, प्रभू आणि देवाचा पुत्र आहे, असा विश्वास धरणे — मत्तय १६:१६—१८.

३. तारण, पुनरुज्जीवन, नवा जन्म पावणे — प्रेषित २:४७.

४. त्रैक्य परमेश्वराच्या नावाने बाप्तिस्मा घेणे — प्रेषित २:३८.

५. प्रेषितांच्या सिद्धांतांमध्ये अनवरत रहाणे— प्रेषित २:४२.

२. मंडळीचा उद्देश

१. पृथ्वीवर ख्रिस्ताची आराधना आणि गौरव करणे — इफिस १:४—६.

२. संपूर्ण जगात सुवार्ताप्रसार करणे — मत्तय २८:१९—२०; मार्क १६:१५.

३. ख्रिस्ती लोकांना शिक्षण देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी — इफिस ४:११—१५; १ थेस्सल ५:११; १ करिंथ १२:१—३१.

४. सातत्याने साक्ष देण्यासाठी — प्रेषित १:८.

चर्चा : मंडळीच्या सभासदत्वाविषयी सर्वसामान्यपणे कोणत्या चुका केल्या जातात?

## पाठ २८ : मंडळीची प्रतिके आणि विधी

१. मंडळीची पवित्र शास्त्रातील प्रतिके:

१. शरीर — ख्रिस्त हा मस्तक असून आपण त्याच्या शरीराचे अवयव आहोत — कलस्सै १:१८; २:१९; इफिस १:२२, २३.

२. मंदीर, इमारत, देवाच्या आत्म्याचे निवासस्थान — इफिस २:२०, २१. ख्रिस्त

हा कोनशिला असून आपण इमारतीचे निरनिराळे भाग आहोत.

३. ख्रिस्ताची वधू — २ करिंथ ११:२. ख्रिस्त हा वर आहे — योहान ३:२९. प्रकटी १९:७–८ मध्ये सांगितल्यानुसार विवाहविधी होईल.

२. मंडळीचे विधी:

१. बाप्तिस्मा — मत्तय २८:१९, २०; मार्क १६:१६; प्रेषित २:३८–४१; ८:३६–४०; १०:४७, ४८.

२. प्रभुभोजन — प्रेषित २:४२–४६; २०:७, १ करिंथ ११:२०–३४.

चर्चा : वर उल्लेख केलेल्या प्रतिकांनुसार, मंडळीचा सभासद असणे म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण करा.

# भाग सातवा
# पवित्र शास्त्राविषयीचा सिद्धान्त

## पाठ २९ : पवित्र शास्त्राची प्रेरणा

१. पवित्र शास्त्रासंबंधी काही खरी माहिती:

१. पवित्र शास्त्र हे ६६ पुस्तकांचे ग्रंथालय आहे. त्यातील जुन्या करारात ३९, तर नव्या करारात २७ पुस्तके आहेत.

२. जगातील निरनिराळया भागातील निरनिराळया प्रकारच्या ३६ ते ४० लेखकांनी हे पुस्तक १६०० वर्षांच्या काळात लिहिले आहे.

३. जुना करार मुळात इब्री भाषेत लिहिला असून त्यातील दानीएल व एज्रा ही पुस्तके अरेमिक भाषेत लिहिली होती. नवा करार ग्रीक भाषेत लिहिला होता.

४. सध्या अस्तित्वात असणाऱ्या पुस्तकांमध्ये पवित्र शास्त्र हे सर्वांत जुने पुस्तक आहे. तो लिहिण्यासाठी १६ शतके लागली. शेवटचा लेखक जन्मण्याच्या १४५० वर्षें अगोदर पहिला लेखक मरण पावला होता.

२. प्रेरणेचा अर्थ :

१. ग्रीकमधील "थिओप्नुटास" या शब्दाचे हे भाषांतर आहे. थिओप्नुटास या शब्दाचा अर्थ देवाने प्रेरित केलेले (थिओ म्हणजे देव व प्नुटास म्हणजे प्रेरित केलेले.) २ तीमथ्य ३:१६.

२. पवित्र आत्म्याने संचारित झालेल्या देवाच्या पवित्र जनांनी देवाच्या आज्ञेप्रमाणे हे लिहिले आणि त्यांच्या लेखनाला दोषविरहीत ठेवले गेले.

३. पवित्र शास्त्र प्रेरणेचा दावा करते:

१. आपल्या लिहिणाऱ्यांसाठी — २ पेत्र १:२१.
२. आपल्या लिखाणासाठी — २ तीमथ्य ३:१६.
३. आपल्या शब्दांसाठी — १ करिंथ २:१३, २ पेत्र ३:२.

चर्चा — पवित्र शास्त्राच्या कोणत्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे तुम्ही प्रभावित झाला आहात?

## पाठ ३० : पवित्र शास्त्राविषयीची दोन सप्तके

१. पवित्र शास्त्रासंबंधी सर्वश्रेष्ठ सात आश्चर्ये:

१. त्याच्या घडणीतील आश्चर्य — एक पुस्तक एका भाषेत एका ठिकाणी लिहिले गेले, तर दुसरे पुस्तक अन्य देशात, अन्य भाषेत व अन्य शतकात लिहिले गेले.
२. त्याच्या ससंगतपणाचे आश्चर्य — ६६ पुस्तकांचे हे ग्रंथालय आहे, तरीदेखील हे एकच पुस्तक आहे. याचा लेखकही एकच म्हणजे पवित्र आत्मा असून या पुस्तकात विसंगती नाही.
३. काळाचे आश्चर्य — सर्व पुस्तकांपेक्षा हे पुस्तक प्राचीन आहे.
४. विक्रीचे आश्चर्य — हे नेहमीच सर्वाधिक खपाचे पुस्तक आहे.
५. अभिरुचीचे आश्चर्य — हे एकमेव पुस्तक असे आहे जे सर्व मानवजातीतील लहानथोर, सर्व वयाचे लोक वाचतात.
६. भाषेचे आश्चर्य — ह्यातील बहुतांश लिखाण अशिक्षित माणसांनी केले आहे तरीदेखील ह्या पुस्तकाला साहित्याची उत्कृष्ट कृती समजले जाते.
७. त्याच्या जपणूकीचे आश्चर्य — वेळोवेळा, राजे आणि सरकारे यांनी त्याला जाळून टाकण्याचा व त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला, पण देवाने त्याचे आमच्यासाठी रक्षण केले व आज ते बहुतेक सर्व घरांमध्ये आठळते.

२. देवाचे वचन स्पष्ट करण्यासाठी वापरलेली सात प्रतिके :

१. तरवार — ऐकणाऱ्याचा गुन्हा शाबित करून त्याला दोषी ठरवते, इब्री ४:१२.
२. हातोडी — ऐकाणाऱ्याचा विरोध मोडते, यिर्मया २३:२९.
३. बीज — जीवंत वचन, ऐकणाऱ्यास नवजीवन देते, १ पेत्र १:२३,२५.
४. आरसा — स्वतःचे परिक्षण करावयास लावते, याकोब १:२३,२५.
५. अग्नी — ऐकणाऱ्याची मलीनता जाळून टाकते, यिर्मया २०:९, २३:२९.
६. दिवा — प्रत्येक दिवशी विश्वासणाऱ्यांचे मार्गदर्शन करते, मार्ग दाखवते, स्तोत्र ११९:१०५.

७. अन्न — आत्म्याला तृप्त करते, १ पेत्र २:२; १ करिंथ ३:२; रोम १०:१७.

स्वाध्याय — देवाच्या वचनासाठी योजलेल्या प्रतिकांपैकी एकावर उपदेश तयार करा.

## पाठ ३१ : देवाचे वचन का सांगावे?

१. पापाची जाणीव — देवाच्या वचनाच्या प्रचाराने पापाची जाणीव होते. प्रेषित २:१४—३७. पेंटेकॉस्टच्या दिवशी पेत्राने केलेल्या उपदेशांत २३ पैकी ९ वचने जुन्या करारातून घेतलेली होती.

२. विश्वास — देवाचे वचन ऐकण्यामुळे विश्वास होतो, रोम १०:१७.

३. शुद्धता — वचन ऐकण्यामुळे शुद्धता मिळते, २ करिंथ ७:१. अभिवचने ही देवाची वचने आहेत.

४. खात्री — देवाच्या वचनामुळे खात्री होते, १ योहान ५:१३

५. सांत्वन — देवाच्या वचनाद्वारे सांत्वन मिळते, १ थेस्सल ४:१८. (येथे 'वचनांनी' ह्याचा इशारा पवित्र शास्त्रात लिहिलेल्या शब्दांकडे आहे.)

६. सत्य — देवाच्या वचनापासून सत्य येते, प्रेषित १७:११

७. नवीन जन्म — देवाच्या वचनामुळे नवीन जन्म मिळतो, १ पेत्र १:२३.

निष्कर्ष : प्रभू येशू ख्रिस्त व पवित्र आत्मा यानंतर देवाने जगाला दिलेली तिसरी मोठी देणगी पवित्र शास्त्र ही आहे.

# भाग आठवा
# देवदूतांविषयी सिद्धान्त

## पाठ ३२ : पवित्र शास्त्र देवदूतांविषयी काय सांगते?

१. त्यांचे अस्तित्व :

   १. देवदूत हा शब्द पहिल्यांदा उत्पत्ती १६:७ मध्ये, हागारेला सारेने छळल्यानंतर प्रभूने तिला दर्शन दिले तेव्हा आढळतो.

   २. जुन्या करारात देवदूतांविषयी अनेक संदर्भ आहेत — स्तोत्र १०३:२०; १०४:४; दानीएल १०:१२, १३; २ शमुवेल १४:२०; २४:१५, १६; स्तोत्र १०३:२०; २ राजे १९:३५.

   ३. देवादूतांच्या अस्तित्वावर येशूचा विश्वास होता. मत्तय १८:१०; मार्क १३:३२ व ८:३८; मत्तय १३:४१, २६:५३.

४. पौल व इतर शिष्यांचा देवादूतांच्या अस्तित्वावर विश्वास होता, २ थेस्सल १:१७; कलस्सै २:१८; योहान १:५१; प्रकटी. १२:७; २२:९; १ पेत्र ३:२२; २ पेत्र २:११; यहूदा ९.

२. देवदूतांचे स्वरूप

१. ते निर्माण केलेले आहेत, मृतांचे आत्मे नाहीत, कलस्सै १:१६.

२. ते आत्मे आहेत. स्तोत्र १०४:४, तरी काही वेळा ते दृश्य रूपात प्रगट होतात, उत्पत्ती १९; शास्ते २:१; ६:११—२२; मत्तय १:२०; योहान २०:१२.

३. ते बलवान आहेत, स्तोत्र १०३:२०; २ राजे १९:३५; २ शमुवेल २४:१५, १६.

४. ते अमर आहेत, लूक २०:३५, ३६.

५. ते अगणित आहेत, प्रकटी ५:११; इब्री १२:२२; मत्तय २६:५३.

३. देवदूतांचे पतन:

मूळात सर्व देतदूत चांगले असे निर्माण केले गेले होते, पण काहींचे पतन झाले. २ पेत्र २:४; यहूदा ६. त्यांच्या पतनाचे नक्की कारण माहीत नाही. कदाचित गर्व, अवज्ञा किंवा सैतानाच्या पतनाला कारणीभूत ठरलेली पापे असतील. यहेज्केल २८.

चर्चा — सैतानाच्या पतनाविषयी सांगणारी वचने शोधून त्यांवर चर्चा करा.

## पाठ ३३ : देवदूतांची कामे

१. पतन झालेल्या आणि आता स्वतंत्र असणाऱ्या देवदूतांची कार्ये:

१. देवाच्या कार्याला विरोध करतात, दानीएल १०:१०—१४

२. देवाच्या लोकांना दु:ख देतात, लूक १३:१६; मत्तय १७:१५—१८.

३. सैतानाचे हेतू पूर्ण करतात, मत्तय २५:४१, १२:२६—२७.

४. देवाच्या लोकांच्या आध्यात्मिक जीवनात अडखण आणतात, इफिस ६:१२.

५. देवाच्या लोकांना फसवण्याचा प्रबल प्रयत्न करतात, १ शमु. २८:७—२०. त्यांच्या सुटकेची, उद्धाराची काहीच आशा नाही, यहूदा ६:२, २ पेत्र २:४; मत्तय २५:४१. त्यांचा शेवट सार्वकालिक अग्नी आहे.

२. देवदूतांची कार्य:

१. स्वर्गात — प्रभू देवाचा आदर व भक्ती करणे, सेवा करणे. प्रकटी ५:११—१२; ८:३,४

२. पृथ्वीवर — देवाची कामे करणे, उदा. हागारेला झरा दाखविणे; यहोशवापुढे तरवार घेऊन उभे राहणे; पेत्राची बंधने सोडवणे; तुरूंगाचे दरवाजे उघडणे; देवाच्या लोकांना तृप्त करणे, समर्थ करणे व त्यांची रक्षा करणे.

३. देवाच्या न्यायाची व उद्देशाची अंमलबजावणी करणे. गणना २२:२२; प्रेषित,

१२:२३; मत्तय. १३:४१.

४. विश्वासणाऱ्यांना मार्गदर्शन करणे, प्रेषित ८:२६.

५. देवाच्या सेवकांना (संतांना) मदत करणे, संरक्षण करणे व समर्थ करणे, जसे एलिया, १ राजे १९, दानीएलाला सिंहाच्या गुहेत, दानी. ६:२२, येशूला गेथशेमाने बागेत, मत्तय ४:११; लूक २२:४३.

६. प्रभू येशू परत येईल तेव्हा ते त्याच्या सोबत येतील. मत्तय २५:३१, १ थेस्सल. १:७,८.

७. मृत्युनंतर देवाच्या मुलांना ते स्वर्गात नेतात, लूक १६:२२.

चर्चा : तुम्ही आपल्या जीवनात देवदूतांच्या मदतेचा अनुभव केला आहे का?

# भाग नववा
# सैतानाविषयीचा सिद्धान्त

## पाठ ३४ : देव व मानवाचा महान शत्रू

१. सैतानाचे मूळ स्वरूप:

१. सैतानाचे वर्णन यहेज्केल २८:१२–१९ मध्ये केलेले आहे. तो सौंदर्यवान होता, कदाचित् प्रमुख देवदूत होता. त्याच्या गर्वामुळे पाप व दुष्टता त्याच्यात शिरली व त्याला स्वर्गातून हाकलून देण्यात आले.

२. यशया १४:१२–१७ मध्येही त्याचे वर्णन आहे. त्याला लुसीफर, प्रभातपुत्र म्हटले आहे. त्याच्या गर्वामुळे, देवापेक्षा श्रेष्ठ होण्याची इच्छा केल्याने त्याला स्वर्गातून हाकलून दिले गेले.

३. सैतान ही खरी व्यक्ती असून त्याला जीवन, बुद्धी, इच्छाशक्ती व भावना आहेत.

२. सैतानाचे गुणविशेष:

१. तो अंतःकरणातून देवाचे वचन काढून घेणारा चोर आहे— मत्तय १३:१९.

२. तो धूर्त आहे — २ करिंथ ११:३.

३. तो खूनी आहे — योहान ८:४४.

४. तो लबाड आहे — योहान. ८:४४.

५. तो फसविणारा आहे — प्रगटी. १२:९.

चर्चा : या दिवसांत सैतान अधिक शक्तीशाली होत आहे, असे तुम्हांस वाटते का?

## पाठ ३५ : पराभूत शत्रू

१. सैतानाची नावे :

१. तेजस्वी दूत – २ करिंथ ११:१४.
२. गर्जणारा सिंह – १ पेत्र ५:८.
३. अंतरिक्षातील राज्याचा अधिपती – इफिस २:२.
४. अंधकाराची सत्ता – कलस्सै १:१३.
५. मोठा अजगर, सर्प, सैतान – प्रकटीकरण १२:९.
६. या जगाचा अधिपती – योहान १४:३०.
७. या जगाचा देव – २ करिंथ ४:४
८. अथांग डोहाचा राजा असून त्याचे इब्री नाव अबद्दोन आहे – प्रकटीकरण ९:११.

२. सैतानाचे भवितव्य

१. ख्रिस्ती लोकांविषयी म्हटले, तर तो त्यांचा पराभूत शत्रू आहे – योहान १२:३१; १६:९,१०; १ योहान ३:८; कलस्सै २:१५.
२. तो शापित आहे – उत्पत्ती ३:१४; यशया ६५:२५.
३. त्याला अग्नीच्या सरोवरात टाकण्यात येईल. तेथे तो सदासर्वकाल राहील – मत्तय. २५:४१; प्रकटी. २०:१०.

निष्कर्ष : सैतान समर्थ आहे, पण देव सर्वसमर्थ आहे. कॅल्हवरीवर त्याचा कायमचा पराभव झाला आहे. आपण सतत कॅल्हवरीच्या रक्ताद्वारे त्याच्यावर विजय घोषित करूया, प्रकटीकरण १२:११.

# भाग दहा
# शेवटच्या काळाविषयीचा सिद्धान्त

## पाठ ३६ : येशू ख्रिस्ताचे दुसरे येणे

नव्या करारातील २६० अध्यायांत ३१८ वेळा प्रभू येशूच्या दुसऱ्या येण्याविषयी सांगितलेले आहे. म्हणजे नव्या करारातील दर पंचवीस वचनांमागे एका वचनात या विषयाचा उल्लेख आहे. पवित्र शास्त्रातील दर तीस वचनामागे एका वचनात या विषयाचा उल्लेख आहे. प्रभू येशूचे पहिले येणे व त्याचे दुसरे येणे यांच्या पवित्र शास्त्रातील उल्लेखाचे प्रमाण एकास आठ आहे, म्हणजे दुसऱ्या येण्याविषयीचे उल्लेख, प्रथमागमनाच्या उल्लेखापेक्षा आठपट जास्त आहेत.

१. ख्रिस्त कसा येणार आहे?

१. मंडळीला वर घेतले जाईल, तेव्हा तो गुप्तपणे येईल — १ थेस्सल. ५:२; मत्तय २४:४४,५०

२. प्रकटीकरणाच्या वेळेवर तो जाहीररित्या येईल — प्रकटीकरण १:७

२. ख्रिस्त कोठे येणार आहे?

१. दुसऱ्या आगमानाच्या मंडळीला वर घेतले जाण्याच्या वेळी आम्ही त्यास अंतराळात भेटू — १ थेस्सल. ४:१७.

२. प्रकटीकरणाच्या वेळेस आम्ही त्याच्याबरोबर अंतराळात येऊ — जखऱ्या १४:४.

३. त्याच्या येण्याची चिन्हे:

२ तीमथ्य ३:१—७ मध्ये त्याच्या येण्याची २३ चिन्हें दिलीं असून त्यांपैकी बरीच आज घडत आहेत. मत्तय २४:५—७ व १२—३८ मध्ये दहा चिन्हे सांगितलेली आहेत.

येशू ख्रिस्त अजून शंभरएक वर्षे तरी येणार नाही, असे समजून आपण योजना आखाव्यात व कार्य करावे, पण तो आजच येणार आहे, असा विश्वास धरून शुद्ध व निष्कलंक जीवन जगावे (१ थेस्सल. ३:१२, १३).

पवित्र शास्त्रातील शेवटची प्रार्थना "आमेन, ये, प्रभू येशू ये'" आहे – प्रकटी. २२:२०.

चर्चा : प्रभू येशूच्या द्वितीयागमनाविषयी जी चिन्हे पवित्र शास्त्रात सांगितली आहेत, त्यांपैकी आज किती दिसत आहेत?

## पाठ ३७ : मृतांचे पुनरुत्थान

१. पवित्र शास्त्रात हा सिद्धान्त स्पष्ट शिकवला आहे.

१. जुन्या करारात – ईयोब १९:२५—२७, स्तोत्र १६:९, १७:१५, दानी. १२:१:१—३. खरीखुरी पुनरुत्थाने १ राजे ४:३२—३५, १३:२१ यात नमूद आहेत.

२. नव्या करारात येशूच्या शिकवणीत — योहान ५:२८—२९; ६:३९—४०, ४४, ५४; लूक १४:१३—१४; २०:३५—३६ व प्रेषितांच्या शिकवणीत—प्रेषित २४:१५, १ करिंथ १५; १ थेस्सल. ४:१४—१६; फिलिप्पै. ३:११; प्रकटी. २०:४—६, १३.

२. पुनरुत्थित शरीराचे स्वरूप :

१. विश्वासणाऱ्यांचे शरीर — १ करिंथ १५:३५—५७ पाहा.

— मांस आणि रक्त नव्हे – वचन ५०, ५१, इब्री. २:१४; २ करिंथ ५:१—६; लूक २४:३९ — "मांस आणि अस्थि" — केवळ आत्मा नव्हे, तर खरे शरीर.

— अविनाशी – वचन ४२. कुजणे, आजार, दु:ख नाही.

— वैभवी — वचन ४३, (तसेच रूपांतरात — मत्तय १७:२,३); प्रकटी. १:१३—१७.
— सामर्थ्यशाली — वचन ४३. थकलेले, अशक्त नव्हे.
— आत्मिक शरीर — वचन ४४. आत्मा हा शरीराचे जीवन असेल.
— स्वर्गीय — वचन ४७—४९.

२. अविश्वासणाऱ्यांचे शरीर — याविषयी पवित्र शास्त्रात काहीच उल्लेख नाही.

३. पुनरुत्थानाचा समय

१. विश्वासणाऱ्यांचे पुनरुत्थान — १ करिंथ १५:२३; १ थेस्सल. ४:१४—१७. विश्वासणाऱ्याचे पुनरुत्थान ख्रिस्ताच्या पुनरागमनाशी संबंधित आहे.

२. दुष्टांचे — योहान ५:२८—२९; दानीएल १२:२; प्रकटी. २०:५, १२. अविश्वासणाऱ्यांचे पुनरुत्थान न्यायनिवाड्याशी संबंधित असून, प्रभूच्या दिवासनंतर ते होणार आहे. प्रकटीकरण २०:४—६ च्या अनुसार विश्वासणारे व दुष्ट यांच्या पुनरुत्थानात कमीत कमी १००० वर्षांचे अंतर असणार आहे.

निष्कर्ष : आजच्या शरीरांपेक्षा पुनरुत्थित शरीरे वेगळी कशी असतील?

## पाठ ३८ : न्यायनिवाडा

जगासाठी न्यायनिवाड्याचा दिवस नेमून ठेवला आहे. त्यात दुष्टांचा न्याय होईल व विश्वासणाऱ्यांना प्रतिफळ मिळेल, (प्रेषित १७:३१; इब्री ९:२७). ख्रिस्त न्यायाधीश आहे. तोच मानव जो वधस्तंभावर चढला होता (ख्रिस्त), तेव्हां राजासनारूढ होईल, (योहान ५:२२, २३, २७, २ तीमथ्य ४:१, २; २ करिंथ ५:१०; प्रेषित १०:४२, १७:३१).

जसे पुनरुत्थान एकापेक्षा अधिक आहेत, तसेच न्यायनिवाड्याचे प्रसंगही अधिक आहेत. नोहाच्या दिवसात पुराने लोकांचा न्याय झाला, तर बाबेलचा बुरूज बांधताना भाषेच्या गोंधळाने त्यांचा न्याय झाला.

पवित्र शास्त्र कमीत कमी सात न्यायनिवाड्याविषयी सांगते:

१. वधस्तंभावरील न्याय : विश्वासणाऱ्यांवरील सैतानाची सत्ता मोडली गेली व विश्वासणाऱ्यांच्या पातकांचा न्याय केला जाऊन ती दूर करण्यात आली. (योहान ५:२४; १ पेत्र २:२४).
२. विश्वासणाऱ्यांनी स्वतःचा केलेला न्याय : (१ करिंथ ११:३१, ३२). हा सतत व नेहमी चालू असतो.
३. विश्वासणाऱ्यांचा न्याय ख्रिस्ताच्या न्यायासन (Bema) या समोर होणार : २ करिंथ. ५:१०. येशूच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी विश्वासणाऱ्यांचा त्याच्या कृत्याबद्दल न्याय होईल. अग्नीपरीक्षेत टिकून राहणाऱ्यांना प्रतिफळ मिळेल. १ करिंथ ३:१३.

४. यहूद्यांचा न्याय : मोठ्या संकटकाळात होईल. यहेज्केल २०:३४–३८; यिर्मया ३३:७, लूक २३:१८; प्रेषित ७:५१.

५. विदेशी राष्ट्रांचा न्याय : मत्तय २५:३२. येशूच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी यहोशाफाटाच्या खोऱ्यांत होईल — योएल ३:२; मत्तय २५:४१ आणि ३४.

६. पतन पावलेल्या दूतांचा न्याय : १ करिंथ. ६:३; यहूदा ६, २ पेत्र २:४.

७. पापात मरण पावलेल्या लोकांचा न्याय : ज्या लोकांचा कधीही नव्याने जन्म झाला नाही, ज्यांचा पहिल्या पुनरुथानात भाग नव्हता, ज्यांचे मंडळीसोबत वर उचलले जाणे झाले नाही अश्या लोकांचा न्याय मोठ्या पांढऱ्या सिंहासनाच्या समोर होईल — प्रकटीकरण २०:११,१२. हा एक हजार वर्षांच्या राज्यानंतर होईल — प्रकटीकरण २०:५. पापी, अधार्मिक लोकांना अग्नीच्या सरोवरात टाकले जाईल — प्रकटीकरण २०:१५.

चर्चा : तुमच्याशी संबंधित असलेले न्याय कोणते आहेत?

## पाठ ३९ : दुष्टांचे अंतिम भवितव्य

पश्चात्ताप न करणाऱ्यांसाठी राखून ठेवलेल्या न्यायाविषयीचा उल्लेख असणारे शास्त्रभाग फक्त नव्या करारातच १६२ आहेत. त्यांपैकी ७० खुद्द येशूने उच्चारले आहेत.

ख्रिस्ताचा नाकार करणारे दुष्ट नरकात टाकले जातील — स्तोत्र ९:१७.

१. नरक काय आहे? — एक व्याख्या :
   १. देवाच्या समक्षते पासून हद्दपार केले जाणे — २ थेस्सल. १:९.
   २. यातना व शिक्षेची जागा — लूक १६:२३.

२. नरकाचे वर्णन :
   १. सैतान व त्याच्या दूतांसाठी तो प्रथमत: निर्माण केला होता — मत्तय २५:४१. पण जे लोक तारकाच्या द्वारे मिळणाऱ्या स्वर्गाचा अव्हेर करतात, त्यांनाही तेथेच टाकले जाईल.
   २. ती शिक्षेची जागा आहे — मत्तय २५:४६.
   ३. ती यातनेची जागा आहे — लूक १६:२३.
   ४. ती अग्नीची जागा आहे — मत्तय १३:४२, ५०; प्रकटी. २०:१५, १४:१०; मत्तय ३:१२; यशया ३३:१४.
   ५. ती किड्यांची जागा आहे — मार्क ९.४८.
   ६. लूक १६ या अध्यायामध्ये तो श्रीमंत माणूस इतरांना ओळखू शकला होतो, वचन २३. तो तेथे प्रार्थना करू शकला, पण ती ऐकली गेली नाही, वचन २७. आणि त्याने पाणी मागितले व आपल्या भावांनी तेथे येऊ नये म्हणून त्यांना

सावध करण्यासाठी संदेशावाहक पाठवण्याची विनंती केली, वचन २४—२७.

७. नरक सार्वकालिक, अविनाशी आहे.

निष्कर्ष : सार्वकालिक शिक्षेविषयीच्या या सत्य गोष्टींनी आम्हांमध्ये पापी लोकांना उद्धारासाठी जीतन्याची उत्तेजना निर्मित करायला हवी!

## पाठ ४० : विश्वासणाऱ्यांचे अंतिम प्रतिफळ

विश्वासणाऱ्यांचे मरण म्हणजे केवळ येशू ख्रिस्तामध्ये झोपणे आहे. १ थेस्सल. ४:१४, नंतर ते प्रभूच्या सान्निध्यात उठविले जातील.

१. विश्वासणाऱ्यांचे भविष्यकालीन वैभव :
   १. येशूबरोबर असणे, योहान. १४:३.
   २. येशूचे मुख पाहणे, स्तोत्र १७:१५; २ करिंथ ४:६; प्रकटी. २२:४.
   ३. ख्रिस्ताचे गौरव पाहणे, योहान १७:२४.
   ४. ख्रिस्ताबरोबर गौरविले जाणे, रोम ८:१७, १८.
   ५. ख्रिस्ताबरोबर राज्य करणे, २ तीमथ्य २:१२.
   ६. सर्व गोष्टींचा वारसा मिळणे, प्रकटी २१:७.
   ७. ताऱ्यांप्रमाणे प्रकाशणे, दानीएल १२:३.
२. विशसणाऱ्यांना मिळणारे मुकुट :
   १. अविनाशी मुकुट, १ करिंथ ९:२४, २५ धावणाऱ्यांसाठी मुकुट, इब्री. १२:१.
   २. आनंदाचा मुकुट, १ थेस्सल. २:१९, आत्में जींकणाऱ्यांसाठी मुकुट.
   ३. नीतिमत्त्वाचा मुकुट, २ तीमथ्य ४:८, येशूचे येणे ज्यांना प्रिय झाले आहें त्यांना मिळणारा मुकुट. प्रत्येकाने हा जींकायला हवा.
   ४. जीवनाचा मुकुट, याकोब १:१२, मरणातही विश्वासू राहणाऱ्यांसाठी, प्रकटी. २:१०. हा रक्तसाक्षी होणाऱ्या हुताम्यांना मिळणारा मुकूट आहे.
   ५. गौरवाचा मुकूट : १ पेत्र ५:४, — हा मेंढपाळ, पाळक, मिशनरी व शिक्षकांना मिळणारा मुकुट आहे.
३. स्वर्ग काय आहे?
   १. प्रभू देवाचे घर आहे, मत्तय ६:९, २ करिंथ १२:२. स्वर्गाचा पहिला परिसर — आकाश — म्हणजे जेथे पक्षी उड्डाण करतात, ते ठिकाण आहे. दुसरा स्वर्ग म्हणजे जेथे अंतराळवीर जातात ते ठिकाण व तिसरा स्वर्ग म्हणजे देवाचे घर.
   २. देवाने निर्माण केलेली इमारत आहे, हे मानव—निर्मित नव्हे. २ करिंथ ५:१.
   ३. ख्रिस्ताचे आणि देवाचे राज्य — इफिस ५:५.
   ४. पित्याचे घर — योहान १४:२.

५. मृत्यू, अश्रू, दु:ख, रडणे, वेदना हे नसलेली जागा — प्रकटी. २१:४. रात्र किंवा अंधारविरहीत जागा, प्रकटी. २२:३:५. भूक—तहान, अधिक उष्णता नसलेली जागा, प्रकटी. ७:१६.

६. नवनिर्मित गोष्टींचे ठिकाण — जीवनाची नदी, जीवनाचे झाड, नवीन सेवा, नवीन नातेसंबंध, नवा प्रकाश असलेली जागा, प्रकटी. २२:४.

निष्कर्ष : स्वर्ग ही (तेथे जाण्याच्या) तयारीत असलेल्या लोकांसाठी तयार केलेली जागा आहे. आमचे ध्येय हेच असावे की आम्हीं तेथे पोंहचावे, अश्या अनेक लोकांसोबत जे आमच्या ख्रिस्तासाठी केलेल्या श्रमामुळे ख्रिस्ताचा स्वीकार करून उद्धार पावेलेले असतील.

# ३ उपदेशाचे तंत्र

प्रवचनशास्त्राच्या या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यात प्रवचनाचे कौशल्य वाढावे, हा हेतू आहे. प्रवचनशास्त्र म्हणजे फक्त लोकांसमोर उभे राहून प्रभावीपणे भाषण करणे नव्हे, तर देवाचा संदेश मानवी अंत:करणापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करणे आहे. या सत्याविषयी पौल जोर देऊन सांगतो : "कारण ज्यांचा नाश होत आहे, त्यांना वधस्तंभाविषयीचा संदेश मूर्खपणाचा आहे, पण ज्यांना तारण प्राप्त होत आहे, अशा आपणांस तो देवाचे सामर्थ्य असा आहे" (१ करिंथ १:१८). तुम्ही परिश्रमपूर्वक अध्ययन करून प्रचार—कलेमध्ये पारंगत व्हावे व त्यामुळे अनेकांच्या तारणासाठी व आत्मिक वृद्धीसाठी देवाचे सामर्थ्य कार्यरत व्हावे अशी मागणी हा अभ्यासक्रम तुमच्याशी करतो.

संदेश कसा द्यावा म्हणजे संदेश देतांना आवाज, हावभाव, व्यक्तित्व याचा वापर कसा करावा, याविषयी या मोजक्या पानांमध्ये आपण सांगू शकत नाही. कारण हे सर्व आपण उपदेश दिला जात असतांना निरीक्षण करू शकतो. ह्या पाठांत फक्त उपदेशात समाविष्ट करण्याच्या बाबीं आणि वैशिष्ट्यपूर्ण संदेशाची उदाहरणे दिलेली आहेत.

हे लक्षात असू द्या की पोर्टेबल बाइबल स्कूलच्या ह्या अभ्यासमालेतील इतर पाठ्यक्रमाचे विभागण दैनिक पाठांमध्ये केलेले आहे पण प्रवचनशास्त्राच्या या अभ्यासक्रमाची व्यवस्था आठवडी पाठांमध्ये—त्याचे पाठ आठवड्याभरात करता यावेत अशा पद्धतीने—केली आहे. त्यामुळे वर्गात उपदेश तयार करण्याचे व उपदेश सादर करण्याचे व्यावहारिक काम करण्यास हवी ती मोकळीक व लवचिकता मिळेल.

हे पाठ तयार करण्यासाठी विल्यम इव्हॅन्स यांनी लिहिलेल्या व मूडी प्रकाशनने प्रकाशित केलेल्या "*हाउ टू प्रिपेअर सरमन्स्*" (उपदेश कसे तयार करावेत) या पुस्तकातील साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

# आठवडा पहिला

## दिवस पहिला : उपदेश काय आहे?

उपदेश म्हणजे तारणाची सुवार्ता एका व्यक्तिने अनेकांस घोषित करणे. मनुष्य व संदेश—व्यक्तिमत्व व सत्य—हीं त्याची दोन तत्वे आहेत.

शुभवर्तमानाची घोषणा करण्याचे विशेष काम करण्यासाठी उपदेशक देवाकडून वेगळा केला जातो. तो मानवाच्या वतीने देवाशी व देवाच्या वतीने मानवाशी बोलतो. तो चांगला, पवित्र आत्मा पावलेला, विश्वासू असायला पाहिजे. अशा उपदेशकाच्या जीवनामुळे अनेक लोक ख्रिस्ताकडे येतात, प्रेषित ११:२४.

उपदेश हा उपदेशकाचा भाग असून त्याचे जीवन व अनुभव यांचे प्रकटीकरण असावा. सत्याचा उपदेश करण्यापूर्वी उपदेशकाला स्वत:ला त्या सत्याचा अनुभव झालेला हवा, तरच उपदेश प्रभावी होईल.

चर्चा : प्रभावी उपदेशकाचे जीवन तयार होण्यासाठी त्याच्या ठायी कोणत्या आवश्यक गोष्टी असाव्यात? कोणत्या गुणांमुळे तो अयशस्वी ठरतो?

## दिवस दुसरा : उपदेशासाठी धर्मग्रंथातील वचन

१. बाइबलमधून निवडलेल्या यथायोग्य पाठाचे अनेक फायदे आहेत:
    १. श्रोत्यांमध्ये उत्सुकता निर्माण होते: “तो याविषयी काय सांगेल.”
    २. श्रोत्यांचा भरोसा प्राप्त होतो: “हे देवाचे वचन आहे.”
    ३. उपदेशकाला बोलण्याचा अधिकार व धैर्य मिळते: “प्रभू देव असे म्हणतो.”
    ४. उपदेशकाचे मन भटकत नाहीं, स्थिर राहते.
    ५. उपदेशक हा त्यामुळे पवित्र शास्त्रावरच अवलंबून राहील.
२. उपदेशासाठी बाइबलचा पाठ निवडण्याची सर्वमान्य तत्त्वे:
    १. उपदेशकाने लोकांच्या आत्मिक गरजांचा अभ्यास करावा.
    २. त्याने ज्या सत्यांविषयी उपदेश केलेला आहे, त्यांविषयी विचार करावा. त्यांविषयी काहीं सांगण्याचे राहून गेले का? वर्षभरात कोणत्या विषयावर उपदेश करायचा, याविषयी वर्षाच्या आरंभीच यादी केली, तर बरे होईल.
    ३. उपदेश करण्यासाठी स्वत:ची पात्रता, कुवत ओळखावी. काही तत्त्वे, सिद्धान्त सांगणे तरुण, नवीन उपदेशकाला कठीण जाते.
३. बाइबलचा पाठ निवडण्यामध्ये पुढिल तत्त्वे उपयुक्त ठरतील:
    १. पवित्र शास्त्राचे सातत्याने वाचन करावे हे आवश्यक आहे.

२. वहीचा वापर करणे खरोखरीच फायदेशीर आहे.

३. चांगली पुस्तके वाचल्याने उत्तम विचार मिळतात.

४. पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन सर्वांत महत्त्वाचे आहे. पवित्र आत्म्याच्या अभिषेकाखाली व सामर्थ्याखाली सतत असणाऱ्या मनुष्याला उपदेशासाठी कोणता विषय निवडावा, असा प्रश्न कधी पडणार नाही.

अभ्यास : येत्या महिन्यांमध्ये तुम्ही ज्या दहा विषयावर उपदेश करणार आहात, त्यांची यादी करा.

## दिवस तिसरा : उपदेशाचा विषय

उपदेशातील विषयाची समजदार निवड व योग्य शब्दरचना अतिशय महत्त्वपूर्ण असते. खालील प्रस्तावांवर विचार करा.

१. उपदेशकास आपल्या मुख्य विषयाचे पूर्ण ज्ञान असावे.

२. मुख्य विषय एकच असून तो लोकांना समजेल असा असावा, लोकांच्या डोक्यावरून जाईल असा नसावा.

३. मुख्य विषय नीरस किंवा गांभीर्य नसलेला नसावा. त्यास महत्त्व व वजन असावे.

४. उपदेशकाच्या जवळ मुख्य विषय हाताळण्याचा विशिष्ट हेतू असावा. हृदयपरिवर्तन व निर्णय घेण्याकरीता उपदेश करावा हे अत्यावश्यक आहे.

५. विषय वेळ, प्रसंग व ठिकाण यांना अनुरूप असा असावा. उदा. ईस्टरच्या दिवशी त्याने येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाविषयी बोलावे, इ.

चर्चा : रविवारच्या उपदेशामध्ये उल्लेख करू नयेत, असे कोणते विषय आहेत व कोणते नाहीत?

## दिवस चौथा : उपदेशासाठी साहित्य जमा करणे

उत्तम पुस्तके वाचण्यामुळे उपदेशकाच्या विचारास पुष्टी मिळते. रोजच्या घटनांसंबंधीही त्याने जागृत असावे. त्याविषयी विचार व प्रार्थना करून, शुभवर्तमानाशी संबंध जोडावा. येशू निरीक्षण करीत असे आणि ऐकलेल्या व पहिलेल्या घटनांशी संबंधित उपदेश देत असे.

उपदेशकाने आपल्याबरोबर वही ठेवावी व त्याने ऐकलेल्या आणि पहिलेल्या ज्या गोष्टींमुळे तो प्रभावित झाला, त्यांची नोंद त्यात करावी आणि नंतर त्याविषयी विचार करावा.

उपदेशकाने सतत साहित्य जमा करीत राहावे.

चर्चा : मागच्या महिन्यातील कोणत्या स्थानिक घटनांमुळे तुम्हांला उपदेशाविषयीचे चांगले मुद्दे मिळाले? त्या सर्व कल्पना व त्यांचा उपयोग तुमच्या वहीत लिहा.

## दिवस पाचवा : उपदेशाच्या साहित्याची मांडणी करणे

उपदेशसामुग्रीची रचना फार महत्त्वाची आहे. उपदेशकाने आपल्या सर्व साहित्याची मांडणी, रचना अशा रीतीने करावी की, त्यामुळे उपदेशाच्या मुख्य हेतूला उठाव येईल.

उपदेशसामुग्रीची मांडणी करण्याचे फायदे :

१. उपदेशकासाठी — जे स्पष्ट व मुद्देसूद आखले आहे, ते लक्षात ठेवता येणे सहज जाते.

२. उपदेशासाठी — उपदेशाचा प्रभावीपणा स्पष्ट व मुद्देसूद मांडणीवर किंवा रचनेवर अवलंबून असतो.

३. श्रोत्यांसाठी — उपदेशकाच्या ज्या परिश्रमाने मांडळीला विषय लक्षात ठेवण्यास व बाइबलची शिकवण आपल्या सोबत नेण्यास सोपे जाते ते करण्याचे मोल मोठे आहे. श्रोत्यांकडून चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी, उपदेशकाने उपदेशाची मांडणी सुयोग्य रीतीने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

चर्चा : उपदेशामधील निकृष्ट प्रतीच्या मांडणीची काही उदाहरणे सांगा. ती मांडणी निकृष्ट का आहे?

# आठवडा दूसरा

## दिवस पहिला : चांगल्या उपदेशाची मांडणी

चांगल्या उपदेश—मांडणीचे गुणविशेष :

१. एक विषय : उपदेशात एकच मूळ कल्पना असून, उपदेशकाने आपले सारे मुद्दे, चर्चा, पुरावे, साक्ष आणि स्पष्टीकरणे त्यावरच एकवटने आवश्यक आहे.

२. उपदेशाचे मुद्दे हे तर्कसुसंगत असावेत. प्रथम *बौद्धिक* पातळीवर चर्चा करावी. नंतर *भावनेला* आवाहन द्यावे व शेवटी *इच्छेला* आवाहन करावे.

३. प्रत्येक माणसाच्या शरीराला हाडाच्या सापळयाची गरज आहे, त्याप्रमाणे प्रत्येक उपदेशासाठी रूपरेषा आवश्यक आहे. सर्वसाधारणरित्या पाहिले, तर उपदेश हा समजण्यास सोपा असावा. वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे लक्षात ठेवण्यास सोपे असातात. आपल्या उपदेशातील प्रत्येक मुद्दा हा एखाद्या विशिष्ट अक्षराने किंवा आवाजाने सुरू होईल, अशी दक्षता काही उपदेशक घेतात. तर काही उपदेशक विरोधाभासाच्या नियमाचा आधार घेतात. विशिष्ठ शब्दाने आरंभ होणाऱ्या मुद्द्याचे एक उदाहरण पुढील असू शकते:

(मराठीमध्ये उपदेशाच्या मुद्द्याचे विशिष्ठ शब्द—संबंध बनवण्यासाठी इंग्रजी पुस्तकात दिलेल्या विषयाला बदलले आहे.)

विषय — येशूच्या सामर्थ्याचे पहिले चिन्ह

बाइबल पाठ — योहान २:१—११

<u>समस्या चे समाधन</u>

१. समस्या — वचन ३

२. सल्ला — वचन ५, मरीयेची चाकरांना सल्ला

३. सहयोग — वचन ७ व ९, चाकरांचे आज्ञापालन

४. समाधान — वचन ९—१०

५. सामर्थ्य — वचन ११, येशू चे निर्मितीवर

विशिष्ट आवाजाने सुरू होतील अश्या मुद्द्याचे उदाहरण,:

विषय — ख्रिस्ती कसे व्हावे?

१. स्वीकरण करणे, २. समर्पण करणे, ३. अनुकरण करणे, ४. अनुसरण करणे

गुहपाठ : प्रत्येक मुख्य मुद्दयांसाठी एकच आद्याक्षर वापरून उपदेशाची रूररेषा बनवा.

## दिवस दुसरा : उपदेशाची प्रस्तावना

प्रत्येक चांगल्या उपदेशाची किंवा प्रवचनाची तीन भागात विभागणी होते, ती पुढीलप्रमाणे : प्रस्तावना, मुख्य भाग व निष्कर्ष.

एखाद्या उत्तम पदार्थाला जसा मसाला, तशी उपदेशाला प्रस्तावना असून ती जणू काही उपदेशाचा सुवास पसरवते. कधी वेळ कमी असला किंवा बोलण्याचा अवसर अनौपचारिक असला अश्या वेही सोडून सर्वदा विषयाचा परिचय करून द्यावा असा नियम आहे.

प्रस्तावनेचे उद्देश:

१. मुळ कल्पनेविषयी उत्सुकता निर्माण करणे, आपल्या उपदेशाविषयी श्रोत्यांमध्ये उत्सुकता निर्माण करणे हे उपदेशकाचे कौशल्य आहे. त्यामुळे श्रोत्यांना उपदेश ऐकणे व कुतूहल निर्माण होणे भाग पडते.

२. उपदेशाच्या पुढील भागासाठी श्रोत्यांची तयारी करणे.

प्रस्तावनेची प्राप्तीस्थाने:

१. मुख्य विषयाची सर्वसामान्य माहिती देणे, स्तोत्र २३:४—६ याविषयी सांगण्यासाठी उपदेशकर्ता सांगू शकतो की, प्रस्तुत शास्त्रभागामुळे कितीतरी दु:खितांचे सांत्वन झाले आहे व मृत्यूशय्येवर असलेल्या अनेक लोकांना प्रकाश, उमेद प्राप्त झाली आहे.

२. विषयाचा ऐतिहासिक संदर्भ
३. पवित्र शास्त्राची भौगोलिक माहिती
४. पवित्र शास्त्रातील रूढी व परंपरा
५. लेखक आणि त्याने ज्यांना उद्देशून लिखाण केले आहे, त्यांच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग किंवा घटना.
६. ईस्टर अथवा नाताळासारखे प्रसंग.

नेमलेले काम : ईस्टरच्या उपदेशाची प्रस्तावना तयार करा.

## दिवस तिसरा : चांगल्या प्रस्तावनेचे गुणविशेष

१. भावुक किंवा खळबळ उडवून देणारी नसावी. खूप मोठ्याने बोलू नये. सुरुवातीलाच भावनेला आव्हान देणे योग्य नाही. हळू आवाजात सुरूवात करून, क्रमाक्रमाने विषय सांगून वातावरणनिर्मिती करावी, हे उत्तम.
२. प्रस्तावना फार मोठी नसावी. त्यामुळे लोक कंटाळतात.
३. काळजीपूर्वक तयार करावी. सुरूवात चांगली असेल, तर प्रभाव पडतो, उपदेश परिणामकारक होतो, म्हणून प्रस्तावना चांगली तयार करावी, लिहून काढावी.

अभ्यास : रोम १:१६, १७ यावर आधारित उपदेशाची प्रस्तावना तयार करा. वर्गात ती सांगा.

## दिवस चौथा : उपदेशाचा मुख्य भाग

विषयानुसार आवश्यक असतील तेवढे उपदेशाचे विभाग असावेत. काही उपदेशांमध्ये तीन विभाग किंवा मुद्दे असतील, तर काहींमध्ये सात. पण प्रत्येक मुद्दे हे तर्कसुसंगत, वास्तववादी व एकमेकांशी संबंधित असावेत. प्रत्येक वेळी त्यांचा उल्लेख करावाच असे नाहीं.

उपदेशाच्या विभागणीमुळे पुढील प्रश्नांची उत्तरे मिळायला हवी:

१. काय? — पहिल्या भागामध्ये विषय आणि त्याच्या व्याख्या यांचा समावेश असावा. या भागानंतर विषय काय आहे याविषयी ऐकणाऱ्यांच्या मनांत गोंधळ उरलेला नसावा. हा भाग बौद्धीक गोष्टीशी संबंधित आहे. भावना अथवा इच्छेला येथे वाव नाहीं.
२. का? — या भागात विषयाची गरज, कारण किंवा पुरावा सांगावा. हा भाग हे प्रश्न करतो: हे सत्य का आहे? मी यावर विश्वास का ठेवावा किंवा का स्वीकारावे? हे कसे सिद्ध करता येईले? हे बरोबर आहे का? अशा प्रश्नांचा यात समावेश होतो.
३. कसे? — उपदेशाच्या मूळ कल्पनेचा विस्तार करण्यासाठी वापरली जाणारी रीत किंवा

पद्धत किंवा उपदेशाचा मूळ हेतू कोणत्या परिस्थतीत साध्य होईल हे येथे पाहिले जाते. या विभागमध्ये सर्वसामान्यत: तीन विचारप्रणाली असतात: देवाचा भाग, मानवाचा भाग, आणि परिपूर्तीविषयक प्रश्न.

४. नंतर काय? — या भागात उपदेशाचे लागूकरण केले जाते. हा बहूधा सर्वांत महत्त्वाचा विभाग आहे. ह्या विभागात विषयासंबंधी वैयक्तिक बाबींकडे लक्ष पुरविले जाते. अनिवार्य आहे की आम्ही लोकांना ख्रिस्ताचा स्वीकार करण्यास व त्याच्या योग्य पवित्र जीवन जगण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे.

अभ्यास : रोम १:१६, १७ या वचनावर आधारित उपदेशाच्या मुख्य भागाची रूपरेषा तयार करा.

## दिवस पाचवा : उपदेशाचा समारोप

उपदेशातील शेवटची पाच मिनिटे ही सर्वांत महत्त्वाची आहेत. — या भागाची यथायोग्य तयारी करण्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे महाभयंकर चूक. महत्त्वाचे मुद्दे, विचार पुन्हा सांगून, काही निवडक, विचारप्रवर्तक, आत्मे हलविणारी वाक्ये बोलून अथवा समर्पक उदाहरणे सांगून उपदेशाचा परिणामकारक शेवट करता येतो. काही वेळा एखादी कविता, परिचित भक्तीगीताचे कडवे सांगता येते. किंवा एखादे वाक्य विशिष्ट पद्धतीने बोलून, समर्पक वाक्य बोलून उपदेशाचा समारोप करता येतो. समारोप हा प्रस्तावनेपेक्षा मोठा असू नये. साधारण तीन ते पाच मिनटांचा असावा.

कार्यनुभव : रोम. १:१६, १७ या उपदेशासाठी चेतना जागृत करणारा समारोप तयार करा.

## दिवस सहावा : उदाहरणे व त्यांचा उपयोग

येशूने सांगितलेल्या उपदेशांत, भाषणात अनेक उदाहरणे, गोष्टी व रूपके आहेत. उदाहरणांचे महत्त्व त्याने इतर कोणाहीपेक्षा अधिक प्रमाणात स्पष्ट केले आहे. श्रोत्यांना उपदेशातील सत्याचे पूर्णपणे आकलन होण्यासाठी उदाहरणे खूपच उपयोगी ठरतात.

उदाहरणांचा हेतू:

१. ती विषयांवर प्रकाश पाडतात. घराला जशा खिडक्या तशी उपदेशात उदाहरणे असतात.
२. त्यामुळे स्पष्टीकरण होते.
३. त्यामुळे विषय अथवा मुद्दा सिद्ध होतो.
४. ते विषयाला किंवा उपदेशाला सुशोभित करतात.
५. ते ठाम मत तयार करतात.

उदाहरणे कोठून मिळतील?

१. उपदेशकाने सतत निरीक्षण करावे. येशू ख्रिस्ताने अरूंद व रूंद दरवाजा, मीठ, मेणबत्ती, ढोंगीपणा, भाकर, मोहरीचा दाणा, माशाचे जाळे, कर्ज देणारा व कर्ज घेणारा इ. चा वापर उदाहरणांमध्ये केला.

२. वर्तमानपत्रे, इतिहास, प्राणी, भाजीपाला, मुले आणि इतर अनेक गोष्टींचा आहेत ज्यांचा उदाहरणांमध्ये समावेश होतो.

चर्चा : आम्ही “नव्याने जन्मले” पाहिजे या योहान ३ मधील विषयास अनुरूप अशी चांगली उदाहरणे कोणती?

*टीप : पुढील अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थी प्रत्येक प्रकारचा उपदेश तयार करतील व त्यानंतर वर्गामध्ये त्याचे प्रवचन करतील. आपल्या उपदेशाच्या रूपरेषेमध्ये प्रस्तावना, स्पष्टीकरण व निष्कर्ष यांचा समावेश करण्यास विसरू नका.*

# आठवडा तिसरा

## चरित्रात्मक उपदेश

या प्रकारच्या उपदेशात पवित्र शास्त्रातील काही व्यक्तिचे जीवन दाखवले जाते:

### अब्राहामाची चार समर्पणे

१. देश व नातेवाईक सोडून दुसरीकडे जाणे — उत्पत्ती १२:१.
२. लोटापासून वेगळे होणे — उत्पत्ती १३:९.
३. हागार व इश्माएलास घालवून देणे — उत्पत्ती २१:१०.
४. इसहाकाचे अर्पण — उत्पत्ती २२.

# आठवडा चौथा

## वृत्तांतसंबंधीचा उपदेश (Narrative Sermons)

या प्रकारच्या उपदेशात पवित्र शास्त्रातील एखाद्या घटनेचे विवेचन केले जाते. वृत्तांतसंबंधीच्या उपदेशाच्या रूपरेषेचे उदाहरण पुढीलप्रमाणे आहे:

## सिंहाच्या गुहेत दानीएल

विषय : देव आपल्या मुलांची काळजी घेतो.

प्रस्तावना : गुलामगिरीतील तरुणांची गोष्ट

शास्त्रभाग : दानीएल ६:१९—२३.

रूपरेषा :

१. सैतानी कट — दानीएल ६:१—९.

२. दैनंदिन परिपाठ — वचन १०.

३. दैवी पुरवठा — वचने २१—२४.

निष्कर्ष : देवाशी पूर्ण सहभागिता, जवळीक असल्यामुळे दानीएल धोक्याच्या परिस्थितीचा पूर्ण आत्मविश्वासाने सामना करू शकला. तुमच्या जीवनामध्ये येणाऱ्या कोणात्याही प्रसंगाचा योग्य प्रकारे सामना करता येईल, अशा प्रकारे तुम्ही देवाच्या सहभागितेत चालत आहात का?

# आठवडा पाचवा

## मूळपाठविषयक उपदेश (Textual Sermons)

एखादे वचन किंवा वचनातील छोट्या भागाला मूळपाठ म्हणून घेवून त्यावर आधारीत अशा एखाद्याच विशिष्ट विचारावर केलेला उपदेश म्हणजे मूळपाठविषयक उपदेश असतो. वचनाचे काळजीपूर्वक पृथ्थकरण केले जावे. असल्या प्रकारच्या उपदेशाचे उदाहरण :

## एक दान ज्यामध्ये काही बंधन नाहीं

विषय : पवित्रीकरण

शास्त्र पाठ : रोम १२:१.

प्रस्तावना : पवित्रीकरण म्हणजे काय? — समर्पित करणे, वेगळे करणे, किंवा देवाच्या गौरवाकरिता वाहून घेणे. येशू राजाच्या समक्ष आपल्या जीवनाच्या आधिपत्याचा परित्याग करणे म्हणजे पवित्रीकरण. तुमच्या जीवनाचा स्वामी कोण आहे?

१. कोण पवित्र होऊ शकते? "म्हणून *बंधुजनहो,* मी तुम्हांला विनवितो", येशू ख्रिस्ताच्या रक्ताने धुतले गेलेले लोक, जे देवाच्या कुटुंबातील घटक आहेत. महान, सामर्थ्यवान, कौशल्य असलेले लोक नव्हेत, पण ही गोष्ट सर्व विश्वासणाऱ्यांसाठी आहे.

२. पवित्रीकरणासाठी आवाहन : "*देवाच्या करुणेमुळे,*" अधिकाराने किंवा बळजबरीने

नव्हे, तर देवाच्या करुणेमुळे आम्हास आवाहन करण्यात आले आहे. हे भयामुळे नसावे पण देवाच्या प्रेमामुळे व दयेमुळे प्रेरित असावे.

देवाच्या करुणेची काही उदाहरणे : तारण, पवित्रीकरण, वस्ती करणारा पवित्र आत्मा, रोजची मदत, आरोग्य, मृत्यूनंतर स्वर्ग, मित्र व मंडली.

३. पवित्रीकरणाची कृती : "तुम्हीं आपली शरीरें ... यज्ञ म्हणून समर्पण करावीं"

अ. ते ऐच्छिक आहे — ते दान देणे आहे. ते करण्यासाठी आमच्यावर बळजबरी केली जात नाही.

ब. ते वैयक्तिक आहे — *तुम्ही आपली शरीरे.* आमची जीवने, आमचे सर्व काही.

क. ते यज्ञरूप आहे — *जिवंत यज्ञ.* अब्राहामाने इसहाकाला जसे वेदीवर ठेवले तसे आपण आपलीं जीवनें वेदीवर ठेवावीं.

४. पवित्रीकरणाचा तर्क — *"ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे."* खरेच आमचे तारण झाले असेल तर हे वाजवी आहे की आम्ही त्याची ही सेवा करावी.

५. मला कशाचे पवित्रीकरण करायला हवे? — "तुम्हीं आपली शरीरें." आमची शरीरे आमची स्वतः ची नाहींत. तीं येशू ख्रिस्ताद्वारे त्याच्या रक्ताने तारलेली आहेत.

क. आमची शारीरिक शक्ती — उत्तम आरोग्यासाठी देवाचे आभार माना व त्याच्या कार्यासाठी त्याचा वापर करा.

ख. आमचे पाय — दयेचे काम करण्यास प्रवास करा. कोणालातरी सुवार्ता सांगण्यासाठी जा.

ग. आमचे हात — चांगुलपणाची कामे करण्यास व पडलेल्यांना उठविण्यास वापरा.

घ. आमचे नेत्र — गरजवंत व नाशाकडे जाणाऱ्यांना शोधण्यासाठी वापरा.

ङ. आमचे कान — निराश्रीतांचा आक्रोश ऐकून त्यांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी वापरा.

च. आमचे हृदय — आंतरीक मानवाचे प्रतीक, इतर कशापेक्षाही ख्रिस्ताला हे हवे आहे, २ करिंथ ८:५.

निष्कर्ष : पवित्रीकरण ही एक प्रक्रिया आहे. ती प्रतिदिनी, प्रति क्षणी स्वामीला समर्पित होणे आहे. आताच तुम्ही तुमचे सर्वस्व त्याला समर्पित करा.

इशारा : एकदा केलेले हे समर्पण मागे घेऊ नका. एकदा दिलेल्या दानावर पुनः आपला हक्क दाखवता येत नाही.

# आठवडा सहावा

## विशिष्ट विषयासंबंधीचा उपदेश (Topical Sermons)

या प्रकाराच्या उपदेशाचा केन्द्र एक विशिष्ट विषय किंवा एक विचार असतो व त्याकरीता सम्पूर्ण बाइबल मधून वचने निवडली जातात. असा उपदेश तयार करण्यास बाइबल शब्दकोश फारच उपयोगी ठरतो कारण त्याच्या सहायतेने शास्त्रातील अनेक भागांमधून वचने मिळू शकतात. असल्या प्रकारच्या उपदेशाचे उदाहरण पुढीलप्रमाणे आहे:

### या आणि प्या

मुख्य विषय : जीवनाचे पाणी

शास्त्रभाग : येशू उभा राहून मोठ्याने म्हणाला, "कोणी तान्हेला असला तर त्याने मजकडे यावे आणि प्यावे" (योहान ७:३७).

प्रस्तावना : पाण्यासाठी तुम्ही कधी व्याकूळ झालात का? इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा पाणीच हवे असा अनुभव तुम्हाला कधी आला का? किंवा याची माहिती तुम्हाला आहे का? (पाण्याचे महत्त्व या विषयावर विवेचन करा.)

रूपरेषा :

१. जीवनाचे पाणी — त्याचे गुणविशेष
   १. जिवंत — योहान ४:१०
   २. निर्मल — प्रकटी २२:१
   ३. शुद्ध — प्रकटी २२:१
   ४. भरपूर — यहेज्केल ४७:१—९
   ५. मोफत — प्रकटी २१:६

२. ते कोणसाठी दिले आहे?
   १. तान्हेल्यांसाठी — प्रकटी २१:६
   २. कोणालाही — प्रकटी २२:१७

३. ते मिळवण्याची पद्धत
   १. या — प्रकटी २२:१७
   २. घ्या — प्रकटी २२:१७

निष्कर्ष : विद्यार्थ्यांनी निष्कर्ष तयार करावा.

(आठवड्याच्या बाकी दिवसांत, विद्यार्थी या प्रकारच्या उपदेशांची रूपरेषा तयार करतील व वर्गात उपदेश करतील.)

# आठवडा सातवा व आठवा

## स्पष्टीकरणात्मक उपदेश (Expository Sermons)

आतापर्यंत अभ्यासलेल्या उपदेशांच्या प्रकारापेक्षा ही पद्धत वेगळी अशी की यामध्ये घेतलेल्या शास्त्रभागातील वचनांचे पूणपणे स्पष्टीकरण केले जाते; मूळपाठविषयक (Texual) व विशिष्ट विषयासंबंधीच्या (Topical) उपदेशामध्ये घेतलेल्या वचनांतील एकाच विचाराचे किंवा एकाच विषयाचे विवरण केले जाते. सामान्यत: उपदेशाच्या प्रकारांध्ये स्पष्टीकरणात्मक उपदेशाला सर्वश्रेष्ठ समजले जाते.

स्पष्टीकरणात्मक उपदेशाचे फायदे:

१. यामुळे पवित्र शास्त्राची आवड असणारे उपदेशक व श्रोते तयार होतात. त्यांच्यात पवित्र शास्त्रीय दृष्टिकोण निर्माण होतो.

२. उपदेशाची पवित्र शास्त्रीय पद्धत निश्चित होते. येशूने या पद्धतीचा वापर केला (लूक ४); स्तेफनाने केला (प्रेषित ७:८), पौलाने केला (प्रेषित २८) आणि पेत्राने केला (प्रेषित २, ३).

३. या उपदेशाचे क्षेत्र विशाल आहे. ही ऐकणाऱ्यांच्या रोजच्या जीवनात सत्य लागू करता येण्याचे अधीक अवसर देते.

या पद्धतीचे काही तोटेसुद्धा आहेत:

१. ही मंडळीला तेच तेच म्हणून कंटाळवाणी वाटू शकते.

२. उपदेशक आळशी होतो. निवडलेल्या शास्त्रभागातील सत्यावर प्रभावी प्रवचन न देता, वचनामागून वचने वाचली जावून त्यावर काहीं थोडे विचार प्रकट करून टाकायचे असा धोका यामध्ये होवू शकतो.

३. शास्त्रभाग खूपच लांब असू शकतो, त्यामुळे मंडळी गोंधळात पडू शकते.

४. कधी कधी ही पद्धत फारच जखडबंद होवून जाते व त्यामुळे उपदेशक सद्यस्थितीवर बोलत नाही. स्पष्टीकरणात्मक उपदेशामध्ये एकच मध्यवर्ती कल्पना असावी म्हणजे विचारांमध्ये गोंधळ होणार नाही. तसेच शास्त्रपाठ अनेक भागातून घेतले असावेत त्यामुळे तेच तेच होवून कंटाळवाणे होणार नाहीं. उपदेश फक्त तात्त्विक असू नये, तर त्यात व्यावहारिकता पण असावी.

स्पष्टीकरणात्मक उपदेशाचा नमूना किंवा उदाहरण:

## एका मरणातून जीवन

मूळ कल्पना : येशू ख्रिस्ताचे मरण

शास्त्रपाठ : रोम. ५:६—११.

“आपण दुर्बल असतांनाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला,” इ.

प्रस्तावना : पौलाच्या शिक्षणामध्ये याचे स्थान.

रूपरेषा:

१. कोणीतरी मृत्यू पावले
    १. ही सर्वसामान्य गोष्ट आहे — प्रत्येकजण मरतो.
    २. पण ही असामान्य गोष्ट आहे, आपण पुढील गोष्टी लक्षात घेतल्या तर,
        अ. जो मरण पावला त्याचे गुणविशेष
        ब. त्याला मरण टाळता आले असते
        क. त्याच्या मरणाशी संबंधित असलेले दावे
२. ज्यांच्यासाठी ख्रिस्त मरण पावला ते लोक
    १. पापी, देवहीन, अशक्त, शत्रू
    २. “त्यांच्यासाठी मरण पावला” या शब्दांचा अर्थ
३. ख्रिस्ताच्या मरणाचा हेतू
    १. नकारात्मक : मानवावर प्रेम करण्यास देवाचे मन वळवण्यासाठी नाहीं
    २. होकारात्मक : मानवात मनात बदल व्हावा म्हणून
        अ. देवासमोर धर्मी ठरवला जावे
        ब. देवाबरोबर समेट केलेले असे व्हावे
        क. देवाच्या क्रोधपासून सुटका व्हावी.
        ड. त्याच्या जीवनाने तारण प्राप्त व्हावे.

निष्कर्ष : आम्ही त्या वधस्तंभाची सार्थकता ओळखतो का?

(आठवड्याच्या बाकी दिवसांत, विद्यार्थी या प्रकारच्या उपदेशांची रूपरेषा तयार करतील व वर्गात उपदेश करतील.)

# ४ कळपाची काळजी घेणे

१ पेत्र ५:२ मध्ये पेत्र म्हणतो : "तुम्हांमधील देवाच्या कळपाचे पालन करा." पेत्राला जेव्हा येशूने तीन वेळा विचारले की तू माझ्यावर प्रीती करतोस का, त्या दिवसाची त्याला निश्चितच आठवण होती यात संशय नाही (योहान २१:१५–१७). प्रत्येक वेळी, प्रश्नानंतर येशूने त्याला मेंढरांना व कोंकरांना चारण्यास सांगीतले. आज येशू हीच आज्ञा या देशातील खेडी व नगरे यांत त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्यांना त्याने पाचारण केले आहे त्या सर्वांस देतो.

नवीन तरुण मेंढपाळांना पेत्राची आणखी एक सूचना होती. त्यांना फक्त कळपाचे पालन करायचे असे नव्हते, तर त्यांना "त्याची देखरेख करा," आणि "कळपाला कित्ते (आदर्श) व्हा" असा निर्देश दिलेला आहे. याचा अर्थ असा की त्यांनी लोकांचे प्रश्न, समस्या, ओझी समजून घ्यावित आणि सर्वदा कळपास जीवन व वर्तणूक यासाठी आदर्श असे ठरावे.

या पाठांमध्ये अनेक विषय आहेत: सुवार्ता सांगणे, सल्लामसलत करणे, सर्वसमर्थ देवाचे वकील म्हणून जगणे. पेत्राच्या शब्दांमध्ये या अभ्यासक्रमाचे ध्येय लक्षात येते. "कळपाचे पालन करा. . . . मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रगट होईल तेव्हा तुम्हांस गौरवाचा न कोमेजणारा हार प्राप्त होईल" (१ पेत्र ५:४).

या पाठांमध्ये मिळणाऱ्या अनेक अत्यंत उपयुक्त तथ्यांसाठी भारताच्या वेल्लोर शहरात असलेल्या ब्लेसिंग बुक्स् संस्थे द्वारे प्रकाशित आर. स्टैनली ह्यांचे पुस्तक 'प्रीचर्स एण्ड् पीपूल' अत्यंत सहायक ठरले आहे.

## पाठ १ : वचनाची घोषणा करा

वचनाची अशी घोषणा ज्यामुळे दीर्घकाळ टिकणारे फळ प्राप्त होईल, ती देवाच्या वचनावर आधारीत असते. देवाच्या वचनामुळे झालेल्या अनेक संजीवनांचा उल्लेख जुन्या करारात आढळतो. उदा. राजा योशियाच्या वेळी (२ राजे २२:८–११). एज्राच्या दिवसात (एज्रा ७:१०). आमोसने देवाच्या वचनाच्या दुष्काळाविषयी सांगितले आहे (आमोस ८:११–१२), आणि ते दिवस आम्हांवर केव्हाच आलेले आहेत असे वाटते! अनेक उपदेशातून फक्त कथा–कथानक आणि व्यक्तिगत अनुभवच ऐकायला मिळतात, पण देवाच्या वचनाचे खरे स्पष्टीकरण फारच कमी वेळा केले जाते.

दूध चांगले आहे, पण किती दिवस? उत्तम मांसाहाराशिवाय परिपक्वता येत नाही.पौल म्हणतो, देवाचे वचन गाजवा (२ तीमथ्य ४:२–४). वचनाची घोषणा करणे आवश्यक आहे.

चर्चा : वर सांगितलेल्या उताऱ्यांचा अभ्यास करून देवाच्या वचनावरच आधारीत उपदेश करण्याचे फायदे याविषयी चर्चा करा.

## पाठ २ : आम्हांस संजीवन का हवे आहे?

संजीवन म्हणजे शेवट नाहीं. ते अंतिम गोष्टीचे साधन आहे, वह अंतिम गोष्ट सुवार्तेचा प्रसार आहे. संजीवन म्हणजे सुवार्ताप्रसार नसून ते सुवार्ताप्रसारास कारणीभूत ठरणारे आहे. दावीद प्रार्थना करतो, “तू केलेल्या उद्धाराचा आनंद मला पुन्हां होऊ दे . . . म्हणजे . . . पातकी तुझ्याकडे वळतील” (स्तोत्र ५१:१२–१३). वेल्स येथील संजीवनाच्या काळात, इव्हान रॉबर्टस यांनी प्रार्थना केली की, “देवा, मंडळीला वाकव व जगाला आशीर्वाद दे.” मागे घडलेल्या अनेक संजीवनांमुळे मोठ्या मिशनरी चळवळी व सुवार्ताप्रसारकीय कार्यांची सुरुवात झाली. पण काही कार्ये खूप लवकर विझली व थंड झाली. याच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे संबंधित पुढऱ्यांनी संजीवनातून मिळणाऱ्या आशीर्वादांची सुवार्ताप्रसारकीय कामाशी व आत्मे जिंकण्याच्या कार्याशी व्यवस्थित जोड घातली नाहीं.

देवाच्या लोकांना बरे वाटावे, ते उत्तेजित व्हावेत, यासाठी पवित्र आत्म्याचा वर्षाव करण्यात देवाला अभिरूची नाही. नाहीं! त्याला जगामध्ये रूची आहे.

संजीवनाला उशीर होण्याच्या अनेक कारणांपैकी एक म्हणजे आपल्याला संजीवनाची गरज का आहे, हेच आम्हांस कळत नाही.

चर्चा : तुमच्या मंडळीत संजीवनाची गरज आहे, हे कोणत्या कारणावरून तुमच्या लक्षात येते? त्यासाठी एकत्रितरित्या प्रार्थना करा.

## पाठ ३ : संजीवनासाठी उपदेश करणे

देवाविषयी तुमचे लोक थंड झाले आहेत का? असंवेदना, मत्सर, दुष्ट बोलणी इ. तुमच्या कळपात आहेत का? त्यांच्यात चोरी, लबाडी, इ. पातके आहेत का? जर तसे असेल, तर त्यांना संजीवनाची गरज आहे. संजीवन म्हणजे पुनरुज्जीवित होणे. सुवार्ता व संजीवन यात फरक आहे. प्रभूकडे येण्यासाठी पातक्याला सुवार्तेची गरज असते. पण पुनर्जन्म पावलेली व्यक्ति पतन पावली असेल किंवा थंड झाली असेल, तर अशा व्यक्तिला संजीवनाची गरज असते.

१. संजीवन कसे मिळवावे? २ इतिहास ७:१४ मध्ये याविषय चार साध्या पायऱ्या दिसतात.
   १. स्वत:ला दीन करणे.
   २. प्रार्थना करणे.
   ३. देवाच्या दर्शनाविषयी उत्सुक होणे.
   ४. दुष्ट मार्गापासून परावृत्त होणे.

२. संजीवनाचे परिणाम :
   १. देव तुमची प्रार्थना ऐकेल.
   २. तुमच्या पापांची क्षमा करील.
   ३. आरोग्य देऊन सामर्थ्ययुक्त करील.

संजीवनासाठी तुम्ही तहानेले आहात का? तर त्यासाठी प्रार्थना करा आणि प्रभावीपणे त्यासंबंधी उपदेश करा.

चर्चा : तुमच्या कळपात संजीवनाची तहान जागृत होण्यासाठी तुम्ही काय कराल? करता येतील अशा व्यावहारिक योजना सांगा.

## पाठ ४ : संजीवनासाठी प्रार्थना करणे

संजीवनाच्या तयारीसाठी केवळ प्रार्थनेवर अधिक भर देता येत नाही. येथे प्रार्थना म्हणजे संजीवनासाठी केलेली साधी विनवणी नाहीं. येथे प्रार्थनेचा अर्थ स्वपरीक्षण व पापांची कबुली करणे आहे (प्रकटी २:२३). तो परमेश्वराला केलेले पण न फेडलेले नवस (उपदेशक ५:१—६) व इतरांशी केलेल्या वाईट वागणुकीची आठवण करण्याचा समय आहे (मत्तय ५:२३,२४).

प्रार्थनेमुळे खरी नम्रता येते. कारण परमेश्वराच्या सान्निध्यात आम्हांस आपली नगण्यता व त्याचे पावित्र्य कळते (यशया ६:१—५). ही आमची अपूर्णता प्रकट करून परमेश्वराची शक्ती व सामर्थ्य मिळण्यासाठी केलेली याचना आहे (मत्तय. २६:४१).

देवाला असे यज्ञ आवडतात आणि त्याची अग्नी त्यांवर अवश्य उतरते (स्तोत्र ५१:१७–२९). जेव्हा एलीयाने परमेश्वराची वेदी दुरुस्त केली, तेव्हा तीवर अग्नी उतरला. जेव्हा येशूने प्रार्थना केली तेव्हा स्वर्ग उघडला. जेव्हा आरंभीच्या मंडळीने प्रार्थना केली तेव्हा भूमि कंपित झाली.

प्रार्थनेमुळे, पृथ्वीवर कार्य होण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य मिळते. देव आपल्या लोकांना त्यांच्या गुडघ्यांवरच भग्न करतो आणि घडवितो.

चर्चा : वरील वचनांवर मनन करा आणि प्रत्येक घटनेत प्रार्थनेचा प्रभाव कसा घडला या विषयी भाष्य करा.

## पाठ ५ : प्रेम – संयुक्त सेवा

स्वर्गारोहण होण्यापूर्वी येशूने पेत्राला एक प्रश्न विचारला, "तू माझ्यावर प्रेम करतोस का?" (योहान २१:१५–१७). प्रेम हा ख्रिस्ती सेवकाच्या सेवेचा पाया आणि मनोरा आहे. येशूने जेव्हा पेत्राला प्रथम पाचारण केले, तेव्हा त्याला <u>माणसे धरणारा</u> होण्यास बोलावले – मत्तय ४:१९. आणि आता तो त्याला <u>कळपाचे पालन करणारा</u> होण्याची कामगिरी सोपवितो, योहान २१:१५–१७. आत्मे जिंकणे व कळपाचे पालन करणे या दोन्हीं कामांविषयी आम्हांस प्रेम वाटले पाहिजे. एक म्हणजे हरवलेल्यांसाठी प्रेम व दूसरे, सापडलेल्यांसाठी प्रेम. आत्मे <u>आणले</u> पाहिजेत व त्यांना <u>वाढवले</u> पाहिजेत.

चर्चा : तारण न झालेले व तारलले यांना देवाचे प्रेम दाखवण्याच्या दैनंदिन जीवनातील पद्धतीं कोणत्या?

## पाठ ६ : सार्वजनिक सेवा

पाळकीय सेवेसाठी तयार होणाऱ्या व्यक्तिला मिळणारा सर्वात मोठा लाभ म्हणजे लोकांसमोर उभे राहून शुभवर्तमान सांगणे. अशा सेवेत अभ्यास व अनुभव यांचा समावेश असून, पातक्याचे परिवर्तन व विश्वासणाऱ्यांना दृढ करण्यासाठी देवाचे आशीर्वाद आवश्यक आहेत.

उपदेशकाने आठवण ठेवायला हवी की त्याला देवाच्या वतीने देवाचा संपूर्ण मनोदय सांगायला पाहिजे. त्यामध्ये सुवार्ताप्रसार, पवित्र शास्त्रातील तत्त्वे, शिकवण, दोष दाखविणे, आग्रहाने विनवणे, ताकीद देणे इ. बाबीं येतात (प्रेषित २०:२७)

त्याने जाहीरपणे प्रार्थना करण्यास शिकावे, व हे वैयक्तिक एकांतवासातात केलेल्या अत्यंत प्रार्थनेमुळे शिकता येते. पाळकीय प्रार्थनेद्वारे तो मंडळीला, अतीव आदरणीय आराधनेच्या वातावरणात देवाच्या सान्निध्यात उंचवतो.

उपदेशकाने पवित्र शास्त्र स्पष्ट, आदराने आणि स्पष्ट समजेल असे वाचण्यास शिकावे (नहेम्या ८:८).

उपदेशकाला “देवाची जी मंडळी . . . तिचे पालन तुम्हीं करावे” अशी आज्ञा केली आहे (प्रेषित. २०:२८) व ते त्याने प्रवचन, उपदेश व बाइबलचे अशे धडे शिकवूण करावे जे ऐकणाऱ्यांच्या व्यक्तिगत आवश्यकतेप्रमाणे असतील.

उपदेशकाने आपल्या मंडळीचे खोट्या शिक्षणापासून व खोट्या शिक्षकांपासून संरक्षण करावे (प्रेषित, २०:२९, ३०) व मंडळीतील गरीबांची काळजी घेण्याची जबाबदारी पण त्याच्यावर आहे (प्रेषित. ११:२९, ३०).

तारण न झालेल्या लोकांमध्ये व जेथे मंडळी उपलब्ध नसेल अशा भागांत जाण्यासाठी आपल्या मंडळीचे नेतृत्व करण्याची त्याला संधी मिळते.

उपासना समाप्त करताना मंडळीवर देवाचा आशीर्वाद व्यक्त करणे ही त्याची जबाबदारी आहे (गणना ६:२३–२७, प्रकटी. १:४, ५).

१ करिंथ २:१६ मध्ये एक गंभीर प्रश्न विचारला आहे की, “प्रभुचे मन कोणी ओळखले आहे;” आणि २ करिंथ ३:५ मध्ये विजयी उत्तर आहे— “आमची पात्रता देवाकडून आहे.”

चर्चा : वर सांगितलेल्या जबाबदाऱ्यांपैकी कोणत्या जबाबदाऱ्यांची पूर्तता करणे कठीण आहे असे वाटते? तुमच्या मते जास्त महत्त्वाच्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत?

## पाठ ७ : तुमच्या सेवेत समतोल ठेवा

आम्ही उपदेश करताना टोकाच्या भूमिका टाळाव्यात आणि आध्यात्मिक विक्षिप्तपणा करण्याचे टाळवे. देवाच्या प्रेमाविषयी व त्याच्या पाप सहन न करणाऱ्या पावित्र्याविषयी, स्वर्ग व नरकाविषयी, देवाच्या समागमात व त्याच्या सान्निध्यात चालण्याविषयी व त्याची सेवा करण्याच्या व्यावहारिक पद्धतींविषयी, संजीवन व सुवार्ताप्रसाराविषयी मंडळीला शिकवण द्या. पौल म्हणू शकला की, “देवाचा संपूर्ण मनोदय तुम्हांला सांगण्यास मी कसूर केली नाही” (प्रेषित २०:२७).

तुम्ही ज्या विषयांवर उपदेश करता त्यांची यादी बनवणे व येणाऱ्या काही महिन्यांत प्रचार करण्यासाठी उपदेशांच्याबाबत योजना आखणे फायद्याचे होईल. तुमचे मन व हृदय त्यानुसार सामर्थ्य पावत जाईल व देवाच्या मनोदयातील महत्त्वाची सत्ये सांगण्याचे विसरणार नाही.

अभ्यास : तीन महिन्यांच्या कालावधीसाठी करावयाच्या उपदेशांच्या विषयांची यादी बनवा.

## पाठ ८ : नियमित मूल्यमापन

प्रत्येक महिन्यातून एखादा दिवस आणि वर्षातून एक किंवा दोन वेळा काही दिवस आत्मपरीक्षण व मूल्यमापनासाठी राखून ठेवावेत. तुमची ध्येये तुम्हांस कळतात का? तुम्हांस काही फळे दिसतात का? याची माहिती अधूनमधून घ्यावी. यश व आशीर्वाद यांमुळे पुढील कामांकडे आमचा कानाडोळा होवू शकतो व अचानक येणाऱ्या अरिष्टामुळे आम्ही तोपर्यंत केलेली प्रगती विसरून जाऊ शकतो. म्हणून अधूनमधून थांबणे व आपल्या सेवकेचे मूल्यमापन करणे अत्यंत लाभदायक होते. चुकांची दुरुस्ती करणे जरुरीचे असते, प्रेषित योहानाकडूनही दोन वेळा चुका झाल्या, तो दोन वेळा देवदूताला नमन करणार होता. त्याची चुक सुधारली गेली. (प्रकटी. १९:१०; २२:८,९).

चर्चा : तुमची सेवा सुरू करताना तुम्ही कोणती ध्येये पूर्ण करण्यासाठी जोरदार प्रयत्न करायला हवा?

## पाठ ९ : सल्लामसलतीची सेवा

सहायक पाळकाला तारण व वैयक्तिक समस्यांबाबत वैयक्तिकरित्या लोकांशी बोलता यावे. कधी कधी लोकांच्या साक्षीमधील उणीवा, वैगुण्ये त्याने दाखवायला हवीत, मत्तय १८:१५–१७.

शोकग्रस्त व दु:खितांचे सांत्वन करण्यास उपदेशकाने शिकावे.

त्याच्या लोकांच्या वैयक्तिक जीवनाशी त्याने समरूप व्हावे व त्यांचाशी एका कुटुंबातल्याप्रमाणे वागावे. रोम १२:१५.

सर्व वेळी या पृथ्वीतलावर देवाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तो खास प्रकारे नियुक्त केलेला आहे, हे उपदेशकाने सतत स्मरण ठेवावे.

चर्चा : तुमच्या खेड्यात अशा कोणत्या घटना किंवा प्रसंग आहेत की, ज्यामध्ये ख्रिस्ती सल्ला व मदत करण्याची चांगली संधी मिळते?

## पाठ १० : सहभागितेस उत्तेजन देणे

ख्रिस्त आणि त्याचे कुटुंब यांच्याशी कौटुंबिक जवळीकतेच्या संबंधावर सहभागिता आधारीत आहे. ख्रिस्ती लोकांनी एकत्र असावे, एकत्र प्रार्थना करावी, एकमेकांबरोबर बोलावे, एकमेकांबरोबर गावे, हसावे, रडावे — सर्वदा सहभागिता ठेवावी, १ योहान १:७; १:३.

१. सहभागितेचे उद्देश —

१. सेवा आणि सहभागिता भोजनसमयीं एकमेकांस बळ देण्यासाठी:

पुरुषांनी भोजनासाठी, स्त्रियांनी सांयकाळच्या सहभागितेसाठी, मुलांनी खेळासाठी एकत्र यावे — पण हे सर्व देवाच्या वचनासह असावे. यामुळे ख्रिस्तीजन बळ पावतील व बाहेरचे लोक आकर्षित होतील.

२. जीवनातील खडतर प्रसंगात एकमेकांना उत्तेजन देण्यासाठी:
आम्ही हे तर सांगू शकत नाहीं की कोणते मन कधी दु:खाते पण आपण एकमेकांचे ओझे हलके करू शकतो.

३. सर्वांच्या लाभासाठी अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी:
कदाचित आमची साक्ष ऐकून कोणाला तरी त्यामुळे सारखीच चूक करण्यापासून परावृत्त होण्याचा इशारा मिळेल.

४. प्रार्थनांची उत्तरे मिळाल्याचा आनंद इतरांना सांगण्यासाठी:
— स्तोत्र ५०:१५. इतरांना त्यामुळे प्रार्थना करण्यास अवश्य उत्तेजन मिळते.

५. शोक करणाऱ्यांबरोबर शोक करण्यासाठी:
— रोम. १२:१५. जे दु:खित आहेत त्यांच्या सोबत अश्रू ढाळून, दु:खी होण्याची व सहन करण्याची सहभागिता द्यायला हवी.

६. पतन झालेल्यांनी देवाकडे वळावे म्हणून आग्रहाने विनवण्यासाठी.

२. ख्रिस्ती सहभागितेचा परिणाम

१. आम्ही प्रकाशात चालण्यास शिकतो — १ योहान १:७.
२. आम्ही एकत्र दु:ख सोसण्यास शिकतो — फिलिप्पै ३:१०.
३. आम्ही एकत्र सेवा करण्यास शिकतो — कलस्सै ४:७
४. आम्ही एकमेकांचे सांत्वन करण्यास शिकतो — १ थेस्सल ४:१८.
५. आम्ही एकमेकांसाठी प्रार्थना करण्यास शिकतो — १ थेस्सल ५:२५.
६. आम्ही एकमेकांची ओझी वाहण्यास शिकतो — गलती ६:२.
७. आम्ही आनंद करण्याऱ्यांबरोबर आनंद करण्यास शिकतो — रोम १२:१५. आनंद हा संसर्गजन्य आहे. एकामुळे दुसऱ्यास होतो.
८. आम्ही ख्रिस्तासाठी वाढतो व प्रकाशतो — २ पेत्र ३:१८.

चर्चा : तुमच्या मंडळीत कोणत्या प्रकारची सामाजिक सहभागिता उपयुक्त होईल?

## पाठ ११ : सुवार्ताप्रसारासाठी उपदेश

उपदेशामध्ये वापरण्यासाठी देवाच्या सेवकाला अमर्याद विषय आहेत. पण त्यामध्ये समतोल असणे अत्यंत आवश्यक आहेत. तारणासाठी अर्थात् आत्मे जिंकण्यासाठी उपदेश करण्याची आवश्यकता नाहीं असे मानणे व केवळ तारलेल्यांसाठी पोषक असे उपदेश करणे

व नविन लोकांनी तारण पावे अश्या उद्देशाने उपदेश न करणे धोक्याचे ठरेल.

खरी गोष्ट अशी आहे की, पुष्कळ लोक स्थानिक मंडळीचे सभासद असतात, पण खऱ्या मंडळीचे — ख्रिस्ताच्या शरीराचे — अवयव नसतात. तारणाचा अनुभव नसतो. जोपर्यंत मनुष्याचे तारण होत नाहीं तोपर्यंत तो हरवलेला असतो. अशा तारण नसलेल्या सभासदांवर स्थापलेल्या मंडळीत जीवन नसते, संदेश नसतो, रूपांतराचे सामर्थ्य नसते.

संकटाची सूचना देणारा शंख न वाजविणाऱ्या पहारेकाऱ्याविषयी यहेज्केल काय सांगतो याची आठवण उपदेशकाने ठेवायची (यहेज्केल ३३:६).

अभ्यास : सुवार्ताप्रसारासाठी योग्य अशा उपदेशांसाठी असलेले विषय व पाठ्यांश यांची यादी करा.

## पाठ १२ : तारणाची खात्री

खरे तारण झाले आहे किंवा नाही याची जर मंडळीतील एखाद्याला शंका असेल तर काय?

विश्वासणाऱ्याने दुसऱ्यांना आध्यात्मिक मदत करावयाची असेल, तर त्याला स्वत:ला तारणाची खात्री असणे आवश्यक आहे. अशी खात्री असण्याचा अर्थ असा पक्का विश्वास असणे आहे की आपले तारण झाले आहे व आता आकस्मित मृत्यु आला तरी, आम्ही लगेच स्वर्गात जाणार, योहान १०:२८, २९.

१. तारणाच्या खात्रीचा आधार
   १. पवित्र आत्म्याची साक्ष — रोम ८:१६, गलती ४:६.
   २. देवाचे वचन — १ योहान ५:१०,१३; योहान ५:२४; रोम १०:१३.
      सैतानाला म्हणा, “देवाचे वचन आहे की, जर मी येशूवर विश्वास ठेवतो तर मला सार्वकालिक जीवन मिळाले आहे. ............ (तारीख लिहा) या दिवशी मी येशूवर विश्वास ठेवला, म्हणून मला सार्वकालिक जीवन मिळाले आहे. माझे तारण झाले आहे. माझ्या पापांची क्षमा झाली असून मी स्वर्गाच्या वाटेवर आहे!”
   ३. बदललेले जीवन — १ योहान ३:१४; २ करिंथ ५:१७.
२. तारणाच्या खात्रीमध्ये येणारे अडथळे
   १. देवाच्या वचनावर विश्वास ठेवण्यातील अपयश.
   २. सांसारिकपणा
   ३. पवित्र आत्म्याने भरले न जाणे — योहान ७:३७—३९.
   ४. पाप आणि पतन — १ योहान १:९.

इशारा : लोकांचे तारण झाले आहे अशी समजूत करण्यापासून सावध राहा. ते अंत:करण जाणणाऱ्या पवित्र आत्म्याचे कार्य आहे.

अभ्यास : विद्यार्थ्यांनी दोघादोघांच्या जोड्या करून संभाषणात एकाने तारणाची खात्री नसलेल्याची विधाने करावी व दुसऱ्याने देवाच्या वचनामधून मार्गदर्शन करणारी विधाने करीवात.

## पाठ १३ : नवीन पुनर्जन्म झालेल्यांना शिस्त लावणे

एक नवीन विश्वासणारा ख्रिस्तामध्ये नूतन बालकाप्रमाणे असतो व त्याला आताच जगामध्ये जन्म घेतलेल्या तान्ह्या मुलाप्रमाणे कोमल प्रेमळ काळजीची गरज असते.

पुनर्जन्म झालेल्यांच्या जीवनातील पहिला आठवडा फारच महत्त्वाचा असतो. कारण सैतान सर्व प्रकारच्या संशयाची मुळे त्याच्या हृदयात रोपणयाचा प्रयत्न करतो. रोज त्याची भेट घ्या. एकत्र शास्त्र वाचा व प्रार्थना करा.

त्याला आपल्या नवीन विश्वासासंबंधी साक्ष देण्याची संधी मिळवून द्या. त्यामुळे त्यास उत्तेजन मिळेल व इतर अविश्वासणाऱ्यां मित्रांसाठी ती प्रभावी साक्ष ठरेल.

तुमच्या मंडळीत नवीन जन्म पावलेल्यांच्या बाप्तिस्म्याच्या तयारीसाठी पवित्र शास्त्राचा प्रश्नोत्तररूपी अभ्यासक्रम असेलच. त्याने विश्वासाची कबुली दिल्याबरोबर या अभ्यासक्रमास सुरुवात करा.

नूतन जन्मलेला देवाच्या वचनाने तृप्त केला गेला पाहिजे — त्याची वृद्धि होण्यासाठी हे निरे दुध आहे (१ पेत्र २:२). तो पवित्र शास्त्राच्या अभ्यासवर्गाचा सदस्य बनतो ह्याची खात्री करून घ्या.

येथे मोठा भाऊ/लहान भाऊ किंवा बहिणींची जोडी बनवण्याचा चांगला अवसर आहे. काळजीपूर्वक एका नविन विश्वासणाऱ्याची एका पक्व प्रेमळ ख्रिस्ती व्यक्तिशी जोडी बनवा की तो देवाच्या विपुल प्रीतीत वाढण्यास त्याचे मार्गदर्शन करेल व त्याच्या बरोबर प्रार्थना करेल.

चर्चा : तुमच्या मंडळीतील नूतन ख्रिस्ती जनांस तुम्ही कसे उत्तेजन देऊ शकाल? मोठा/छोटा भाऊ म्हणून कशी जोडी लावता?

## पाठ १४ : साक्ष का द्यावी

*शास्त्रपाठ — मत्तय १०:३२, ३३;रोम १०:९.*

१. आपण ख्रिस्ताला स्वीकारले आहे, याची जाहीर कबुली देण्याची गरज आहे.

१. ख्रिस्ताने तशी आज्ञा केली आहे — मत्तय १०:३२,३३.

२. आमच्या स्वतःच्या जीवनात अशा प्रकारे साक्ष दिल्याने सामर्थ्य व मदत मिळते. साक्ष देणाऱ्याचे पतन होत नाही.

३. साक्ष देण्याने अनेक प्रश्न सोडविले जातात. तुमचा विश्वास पाहून इतर लोकांना तुमचा विश्वास काय आहे हे कळते व तुमच्या स्पष्ट निश्चितपणासाठी ते तुमचा आदर करतात. दुबळे, अशक्त, गुप्त ख्रिस्ती लोकांचा जग तिरस्कार करते. सांसारिक आकर्षणाच्या जागेंवर जाण्याची अभिलाषा संपते.

४. ख्रिस्ताने तुम्हांसाठी काय केले हे सांगण्यासाठी तुम्हीं साक्ष द्यावी.

२. ख्रिस्ताला स्वीकारल्याची कबुली देण्याच्या पद्धतीं

१. उपासनासभेत, प्रार्थनासभेत किंवा साक्षसभेत उघडपणे तुम्ही साक्ष देऊ शकता.

२. मित्र, नातेवाईक, शेजारी यांच्याशी खाजगीरित्या साक्ष देता येते. ही कठीण आणि तरीही आत्यावश्यक पद्धत आहे.

३. सार्वजनिक बाप्तिस्मा घेऊन, चांगल्या मंडळीचे सभासद होऊन कबुली देता येते.

४. मंडळीच्या प्रत्येक उपासनेत व प्रभुभोजनात (सहभागितेचे मेज) उपस्थित राहून.

५. उघडपणे साक्ष, कबुली पुनः पुनः द्यावी — यिर्मया २०:९.

टीप : विश्वासाची कबुली, साक्ष दिली नाही, तर ख्रिस्ती जीवन उपासमार होऊन मृतवत होईल.

चर्चा : तुमच्या परिचयातील अत्यंत प्रभावी साक्षीदार कोण आहे? इतरजणांना साक्ष देण्यास कसे प्रवृत्त करता येईल?

## पाठ १५ : आत्मे जिंकाणाऱ्या व्यक्ति

देव अजूनही बोलावीत आहे. "मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल?" (यशया ६:८). हा खेद आजही खरा असून येशू म्हणतो, "कामकरी थोडे आहेत ... " (लूक १०:२). सेवेसाठी इतरांना पाठविण्याच्या दृष्टीने आज मंडळी वाढत आहे, पण वैयक्तिकरित्या आत्मे जिंकणाऱ्या लोकांची मात्रा मंडळीत कमी होत आहे.

याविषयी तुम्हीं काय करू शकता? ही स्थिति बदलण्यासाठी तुम्हीं जे काही करू शकता ते सर्व करायला हवे. आम्हीं आपल्या संपूर्ण देशामध्ये सुवार्ताप्रसार करू शकत नाहीं जोपर्यंत प्रत्येक ख्रिस्ती आत्मे–जिंकणारा बनणार नाहीं.

तुम्ही करू शकाल अशा चार गोष्टी आहेत:

१. स्वतःच्या उदाहरणाने नेतृत्व करा.

२. आत्मे जिंकण्याचे महत्त्व यावर एकामागून एक असे व्यवस्थितपणे उपदेश द्या.

३. “आत्मे जिंकणे” या विषयावर प्रशिक्षण देण्याची घोषणा करून पाठ—मालिकेचा वर्ग सुरू करा.
४. “आत्मे जिंकणे” या विषयावर कार्यानुभव पुस्तिका किंवा लेख मिळवून त्याचे तुमच्या लोकांमध्ये वाटप करा.

तुम्ही आपल्या लोकांना आत्मे जिंकणारे बनविण्याकडे व त्यांना बाहेर—जेथे पापी लोक आहेत तेथे पाठवण्याकडे दुर्लक्ष केले, तर तुम्हीं तुमच्या पाचारणात अपयशी ठराल!

अभ्यास : आम्ही आमच्या उदाहरणाद्वारे लोकांना आत्मे जिंकणारे कसे बनवू शकतो? तीन निश्चित कल्पना तयार करा.

## पाठ १६ : आत्मे जिंकण्याची कारणे

संदेश देण्यासाठी फार थोड्यांना पाचारण झाले आहे. परंतु नवा जन्म पावलेल्या प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिला आत्मे जिंकण्यासाठी पाचारण करण्यात आलेले आहे. तुम्ही तुमच्या लोकांना आत्मे जिंकण्याचा आनंद अनुभव व्हावा अश्या सेवेकडे मार्गदर्शन करायला हवे. “आत्मे जिंकणे म्हणजे एका निश्चित अशा व्यक्तिला, निश्चित अशा वेळी, निश्चित अशा तारणाऱ्याचा स्वीकार करण्याकडे घेऊन जाण्याचा निश्चित स्वरूपाचा प्रयत्न आहे.” — बिली संडे.

१. आत्मे जिंकणारे का असावे?
    १. आत्म्याचे मूल्य — मार्क ८:३५—३९.
    २. नरकाची वास्तविकता — लूक १२:४—५
    ३. प्रत्येक पाप्यासाठी ख्रिस्ताने वधस्तंभावर केलेले दु:खसहन — पेत्र ३:१८
    ४. या जगाचा उथळपणा व व्यर्थता — १ पेत्र १:२४—२५
    ५. आपल्या कौटुंबाचे सर्वजण स्वर्गामध्ये असावे अशी इच्छा — १ थेस्सल ४:१६,१७
    ६. स्वर्गाचे गौरव — योहान १४:२,३
    ७. आत्मे जिंकणाऱ्या विश्वासू जणांसाठी देऊ करण्यात आलेले वैयक्त्कि प्रतिफळ — दानीएल १२:३
२. वैयक्तिक कार्यकर्ता होण्यासाठी आवश्यक बाबी:
    १. आवश्यक आहे की त्याचे स्वत:चे तारण झालेले असून त्याबद्दल त्याची खात्री असावी — २ पेत्र १:१०—११
    २. आवश्यक आहे की त्याने शुद्ध जीवन जगावे — २ पेत्र ३:१४
    ३. आवश्यक आहे की त्याने प्रीतीच्या आत्म्याने कार्य करावे — १ पेत्र १:२२,२३
    ४. आवश्यक आहे की त्याला पवित्र शास्त्राचे बऱ्यापैकी ज्ञान असावे व त्याचा

वापर कसा करावयाचा हे समजले पाहिजे – २ तीमथ्य २:१५

५. आवश्यक आहे की त्याने प्रार्थनाशील व्यक्ति असावे – इफिस ६:१८
६. आवश्यक आहे की तो पवित्र आत्म्याने भरलेला असावा – इफिस ५:१८
७. आवश्यक आहे की हरवलेल्या आत्म्यांविषयी त्याला कळवळा असावा – यहूदा २३

चर्चा : वर उल्लेख केलेली प्रत्येक आवश्यक बाब महत्त्वाची का आहे?

## पाठ १७ : साक्ष कशी द्यावी

१. साक्ष कशी द्यावी
   १. ख्रिस्तासाठी साक्ष देणाऱ्याचे स्वत:चे तारण झालेले असावे.
   २. तुमच्या परिवर्तनाविषयी व जीवनातील बदलाविषयीच्या साध्या घटना सांगा.
   ३. तुमच्या प्रार्थनांची उत्तरे कशी मिळाली ते सांगा, स्तोत्र ५०:१५.
   ४. ख्रिस्त तुम्हांला पूर्णत: समाधानी व तृप्त कसे करू शकतो, ते सांगा.
   ५. पाप व अभिलाषा यावरील तुमचा वैयक्तिक विजय सांगा.
   ६. पवित्र शास्त्रातील तुमच्या आवडीची वचने सांगा. आज सकाळी देव एखाद्या विशिष्ट वचनाद्वारे तुमच्याशी कसे बोलला ते सांगा.
   ७. तुमच्या मित्रांना ख्रिस्ताचे शुभवर्तमान द्या व ख्रिस्ताविषयी त्यांना सांगा.

२. ख्रिस्ताविषयी सांगण्यात अडथळे
   १. मानवाची भीती वाटणे – २ तीमथ्य १:७; १ योहान ४:१८; फिलिप्पै ४:१३.
   २. लाज वाटणे – २ तीमथ्य १:८.
   ३. अशुद्ध जीवन जगणे – १ योहान १:९.

टीप — साक्ष न देण्यामधील धोके समजून घेण्यासाठी यहेज्केल ३३:८ हे वचन वाचा.

अभ्यास : तुमच्या परिवर्तनातील घटनांवर आधारीत साक्ष तयार करा व त्यामुळे तुमच्या जीवनात कसा बदल घडला ते सांगा.

## पाठ १८. साक्ष देण्याच्या योजना

"चार आध्यात्मिक नियम" ही साक्ष देण्याची कदाचित् सध्या जास्त प्रचलित असणारी व प्रभावी पद्धत आहे.

काळ्या, लाल, पांढऱ्या, सोनेरी व हिरव्या पानांचे शब्दहीन पुस्तक देखील विशेषत: मुलांमध्ये कार्य करण्यास फार चांगले आहे.

तारणाची योजना मुलांना सांगण्याचा आणखी एक मार्ग असून त्यासाठी तुमच्या

हाताच्या बोटांचा वापर करता येईल. कोणत्याही साधनाची किंवा पुस्तकाची गरज नाही.

पहिले बोट — देव तुम्हांवर प्रेम करतो — योहान ३:१६.

दूसरे बोट — सर्वांनी पाप केले आहे — रोम ३:२३.

तिसरे बोट — तुमच्या पापांची किंमत भरून देण्यासाठी ख्रिस्त मरण पावला. — १ करिंथ १५:३—४

चौथे बोट — ख्रिस्त तुमच्या पापांसाठी मरण पावला, यावर विश्वास ठेवा — योहान १:१२.

पाचवे बोट — जेव्हा तुम्ही विश्वास ठेवता, तेव्हा तुम्हांस सार्वकालिक जीवन प्राप्त होते — रोम ६:२३.

काही जण रोमी मार्ग वापरून सुवार्ता सांगणे पसंत करतात. तो स्पष्ट करताना पवित्र शास्त्रातील वचने दर्शवा. (या पद्धतीमध्ये सारी वचने रोमकरास पत्रातून घेतली आहेत म्हणून यास रोमी मार्ग म्हणतात.)

मानवाची गरज — रोम ३:२३

पापाची शिक्षा — रोम ६:२३.

देवाची योजना — रोम ५:८

मानवाची साद — रोम १०:९

चिन्हांकित नवा करार म्हणजे तारणासंबंधीची निवडक वचने नव्या करारात अधोरेखित करून ती वाचून दाखवणे ही देखील चांगली पद्धत आहे. या बाबतीत तुम्ही त्याच्यासाठी घेतलेले कष्ट पाहून, प्रश्नकर्त्याला तुमच्याविषयी आदर वाटेल. रोम ३:२३ हे वचन असलेल्या पानावर १ असा आकडा लिहलेली खुणेची फीत लावा. वचन लगेच सापडण्यासाठी ते अधोरेखित करा. त्या पानाच्या समासामध्ये “दुसऱ्या वचनासाठी पान क्रमांक ___ पाहा ” असे लिहा ___ वर रोम ६:२३ हे वचन ज्या पानावर मिळते त्याचा क्रमांक लिहा व त्या पानावर एक खुणेची फीत लावा ज्यावर तुम्ही २ लिहिले असेल. अश्याच प्रकारे योहान १:१२; १ योहान १:९; प्रकटीकरण ३:२०; १ योहान ५:१०—१३ या वचनांवरही खुणा करा. कोणाला सुवार्ता सांगतांना ह्यावचनांना एका मागून एक वाचून व थोडक्यात त्या वचनांचे स्पष्टीकरण करा.

अभ्यास : वर उल्लेख केलेल्या पद्धतिंपैकी कोणती पद्धत तुम्ही वापरणार हे ठरवा. या वचनांची वर्गामध्ये उजळणी घ्या. नंतर वर्गातील व्यक्तींना तारणाचा शोध करणाऱ्या व्यक्तीच्या व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीच्या भूमिका करायला सांगा. नंतर त्यांनी आपापल्या भूमिका बदलून पुन्हा तसेच करावे. प्रत्येक मुलाखतीचा शेवट निश्चित अशा निर्णयाने आणि पापक्षमेसाठी प्रार्थना करण्याने व्हावा याची काळजी घ्या.

## पाठ १९ : देण्याविषयी शिकवणे

देवाला देणे हे कदाचित् तुमच्या लोकांना फार मोठे ओझे वाटेल. पण देवाला देणे आनंदायक वाटावे म्हणून पुढील गोष्टी त्यांना शिकवा.

१. देवाला आपण कसे द्यावे?

१. पद्धतशीरपणे — १ करिंथ १६:२. "आठवड्याच्या पहिल्या दिवशी." दर आठवड्याला आपण प्रभूला द्यावे. एखाद्या व्यावसायिकाप्रमाणे देवाला द्या आणि तुमच्या प्रामाणिकपणाचे प्रतिफळ देवाकडून मिळवा.

२. वैयक्तिकरित्या — १ करिंथ. १६:२. "तुम्हांतील प्रत्येकाने." फक्त घरातील प्रमुख व्यक्तीने नव्हे, तर आई व मुले ह्यांनीसुद्धा. श्रीमंत व गरिबांनीसुद्धा.

३. योग्य त्या प्रमाणात — "देवाने दिले आहे त्यानुसार." आपण दशमांश आणि अर्पणे द्यावीत. जे देवाला देतात, त्यांना देव भरपूर देतो.

४. आनंदाने — २ करिंथ ९:७ – कुरकूर न करता द्यावे.

५. त्यागाने — २ करिंथ ८:२ – त्यांनी आपल्या गरीबीतून दिले. विधवेने दोन दमड्या दिल्या. तेवढीच तिची कमाई होती. आपण किती दिले हे देव मोजत नाही, तर दिल्यानंतर आपल्याकडे किती शिल्लक राहिले, हे तो पाहतो.

देवाला विपुलतेने, औदार्याने देणाऱ्यांना आशीर्वाद मिळतात — प्रेषित २०:३५; मत्तय ६:२०; मलाखी ३:१०.

इशारा : जर तुम्ही आनंदाने देणार नाही, तर तुमचे लोकही दशमांश देणार नाहीत.

चर्चा : दानार्पणाच्या बाबतीत तुमची मंडळी पवित्र शास्त्रातील पद्धतींचा अवलंब करते का? या बाबतीत तुमच्या मंडळीत काय सुधारणा होण्याची आवश्यकता आहे?

## पाठ २० : बोध कसा करावा?

पापाच्या हल्ल्यापासून शुद्ध होण्यासाठी देवाने आपल्या कृपेचा मार्ग दिलेला आहे. जेव्हा आपण पाप कबूल करतो, तेव्हा तो शुद्ध करतो (१ योहान १:९) . पण जर पाप कबूल केले नाही, तर अंत:करण कठीण होण्याचा धोका असतो. इब्री ३:१३ सांगते : "जोपर्यंत आज म्हटलेला वेळ आहे, तोपर्यंत तुम्ही एकमेकांना प्रतिदिवशी बोध करा; हेतु हा की, पापाच्या फसवणुकीने तुम्हांतील कोणी कठीण होऊ नये." बोध किंवा मार्गदर्शनाद्वारे पाप दूर ठेवणे हे सहभागितेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

एखादा बंधू दोषी वा उणा आहे असे आढळले, तर पुढाऱ्याला त्याच्याविषयी कळवळा वाटला पहिजे आणि त्याला बोध करण्याची आपली जबाबदारी त्याने टाळू नये. त्याने बोध कसा करावा?

१. सौम्यतेच्या आत्म्याने — लूक ९:५४—५६; १ थेस्सल २:११; मत्तय १२:२०.
२. पूर्ण नम्रतेने बोलावे — रोम १२:१०; इफिस ४:२.
३. देवाच्या वचनाचा वापर करावा — २ तीमथ्य ३:१६—४:२; कलस्सै ३:१५
४. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनानुसार करावा — इफिस ५:१८, १९.
५. पवित्र शास्त्रातील पद्धतीनुसार खाजगीरित्या बोध करावा — मत्तय १८:१५. पौलाने तीन वर्षें रात्रंदिवस अश्रु गाळीत प्रत्येकास बोध करण्यात खंड पडू दिला नाही — प्रेषित २०:३१.

चर्चा : एखाद्या व्यक्तीला कठोर शब्दात बोध केला, तर काय होईल? लोकांच्या समोर केला तर? याला तुम्ही कसा प्रतिबंध कराल?

## पाठ २१ : मंडळीमधील पापाचा सामना कसा करावा?

१. पवित्र शास्त्रीय पद्धत — मत्तय १८:१५—१७.
   १. दोषी व्यक्तीकडे एकट्याने जाऊन त्याला पश्चात्ताप करण्याविषयी बोध करावा.
   २. त्याने नकार दिला, तर इतर दोघांना किंवा तिघांना साक्षीदार म्हणून न्यावे.
   ३. जर तो आपले अंत:करण अद्यापही कठीण करीत असेल, तर मंडळीला कळवावे.
   ४. जर तो पश्चात्ताप करण्यास नकार देत राहील, तर त्याला पापी, विदेशी असे समजावे.
२. शिस्त लावण्याची कारणे:
   १. खोटे सिद्धान्त — तीत १:१३. चुकीच्या शिक्षणाने अनेक वेळा विश्वासणारे बहकवले जातात. म्हणून याविषयी सावधगिरी बाळगली पाहिजे.
   २. उघड पाप — १ तीमथ्य ५:२०.
   ३. अनैतिकता — १ करिंथ ५:१—५
३. पाप करणाऱ्या भावाला कसे सुधारावे?
   १. नम्रतेने — १ करिंथ १०:१२.
   २. प्रामाणिकपणे — मत्तय ७:३—५
   ३. प्रेमाने — १ करिंथ १३:४.
   ४. वचनाद्वारे
   ५. साक्ष आणि अनुभवाद्वारे

अभ्यास : पापात जगणारी अशी एखादी व्यक्ति तुमच्या मंडळीत आहे काय? अंशा परिस्थितीचा तुम्ही कसा सामना कराल?

## पाठ २२ : पतन पावलेल्या व्यक्तिशी कसे वागावे?

एखादी व्यक्ति विश्वासात पूर्वी अगदी दृढ़ होती, पण आता मात्र तिचे पतन झाले आहे, असे आपणांस अनेक वेळा आढळते. १ करिंथ १०:१२ आणि नीतिवचन १६:१८ या वचनांतील इशारा लक्षात घ्या. कोणाचेही पतन अचानक होत नाही. अनेक छोटी पातके जीवनात प्रवेश करून ते दूषित करतात.

१. पतन पावण्याची खरी कारणे:

   १. प्रार्थना न करणे
   २ पवित्र शास्त्र न वाचणे — २ तीमथ्य २:१५.
   ३. चर्चला—सहभागितेला—न जाणे — इब्री १०:२५.
   ४. पवित्र आत्म्याचे आज्ञापालन न करणे — इफिस ४:३०
   ५. ख्रिस्ताला पापकबुली न देणे — मत्तय १०:३३
   ६. प्रकाशात न चालणे — १ योहान १:७.

२. पतन पावण्याचे परिणाम:

   १. सामर्थ्य, शांती, आनंद व समाधान नाहीसे होते.
   २. रोजचा जीवनमार्ग अंधकार व कुरकूरीने ग्रस्त होतो.
   ३. प्रतिफळाला मुकणे, व्यक्तिचा तोटा होईल.
   ४. यामुळे आत्म्याचा नाश होईल, असेही काहीजण शिकववात.

३. मागे फिरण्याविषयी देवाचे आवाहन — यिर्मया ३:२२; होशेय १४:४.

खरी ख्रिस्ती व्यक्ति पतनाचा द्वेष करते — स्तोत्र १०१:३: “मी माझ्या डोळयांसमोर अनुचित गोष्टी ठेवणार नाही.” ज्याच्याकडे पाहत राहावी अशी योग्य व्यक्ति — इब्री १२:२. ख्रिस्त हे पौलाचे ध्येय होते — फिलिप्पै ३:१४.

अभ्यास : तुमच्या गावात कोणी पतन पावलेल्या ख्रिस्ती व्यक्ति आहेत का, याविषयी विचार करा. त्यांना तुम्ही ख्रिस्ताकडे परत कसे आणाल, याविषयी योजना आखा. तुमच्या मंडळीसोबत त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

## पाठ २३ : घटस्फोट

तुमच्या मंडळीमधिल एखादे घर घटस्फोच्या उंबरठ्यावर असेल तर काय? संपूर्ण जगात, कौटुंबिक जीवनात घटस्फोट ही मोठी समस्या आहे. ही शोकांतिका आहे कारण यामुळे समाजाचा पाया म्हणजे घर बरबाद होते, आणि मंडळीसाठी तर हे अधिकच दु:खद आहे. कारण ख्रिस्ती कुटुंबव्यवस्था ही देवाने लावून दिली आहे. ख्रिस्ताचे मंडळीशी एकरूप होण्याचे ते प्रतीक आहे, आणि म्हणूनच सैतान विवाह—व्यवस्थेवर हल्ला करतो.

घटस्फोटांमुळे केवळ दु:खच पदरी पडते : दुभंगलेली घरे, दुभंगलेली व दुखावलेली अंत:करणे, बेघर मुले, अपराधी तरूण, एकटेपणा आणि अश्रू.

घटस्फोटासाठी पवित्र शास्त्रानुसार एकच कारण आहे, ते म्हणजे व्यभिचार (मत्तय. १९:९). व्यभिचाराचा अर्थ विवाहबाह्य लैंगिक संबंध असणे. पण घटस्फोट घेण्याची आज्ञा पवित्र शास्त्राने दिलेली नाही, तर आत्यंतिक टोकाची परिस्थिती उद्‌भवल्यासच घटस्फोटाची परवानगी दिलेली आहे.

समस्येचा सामना करत असलेल्या दांपत्यामध्ये समझौता करण्यासाठी तुम्हाला शक्य असतील ते सर्व प्रयत्न करा. पुढे काही सूचना दिलेल्या आहेत:

१. विवाह हा जीवनभरासाठी “मृत्यूने वियोग होईपर्यंत” आहे हे स्पष्टपणे सांगा (मत्तय १९:६). विवाहाद्वारे दोन व्यक्तिंना एकदेह करण्याचा चमत्कार देव करतो. त्यापैकी एखाद्या व्यक्तिचा मृत्युद्वारे वियोग करण्याचा अधिकार केवळ देवालाच आहे.

२. जर मुले असतील तर त्यांच्या कल्याणाचा विचार जास्त केला पाहिले, कारण त्यांनाच जास्त त्रास होतो.

३. घटस्फोट म्हणजे तुमच्या अपयशाची सार्वजनिक कबूली आहे हे त्यांना समजावून सांगा.

४. त्यांनी अगोदर देवाशी व त्यानंतर एकमेकांशी संबंध सुधारावेत हे प्रत्येक साथीला समजावून द्या. पश्चात्ताप आणि कबुली यामुळे कोठलेही वैवाहिक संबध सुरळीत होतील.

जर समझौता झाला तर पती व पत्नीला “सुखात व दु:खात, मृत्युने वियोग होईपर्यंत” ही शपथ घ्यायला सांगा. एकमेकांचा अनुनय करण्यासाठी त्यांना उत्तेजन द्या. दोघांनाही अधिक प्रेमाची गरज असते. एकमेकांवर शुद्ध प्रेम करण्यासाठी देवाकडून साहाय्य घेण्यास त्यांना सांगा.

चर्चा : ख्रिस्ती कुटुंबातील अतिशय महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या? त्यावर दुष्परिणाम करणाऱ्या गोष्टी कोणत्या?

## पाठ २४ : व्यभिचार

व्यभिचाराच्या पापाविषयी देवाने जो इशारा दिला आहे, त्याविषयी आध्यात्मिक पुढाऱ्याने मंडळीच्या लोकांना सांगितले पाहिजे. सातवी आज्ञा कधीही रद्द करण्यात आलेली नाही, निर्गम २०:१४ आणि १७.

देवाला व्यभिचाराचा किती वीट आहे, हे समजून घेतल्यानंतरच, आपण विवाहाचे पावित्र्य समजू शकतो. व्यभिचाराचे पातक करणाऱ्या दोन्ही व्यक्तिंना मरणदंड देण्याची

आज्ञा देवाने लेवीय २०:१० मध्ये दिली होती, हे तुमच्या लक्षात आहे का? लैंगिक पापापासून आध्यात्मिक पुढाऱ्याने दूर राहावे.

व्यभिचार, जारकर्म सरळ नरकामध्ये नेते, यात काहीच संशय नाही — नीतिवचन ७:२७; १:१३–१७; १ करिंथ ६:९–१०.

चर्चा : तुमच्या विभागातील लोक लैंगिक पापाविषयी अधिक बेफिकीर झाले आहेत का? याचे कारण काय?

## पाठ २५ : जादूटोणा, चेटूकविद्या

आईवडील आपल्या बाळांचा बाप्तिस्मा अथवा समर्पण करण्यासाठी त्यांना मंडळीमध्ये समोर आणतात. काही कारणामुळे जर बाळाचा फ्रॉक अथवा शर्ट वर उचलला गेला, तर त्याच्या कंबरेभोवती एक दोरी गुंडाळलेली दिसते. असले दोरे बांधण्याची परवानगी आहे का? अजिबात नाही. असल्या प्रकारच्या गोष्टी या जादूटोण्याची साहित्ये आहेत. आणि चेटूक, मंत्रतंत्र इ. वापर करणे म्हणजे दुरात्म्यांशी संबंध ठेवणे असे पवित्र शास्त्र अतिशय स्पष्टपणे सांगते. पुढील वचने पाहा — निर्गम २२:१८, प्रेषित १९:१८, १९; गलती ५:२० आणि प्रकटी २२:१५.

जोपर्यंत शुभवर्तमानाचा प्रकाश पडला नव्हता, तोपर्यंत अनेक देश विषाचे प्याले व चेटक्यांच्या अंधारात चाचपडत होते. आजही सैतान लोकांना जुन्या गोष्टींकडे, अंधाराकडे नेण्याचा प्रयत्न करतो. पण ख्रिस्ताची अंधाराबरोबर काहीच सहभागिता नाही. जे जादूटोणा, चेटूक करतात, त्यांची जागा अग्नी व गंधकाच्या सरोवरात आहे — प्रकटीकरण २१:८.

प्रत्येक व्यक्तिने आपण कोणाची सेवा करणार हे निवडले पाहिजे. पण कोणीही दोन मालकांची सेवा करू शकत नाही. ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारल्यावर सर्व गंडेदोरे, ताईत जाळून टाकले पाहिजेत.

चर्चा : तुमच्या भागत जादूटोण्याच्या, चेटकाच्या कोणत्या पद्धती प्रचलीत आहेत? त्या नाहीशा करण्यासाठी तुम्ही काय करू शकता?

## पाठ २६ : नशाबाजीविरुद्ध का उपदेश करावा?

दारूबाजी हा शाप आहे, हे प्रत्येकजण जाणतो. त्यामुळे घरे आणि जीवने बरबाद होतात. पण काही जणांना असे वाटते की, कमी प्रमाणात मद्यपान करण्याची परवानगी आहे. येशूने पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर केले, त्याचे उदाहरण ते यासाठी देतात, (योहान २:१–११) आणि पौलाने तीमथ्याला थोडे से मद्य (द्राक्षरस) घेण्यास सांगितले याचाही उल्लेख करतात (१ तीमथ्य ५:२३).

या दोन्ही ठिकाणी “विनोस” हा ग्रीक शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ द्राक्षारस असा होतो. मद्यासाठी “शेकर” हा शब्द वापरला आहे. लूक १:१५ मध्ये हे दोन्ही शब्द वापरले आहेत. “तो प्रभूच्या दृष्टीने महान होईल. तो द्राक्षरस व मद्य कधीच प्राशन करणार नाहीं. ”

नीति. २०:१; २३:२९—३५; यशया २८:७; होशेय ४:११; १ करिंथ ६:१० आणि गलती ५:२१ ही वचने देवाचा मद्यपानाविषयीचा दृष्टीकोण स्पष्ट करतात. पवित्र शास्त्रामध्ये दारूचा पहिला उल्लेख उत्पत्ती ९:२१ मध्ये केला आहे. नोहा दारू पिऊन मस्त झाला व त्यायोगे हामावर आलेल्या शापाविषयी या वचनात सांगितले आहे.

ख्रिस्ती व्यक्तिने दारू का पिऊ नये, याची कारणे:

१. त्याचे शरीर हे पवित्र आत्म्याचे मंदीर असून, ते भ्रष्ट केले जाऊ नये.
२. तो ख्रिस्ताचा साक्षी आहे. त्याने जर एक थेंब घेतला, तर विश्वासात डळमळीत किंवा कमी मजबूत असलेल्या बंधूला त्यामुळे अधिक मद्य घेण्यास प्रेरणा मिळेल.
३. तो आपल्या भावाचा रक्षक आहे, उत्पत्ती ४:९. आणि त्याच्या भावाने शुद्ध, धार्मिक जीवन जगावे ही त्याची जबाबदारी आहे.

प्रत्येक व्यक्तिने, मग ती ख्रिस्ती असो किंवा नसो, दारू पिणे का थांबवावे याची अनेक कारणे आहेत.

१. तो पैशांचा अपव्यय आहे — अनुवाद २१:१८—२१; नीतिवचन २३:२०.
२. हमरस्त्यावरील इतर लोकांच्या सुरक्षिततेसाठी.
३. दारूबाजीमुळे घरे बरबाद होतात.

विल्यम ग्लॅडस्टोनने म्हटले : “दारूबाजी ही युद्ध, मरी व दुष्काळ यांपेक्षा ही भयानक आहे.”

एक घोट घेतला, तर दुसऱ्या घोटाची ओढ लागते, एका ग्लास घेतला तर दुसरा ग्लास घ्यावासा वाटतो. म्हणून मद्यपान अजिबात न करणे, हा पवित्र शास्त्रात सांगितलेला मार्ग अतिशय योग्य आहे.''

एक घोट घेतला, तर दुसऱ्या घोटाची ओढ लागते, एका ग्लास घेतला तर दुसरा ग्लास घ्यावासा वाटतो. म्हणून मद्यपान अजिबात न करणे, हा पवित्र शास्त्रात सांगितलेला मार्ग अतिशय योग्य आहे.

## पाठ २७ : दु:खसहन करणाऱ्या ख्रिस्ती व्यक्तिंना मदत करणे

“का? ही दु:खे माझ्यावरच का यावीत?” अशी ओरड अनेक चांगले ख्रिस्ती लोक देवाकडे करतात. कधी मित्र, ईयोबाच्या मित्रांप्रमाणे, त्यांचा निर्दयतेने न्याय करून म्हणतात, “या बंधूंच्या जीवनातील पापांमुळे हे संकट, दु:ख त्यांच्यावर आले आहे.” खूप निराशेच्या,

भयंकर संकटांचा सामना करणाऱ्या लोकांवर कोणीतरी करणी केली आहे, असे मांत्रिक लोक सांगतील. पण खऱ्या ख्रिस्ती व्यक्तिच्या जीवनात येणारी संकटे ही देवाच्या योजनेनुसार येतात, कारण प्रत्येकाच्या जीवनासाठी देवाची योजना असते — रोम ८:२८.

१. संकटे का येतात?

   १. कधी पापाचा परिणाम म्हणून — योहान ५:१४;
   गणना १२:१० मध्ये मिर्याम; २ इतिहास १६:१२ मध्ये राजा आसा.

   २. देवाची कार्ये प्रकट व्हावीत म्हणून — योहान ९:२,३.

   ३. देवाचे गौरव व्हावे म्हणून — योहान ११:४; फिलिप्पै १:२९.

   ४. सैतानाचे — शत्रूचे कार्य — देवाच्या परवानगीने — ईयोबाच्या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे ईयोब; मार्क ५:१—५; लूक १३:१६; प्रेषित १०:३८. तुमची ओझे उचलण्याची मर्यादा, सहन करण्याची शक्ति देव जाणतो.

   ५. शुद्धीकरण — जशे मुलाचे करावे तशे प्रशिक्षण देण्यासाठी— इब्री १२:५—१३.

२. दु:खांच्या बाबतीत आपली प्रतिक्रिया

   १. कदाचित् आपण त्यांचा स्वीकार करण्याऐवजी त्यांचा द्वेष करू. यामुळे अंत:करणे कठीण होतील.

   २. कदाचित् आपण त्यांच्याखाली दबून जाऊ. पण आपल्याला तसे करण्याची गरज नाही, कारण देवाची कृपा पुरेशी आहे — २ करिंथ १२:९.

   ३. कदाचित् आपण ते स्वीकार करू व सहन करू, पण दु:खाने.

   ४. कदाचित् आपण आनंदाने देवाच्या इच्छेला समर्पित होऊ. विजयाचा हा सर्वोच्च प्रकार आहे.

अभ्यास : तुमच्या मंडळीतील दु:खसहन करणाऱ्या तीन ते सात व्यक्तिंची नावे लिहा. त्या प्रत्येकाला सांत्वन देण्याची योजना करा. तुमच्या या सेवेत इतरांनाही सहभागी करा.

## पाठ २८ : आजाऱ्यांची सेवा

ख्रिस्ती लोक आजारी पडतात आणि देवाच्या सेवकाने त्यांची सेवा विश्वासूपणे करावी. देव त्यांच्यावर प्रीती करतो आणि त्यांची काळजी घेतो, हे त्यांना समजावून सांगावे. आजारी व्यक्तिंच्या समस्यांविषयी आपण विचार करू या.

१. देव आरोग्यदान देऊ शकतो का?

चमत्काराविषयीच्या अनेक खऱ्या घटना पवित्र शास्त्रात वर्णिल्या आहेत. सर्वांत मोठा चमत्कार म्हणजे येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान. या व्यतिरिक्त इतरही अनेक चमत्कार केले गेले. आपला देव हा चमत्कार करणारा देव आहे. यहोवा राफा (निर्गम १५:२६) हे त्याचे एक

नाव आहे. "तुला आरोग्य देणारा मी देव आहे." स्तोत्र १०३:३; मत्तय १९:२६; लूक १८:२७ ही वचने पाहा. आजही तो सर्वश्रेष्ठ वैद्य आहे.

२. आजाऱ्यांना तेलाभ्यंग करणे — याकोब ५:१४—२०

१. आजाऱ्यांनी मंडळीच्या वडिलांना बोलवावे.

२. मंडळीच्या वडिलांनी विश्वासाने प्रार्थना करून आजाऱ्यांना तेलाभ्यंग करावा.

३. आपले दोष एकमेकांजवळ कबूल करण्याविषयी याकोब सांगतो.

३. काही आजार बरे होत नाहीत

१. प्रेषित २८ मध्ये पौलाने दोन चमत्कार केले. पण त्याला स्वत:ला आरोग्य मिळावे म्हणून त्याने तीन वेळा प्रार्थना केली. ती मात्र ऐकली गेली नाही — २ करिंथ १२:७—१०. पौलाला नम्र ठेवणे हा या आजाराचा हेतू होता.

२. जर आपल्याला नेहमीच आरोग्य मिळाले, तर आपण कधीही मरणार नाहीं.

ख्रिस्ती सेवकाने आजारी माणसाल देवाच्या वचनातून धीर द्यावा. जर आजारी व्यक्ति पुन्हा गंडेदोऱ्यांकडे, मंत्रतंत्राकडे वळली, तर ही किती दु:खाची गोष्ट होईल. शारीरिक आजारासोबतच त्याला आत्म्याचाही रोग होईल.

देवाच्या इच्छेला समर्पित, आनंदी अशा संताची मरणशय्या म्हणजे आशीर्वादित वियोग होय. येशूने अभिवचन दिले, "माझी कृपा तुला पुरेशी आहे" — अगदी आजारातदेखील.

चर्चा : आजाऱ्यांना प्रोत्साहन व उत्तेजन देणारी पवित्र शास्त्रातील कोणती वचने आहेत?

## पाठ २९ : मृत्युप्रसंगी करावयाची सेवा

आयुष्य हे क्षणभंगुर आहे. ते आज आहे आणि उद्या नाही. आजपर्यंत जन्मास आलेल्या लोकांपैकी फक्त एलीयाला मृत्यु आला नहीं. आज जिवंत असणारे प्रत्येकजण मरतील. विश्वासणारे येशूला भेटण्यासाठी अंतराळात उचलले जातील, तेव्हा देवाची जी मुले वर घेतली जातील, फक्त तीच मरणार नाहीत. इब्री ९:२७ हे वचन सत्य आहे.

मंडळीतील कोणी मृत्युमुखी पडले, तर ख्रिस्ती सेवकावर फार मोठी जबाबदारी पडते. शोकग्रस्त कुटुंब आणि मित्र अतिशय दु:खी असतात, कारण वियोग हा नेहमीच दु:खद असतो. विश्वासणाऱ्यांनी शोक करणाऱ्यांबरोबर वेळ व्यतित करावा. त्यांना जेवण नेऊन द्यावे व मृत शरीर दफन करण्याच्या कार्यात मदत करावी. दु:खित लोकांविषयी ख्रिस्ताला कळवला वाटतो, हे शोक करणाऱ्यांना समजावे म्हणून त्यांच्याबरोबर शोक करा.

जर मृत व्यक्ति विश्वासणारी असेल, तर दु:खितांचे सांत्वन करणे सोपे आहे, कारण त्या प्रिय व्यक्तिच्या आत्म्याला आनंद व शांती अगोदरच मिळालेली असते. ख्रिस्ताबरोबर असणे हे जगातील इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक सुखकर असते, हे नि:संशय खरे

आहे. वियोगाचे दु:ख असले, तरी प्रेतक्रिया ही उत्सवाची गोष्ट असावी.

मृत्यूप्रसंगी नवविश्वासणाऱ्यांनी आपल्या जुन्या, विधर्मी व पवित्र शास्त्राला धरून नसणाऱ्या प्रथा पाळू नये, म्हणून ख्रिस्ती पुढाऱ्याने ठाम निर्णय व उपाययोजना केली पाहिले. आत्म्यांना आवाहन करणे, मृतांबरोबर त्यांच्या वस्तू, संपत्ती पुरणे, दारू पिणे इ. गोष्टींना पवित्र शास्त्रात स्थान नाही, पण मृताचे विधर्मी, तारण न पावलेले नातेवाईक, मित्र असल्या निराशेच्या व भीतीप्रद गोष्टी प्रेतक्रियेसोबत जोडण्याचा प्रयत्न करतात. त्याचा ठामपणे विरोध करावा. मृत व्यक्तिला मूठमाती देईपर्यंत विश्वासणाऱ्यांनी तेथेच थांबावे, गाणी गावीत, प्रार्थना करावी आणि आवश्यक ती सर्व मदत करावी, यासाठी त्यांना प्रवृत्त करा.

जीवन हे क्षणभंगूर आहे आणि सार्वकालिक जीवनाची तयारी करण्यासाठी मात्र ह्या जीवनातच वेळ आहे, हे उपदेशाद्वारे स्पष्ट करा.

मृत्यूच्या आदल्या दिवशी मृत्यूची तयारी करा, असे एक सुज्ञ माणसाने आपल्या शिष्यांना सांगितले, पण “आम्ही कदाचित उद्या मरू” असे म्हणून त्यांनी अडचण उपस्थिति केली. “मग तुम्ही आजच तयारी करा” असे त्याने उत्तर दिले.

चर्चा : तुमच्या मंडळीमधील एखादी व्यक्ति मरण पावते, तेव्हा संबंधितांना मदत करण्याचे इतर कोणकोणते मार्ग आहेत?

## पाठ ३० : मागणी झालेल्या दांपत्यांना मार्गदर्शन करणे

मागणी म्हणजे संबंधित दांपत्य लवकरच — सर्वसाधारणत: एक वर्षाच्या आत — लग्न करणार आहे, हे समाजाला सांगणे. मागणी झालेले दांपत्य या वेळात एकमेकांना चांगल्या रीतीने ओळखण्याचा, समजून घेण्याचा प्रत्यन करते. पण त्यांचा विवाह अद्याप न झाल्यामुळे विवाहोत्तर गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी घेऊ नये. विवाहप्रसंगी त्या दोघांचे कौमार्य अबाधित असणे आवश्यक आहे. प्रेमाचे रूपांतर द्वेषात होऊन एकमेकांविषयीचा आदर नाहीसा होऊ नये म्हणून विवाहामुळे मिळणारे लाभ व हक्क यांचा उपभोग विवाह होईपर्यंत घेऊ नये (२ शमुवेल १३:३५).

ख्रिस्ती सेवकाने इफिस ५ व तीत २ या अध्यायांतून संबंधित दांपत्याला ख्रिस्ती कुटुंबाविषयी मार्गदर्शन करण्याची हीच योग्य वेळ आहे. प्रत्येक समस्येसाठी व गैरसमजुतीसाठी एकत्रितरित्या प्रार्थना करण्यास त्यांना शिकू द्या. ते आयुष्यभर एकमेकांवर प्रेम करतात, हे शब्दांनी व कृतींनी एकमेकांना सांगण्यासाठी त्यांना शिकू द्या.

विवाह ही सर्वांत जुनी मानवी संस्था आहे. तारणाचा निर्णय घेणे हा व्यक्तिच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय आहे, त्यानंतर आपला जीवनसाथी निवडण्याचा

निर्णय महत्त्वपूर्ण आहे. या काळात ख्रिस्ती पुढाऱ्याने त्यांना ठाम मार्गदर्शन व पाठिंबा द्यावा.

सुखी विवाहाची तत्त्वे :

१. ख्रिस्ती व्यक्तिने फक्त ख्रिस्ती व्यक्तिशीच लग्न करावे — २ करिंथ ६:१४–१७.
२. भरपूर प्रार्थना करा आणि देवाची इच्छा समजून घ्या.
३. एकमेकांची पूर्ण ओळख होईपर्यंत, त्यांच्या चांगल्या व वाईट सवयी, गोष्टी समजून येईपर्यंत लग्न करू नका. घाईघाईने केलेले विवाह अपयशी ठरतात.
४. एकमेकांविषयी प्रेम वाटेएर्यंत थांबा. फक्त आकर्षण पुरेसे नाही. विवाह हा संपूर्ण आयुष्यासाठी असतो, फक्त देवाकडून मिळणाऱ्या प्रेमामुळेच कुटुंब सुखी होते.
५. विवाहास योग्य वय होईपर्यंत थांबा. विवाह हा मुलांसाठी नव्हे, तर प्रौढांसाठी आहे; कारण त्यामध्ये कठीण जबाबदाऱ्यांचा समावेश आहे.
६. नैतिक समस्या सुटेपर्यंत थांबा. एखाद्या व्यक्तिला सुधारण्यासाठी त्या व्यक्तिशी विवाह करू नका.
७. मुलीच्या पालकांची संमती मिळेपर्यंत थांबा. हे खूपच महत्त्वाचे आहे.
८. आर्थिक स्थैर्य येईपर्यंत थांबा. पुष्कळ संपत्ती नव्हे, पण संसार चालवण्यास पुरेशी सुरक्षितता असावी.
९. सर्व लोकांसमोर ख्रिस्ती पद्धतीने विवाह करावा, याचा हट्ट धरा. पळून जाऊन, किंवा गुप्तपणे लग्न करण्याचा विचारही करू नका. विवाह हा अतिशय पवित्र आहे, म्हणून असल्या गोष्टी करू नका.

अभ्यास : सुखी वैवाहिक जीवन कसे जगावे हे तरुण लोकांना समजावून सांगण्यासाठी योग्य असा पाठ तयार करा.

## पाठ ३१ : अपत्यहीन दांपत्याला मार्गदर्शन कसे करावे?

विवाहित दांपत्य मुलांची अपेक्षा करते, पण जेव्हां अनेक वर्षानंतरही त्यांना मूल होत नाही, तेव्हा त्यांच्या जीवनात निराशा येते व त्यांचे विजयी ख्रिस्ती जीवन नष्ट होऊ लागते. त्यांचे मित्र चर्चमध्ये आपल्या मुलांना घेऊन येतांना ते पाहतात, तेव्हा त्यांना प्रश्न पडतो, "देवाने आमची प्रार्थना का ऐकली नाही?" काही लोकांची मने कडवट होतात व ते चर्चमध्ये येणे सोडून देतात. काहीजण मंत्रतंत्राच्या मागे लागतात सहभागिता व संबंधही गमावून बसतात. अपत्यहीन दांपत्याला तुमच्या प्रार्थनांची, तुमच्या मार्गदर्शनाची व पाठिंब्याची आवश्यकता आहे. राहेलीप्रमाणे ते वारंवार म्हणत असतात, "मला मुले दे, अन्यथा मी मरेन" (उत्पत्ती ३०:१).

अपत्यहीन हन्नाचे जीवन व तिच्या नवऱ्याची आश्वासक, प्रेमळ वागणूक ही

अपत्यहीन दांपत्यासाठी आशीर्वादपर व मार्गदर्शक होईल. हन्नाला अपत्य नव्हते, पण एलकानाची तिच्यावरील सुंदर प्रीती १ शमुवेल १:५ मध्ये दाखवली आहे. “देवाने हन्नेची कूस बंद केली होती, तरी तो तिच्यावर प्रीती करती असे.” वांझ पत्नीला आपल्या माहेरी घालवून देण्याचा कसलाही अधिकार तिच्या पतीला नाही. त्याने एलकानाप्रमाणे वागावे.

तुमच्या मंडळीमधील हन्नाला खालील सत्ये सांगा:

१. हन्ना प्रार्थना करीत राहिली, त्याप्रमाणे त्यांनी प्रार्थना करावी. देवाने तिची कूस काही उद्देशाने बंद केली आहे आणि त्याच्या योग्य वेळी तो तिची कूस वाहती करील. अब्राहाम व सारा अतिशय वृद्ध झाले होते तेव्हा देवाने त्यांना अपत्य दिले (उत्पत्ती २१:२). स्तोत्र ११३:९ हे देखील चांगले वचन आहे!
२. प्रभूमध्ये आनंदी रहा. राहेलीप्रमाणे आपल्या नवऱ्याचे डोके खाऊ नका. मिळणाऱ्या आशीर्वादाबद्दल उपकारिक व्हा व तुमच्या चेहऱ्यावरून तुमचा आनंद दिसू द्या. निराश व दु:खी चेहऱ्यामुळे तुमच्या नवऱ्याची प्रीती थंडावेल व तुम्ही अतिशय दु:खी व्यक्ति व्हाल.
३. देवाने तुम्हांला अपत्य दिले नाही, तरीदेखील तुम्हाला मातेचे हृदय आहे आणि तुम्ही इतर मुलांवर प्रीती करा. ज्यांना प्रीतीची, पालनपोषणाची गरज आहे, अशी अनाथ व दुर्लक्षित मुले आहेत. पवित्र शास्त्राचे अभ्यासवर्ग चालवणे किंवा शब्बाथशाळेत शिकवण्याद्वारे तुम्हांला आध्यात्मिक संतती मिळू शकेल.

दबोरा ही “इस्राएलात माता” म्हणून प्रसिद्ध झाली (शास्ते ५:७).

चर्चा : तुमच्या मंडळीतील अपत्यहीन महिला कोणत्या सेवाकार्यात भाग घेऊ शकतील? त्यांना तुम्ही कसे उत्तेजन देऊ शकाल?

## पाठ ३२ : विधवांमधील सेवा

तुमच्या मंडळीमध्ये कदाचित् अशा वयोवृद्ध स्त्रिया, विधवा असतील ज्या देवावर प्रीती करतात व मंडळीमधील सेवाकार्यामध्ये विश्वासूपणे सहभागी होतात. कदाचित् त्यांना एकटे एकटे व आपण कोणालाही हवेसे नाहीं, असे वाटेल. त्यांनी देखील आपल्या देणग्या व दाने देवाच्या सेवेत वापरावीत, १ पेत्र ४:१०. पुढील वचनांद्वारे विधवांविषयी बोला:

१. नामी आपल्या नातवाची दाई झाली (रूथ ४:१६). आणि आपला विश्वास अनेक पिढ्यांमध्ये उतरवणे तिला शक्य झाले. मंडळीतील लहान मुलांचे संगोपन करण्याच्या बाबतीत वृद्ध स्त्रिया मदत करू शकतील, आणि त्या बदल्यात त्यांना प्रेम मिळू शकेल.
२. सारफथ येथील विधवेने देवाच्या माणसाचा पाहुणचार केला (१ राजे १७). वृद्ध स्त्रिया पाहुणचाराची बहुमूल्य सेवा करू शकतात.

३. लूक २:३६—३८ मधील हन्ना ८४ वर्षांची विधवा होती, ती “उपास व प्रार्थना करून रात्रंदिवस सेवा करीत असे. . . . ती त्याच्याविषयी सर्वांना सांगू लागली. ” वृद्ध स्त्रियां खूप चांगल्या प्रार्थना—योद्धा बनू शकतात.
४. एका विधवेने आपली सर्व मिळकत देवाला दिली (लूक २१:४).
५. ज्या दुर्कसने अनेक लोकांचे सांत्वन केले व त्यांच्यासाठी कपडे विणले, ती बहुध ा विधवा असावी, कारण तिच्यासाठी शोक करणाऱ्या सर्व विधवा होत्या (प्रेषित. ९:३९). गरजवंताना ती मदत करत होती.
६. आपला नातू तीमथ्य याला सेवेसाठी तयार करण्यामध्ये लुईसचा वाटा होता (२ तीमथ्य. १.५).

जीवनातील हा कालखंड अतिशय फलदायी होऊ शकतो. सार्वकालिक जीवनासाठी देवाच्या बोलावण्याची नुसती वाट पाहत राहण्यापेक्षा हे बरे आहे.

चर्चा : विधवांच्या सेवाकार्याविषयी ज्या कल्पना या शास्त्रभागांद्वारे सूचित केल्या आहेत, त्यांच्यावर विचार करा. त्या सेवाकार्यांमध्ये तुम्ही भर घालू शकता का?

## पाठ ३३ : विश्वासणाऱ्यांचे न तारलेले जोडीदार

विवाहित दांपत्यामधील एकच जोडीदार विश्वासणारा असेल, तर त्याला विशेष काळजी व उत्तेजनाची गरज असते. त्यांना तुम्ही जो सल्ला व मार्गदर्शन द्याल त्यामध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश असावा:

१. तुमच्या आध्यात्मिक अनुभवामुळे तुमच्यात व तुमच्या जोडीदारामध्ये वादविवाद होऊ नये.
२. आपण नालायक, हलके आहोत, असे आपल्या जोडीदाराला वाटू देऊ नका.
३. तुमच्या जोडीदारावर अधिक प्रेमाची उधळण करा. तुमच्या अंत:करणात देवाची प्रीती असल्यामुळे आपल्या जोडीदारावर मुक्तपणे प्रेम करा.
४. तुमच्या समस्या तिऱ्हाइतांना सांगू नका.
५. तुमच्या कुटुंबामध्ये देवाचे वास्तव्य असणारे प्रसन्न वातावरण असू द्या.
६. आनंदी व्यक्ति व्हा. प्रेमाच्या व मधुरतेच्या आत्म्याने तुम्ही भरून जा.

चर्चा : मंडळीतील पुढारी अशा न तारलेल्या जोडीदारांशी मैत्रीपूर्ण संबंध कसे प्रस्तापित करू शकतो? या व्यक्तिंना मंडळीकडे व मंडळीच्या लोकांकडे व पर्यायाने ख्रिस्ताकडे आकर्षित करण्यासाठी तुम्ही कोणते कार्यक्रम राबवू शकता?

## पाठ ३४ प्रभूच्या दिवसाचे पालन करणे

नव्या करारामधील प्रभूच्या दिवसाचे म्हणजे रविवारचे मूळ हे जुन्या करारातील शब्बाथामध्ये आहे.

१. शब्बाथ आणि प्रभूचा दिवस यांमधील विरोधाभास:

  १. शब्बाथ हा आठवड्याचा सातवा दिवस आहे आणि प्रभूचा दिवस हा आठवड्याचा पहिला दिवस आहे.

  २. देवाने निर्मितीकार्य संपवल्यानंतर विश्रांती घेतली. याचे स्मरण शब्बाथच्या दिवशी केले जाते, तर ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे स्मरण प्रभूच्या दिवशी केले जाते.

  ३. शब्बाथ हा यहूदी लोकांसाठी होता, तर प्रभुचा दिवस हा येशू ख्रिस्ताच्या मंडळीसाठी आहे.

२. प्रेषितीय मंडळीने आठवड्याचा पहिला दिवस नियुक्त केला.

  १. मत्तय २८:१ — यहूदी लोकांचा शब्बाथ पुरा होईपर्यंत येशू ख्रिस्त कबरेमध ये राहिला व आठवड्याच्या पहिल्या दिवशी — रविवारी — मरणातून पुन्हा उठला.

  २. प्रेषित २०:७ — मंडळीच्या नियमित प्रार्थनासभांविषयी येथे सांगितले आहे.

  ३. १ करिंथ १६:२ — रविवारच्या दानार्पणाविषयी सूचना आहे.

  ४. प्रकटी १:१० — योहान “प्रभुच्या दिवाशी” विषयी सांगतो.

३. प्रभूच्या दिवसाचे पालन करण्याची खरी पद्धत:

  १. प्रभुमध्ये आनंद करणे. भक्ती, प्रार्थना आणि स्तुतीसाठी हा विशेष असा दिवस ठेवा.

  २. स्वत:ची मौजमजा करणे टाळावे. हा दिवस त्याच्या आनंदासाठी आहे. आजाऱ्यांना भेटी द्या व प्रभूसाठी दयेची कार्ये करा.

  ३. देवाला सन्मान देणारा असा हा दिवस असावा. आठवड्याचे सहा दिवस आपण कष्ट, श्रम करतो व धन मिळवतो, पण सातवा दिवस हा प्रभूसाठी आहे.

चर्चा : कोणत्या सर्वसाधारण गोष्टी प्रभूच्या दिवशी करणे अनुचित आहे?

## पाठ ३५ : पितृदिन

देवाने पतीला घराचा प्रमुख असे केले आहे, उत्पत्ती १८:१९; इफिस ५:२३. कुटूंबाचे याजक या नात्याने आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी ख्रिस्ती पित्यांना प्रोत्साहन देण्याची गरज असते. मंडळीमध्ये पित्यांच्या सन्मानासाठी एखाद्या सभेचे आयोजन का करू नये?

या सभेची अगोदरच चांगली जाहिरात करा आणि सर्व मुले, अगदी प्रौढ़ मुलेसुद्धा आपल्या पित्याजवळ बसतील हे जाहीर करा. एका पित्याने शास्त्रभाग वाचावा, दुसऱ्याने प्रार्थना करावी. मंडळीमध्ये सर्वात वृद्धपिता व सर्वात तरूण पिता, तसेच सर्वात जास्त मुले ज्यांना आहेत त्यांचा मान तुम्हीं करू शकता.

ख्रिस्ताचा सन्मान करणाऱ्या पित्यासाठी पवित्र शास्त्रात काय मानदंड सांगितले आहेत, या विषयावर संदेश केंद्रीत असावा. आरोग्यात, आजारात, गरीबीत आणि श्रीमंतीत त्याने आपल्या पत्नीवर प्रीती करावी, इफिस ५:२५. त्याने तिच्याशी विश्वासू असावे व दु:खाच्या प्रसंगी तिचे सांत्वन करावे, १ शुमवेल १:८.

मुलांना प्रभूच्या शिक्षणात आणि भयात वाढविण्यामध्ये पित्याने सक्रीय सहभाग घ्यावा, नीतिवचन २२:६. कौटुंबिक वेदी स्थापन करण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. जेवणाची प्रार्थना करण्याची जबाबदारीही त्याचीच आहे. मुलांचे लवकर तारण व्हावे म्हणून माता—पिता या दोघांनींही प्रार्थना व प्रयत्न करावे, मत्तय १९:१३, १४.

त्याने आपल्या पत्नीवर, मुलांवर प्रीती करावी. त्यापेक्षा अधिक प्रीती ख्रिस्तावर करावी. ख्रिस्ती पिता आपल्या जीवनांत नेहमीच ख्रिस्ताला प्रथम स्थान देईल, लूक १४:२६.

अभ्यास : पितृदिनाच्या दिवशी उपदेश करण्यास योग्य अशा विषयांची यादी तयार करा.

## पाठ ३६ : मायवार

उत्तम पत्नी व उत्तम माता या देवापासून मिळालेल्या देणग्या आहेत, नीतिवचन ३१:१० पत्नीला कौतुक आणि स्तुतीची आवश्यकता असते. त्यांची घरातील सेवा आणि साक्ष यांचा योग्य तो सम्मान करण्याची काळजी मंडळीने घ्यावी.

महिलांच्या सन्मानासाठी आयोजित केलेल्या सभेमध्ये मुलांनी मातेला उद्देशून गीत गावे, एखाद्या प्रौढ मुलाने मातेच्या गौरवावर भाषण द्यावे. प्रत्येक मुलाने एखादे फूल आणून मातेला द्यावे. पवित्र शास्त्रातील स्त्रिया या विषयावर संदेश असावा.

अभ्यास : तुमच्या मंडळीमध्ये मायवाराच्या उपासनेचा कार्यक्रम आखा. या उपासनेमध ये कोण—कोण काय भाग घेईल याची यादी करा.

## पाठ ३७ : कौटुंबिक वेदीची स्थापना करणे

ख्रिस्त हा घराचा प्रमुख आहे हे समजून घेऊन त्याची भक्ती करण्यासाठी व त्याच्याकडून शिकण्यासाठी कौटुंबिक वेदी असणे हे यशस्वी ख्रिस्ती कुटुंबाचे गुपित आहे.

कौटुंबिक भक्तीच्या प्रथेचे विवेचन करून तुम्ही मंडळीतील लोकांना ती सुरू करण्यासाठी आग्रह केला तर काही जनांना ते मान्य होईल पण त्यात काय करावे हे इतरांना समजणार नाही. एखाद्या रविवारच्या उपासनेमध्ये याचे प्रात्यक्षिक का दाखवू नये? कौटुंबिक वेदीचे उदाहरण म्हणून तयारी करण्यासाठी एखाद्या कुटुंबाची भेट घ्या. एखादे कोरस किंवा परिचित गीताचे एक कडवे गाऊन ते सुरूवात करतील. वाचन करण्याइतपत मोठी झालेली सर्व लेकरें आळीपाळीने शास्त्रापाठ वाचतील, आणि लहान मुले पाठ केलेले वचन म्हणतील. कदाचित् पिता शास्त्रवचनावर थोडक्यात बोध करील व प्रार्थना करून भक्ती संपवील. ते कुटुंब आपल्या जागेवर बसल्यावर, 'पालकांनी व मुलांनी कौटुंबिक भक्तीसाठी एकत्र जमण्याचे महत्त्व' यावर थोडक्यात संदेश द्यावा. प्रात्यक्षिक दाखवणाऱ्या कुटुंबाला त्यामुळे उत्तेजन मिळेल व कौटुंबिक भक्ती सुरू करण्यासाठी इतर कुटुंबांनाही चालना मिळेल.

कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिसाठी हे किती वेगळाच लाभ देणारे ठरेल!

अभ्यास: वर्गाने कौटुंबिक भक्तीचे प्रात्यक्षिक दाखवावे.

## पाठ ३८ : संपूर्ण कुटुंबाला ख्रिस्तराज्यात आणणे

संपूर्ण कुटुंबाला स्वर्गाच्या मार्गवर आणणे ही तुमची महत्त्वपूर्ण सेवा असेल. मातापित्यांना देवाची आज्ञा पाळण्यास शिकवून तुम्ही हे साध्य करू शकाल. नंतर हे पालक आपल्या मुलांना शिकवतील. पुढे काही प्रस्ताव दिले आहेत:

१. आपल्या मुलांना देवाच्या वचनात मुळावणे ही पालकींची जबाबदारी आहे या विषयावर सार्वजनिकरित्या उपदेश करा व खाजगीरित्या त्याविषयी एकांतात बोध करा, अनुवाद ६:६—९ आणि नीतिवचन ६:२०—२३ व स्तोत्र ११९:११ ही वचने यासाठी उत्कृष्ट आहेत.

२. आपल्या मुलांच्या ख्रिस्ती मित्रांचे घरात हार्दिक स्वागत करण्यासाठी पालकांना उत्तेजन द्या. त्यांनी उत्साही, प्रामाणिक, चर्चमध्ये भक्तीला जाणारे असावे व संपूर्ण अंत:करणाने विश्वास धरणारे असणे हे मुलांच्या भल्यासाठी किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना समजावून सांगा. मातापित्यांमध्ये असणारी देवाची प्रीती हा सुखी, मजबूत कुटुंबाचा महत्त्वाचा घटक आहे.

३. तुमची मंडळी ही कुटुंबाभिमुख असावी असे करा. विश्वासणाऱ्यांना इतर कुटुंबांच्या मुलांसाठी प्रार्थना करण्यास व त्यांना साहाय्य करण्यास उत्तेजन द्या. मडळीतील वृद्धांची, तरुणांची व मुलांची ओळख होईल, परिचय होईल असे कार्यक्रम मंडळीत ठेवा. देवाच्या लोकांमध्ये दोन 'पिढ्यांमधील अंतर' (जनरेशन गॅप) याची समस्या नसावी.

४. हुंडा पद्धती किती वाईट आहे याविषयी आईवडिलांनी आपल्या तरुण मुलांना शिकवावे ह्याचा बोध त्यांना द्या. भयंकर हुंडा पद्धतीमुळे अनेकांचे विवाह योग्य वेळी होऊ न शकल्यामुळे अनेक तरुण लोक पापात पडतात.

मुले ही देवाकडून मिळालेली सुंदर देणगी आहे. त्यांना तारणाऱ्याकडे आणल्यामुळे तुमच्या मंडळीतील पालकांना खूप आनंद मिळेल. हा आनंद सर्वकाळासाठी आहे.

चर्चा : वर उल्लेख केलेल्या सर्व मुद्द्यांचा विचार करा. तुमच्या मंडळीमध्ये ते उपयुक्त आहेत का? इतर काही पर्याय तुम्ही सुचवू शकता का?

## पाठ ३९ : सामान्य लोकांना सेवेसाठी प्रवृत्त करणे

तुमच्या मंडळीमध्ये तुम्हीच सर्वांत लायक असून नेतृत्वासाठी आवश्यक असणारे सर्व गुण तुमच्यामध्ये असतील, म्हणून मंडळीतील सर्व जबाबदाऱ्या तुम्हीच पार पाडाव्या, असा मोह तुम्हांला होईल. पण ही फार भयानक व दु:खद अशी चूक होईल. का?

सर्वप्रथम १ पेत्र ४:१० वाचा. या ठिकाणी अगदी सुस्पष्ट सूचना दिली आहे: "प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे, तसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभाऱ्याप्रमाणे ते एकमेकांच्या कारणी लावा." देवामध्ये वाढण्यासाठी लोकांनी आपल्या कृपादानांचा वापर करावा. त्याचा वापर करण्यास तुम्ही त्यांना शिकवावे व उत्तेजन द्यायला हवे. ज्या तळ्यात पाणी बाहेर जायला रस्ता नसतो, त्या तळ्यातील पाणी तसेच साचून राहते. तुमच्या मंडळीतील अदीक्षित लोकांमधून जीवंत पाण्याच्या नद्या वहाव्यात.

एक सुवार्तांटोळी बनवा. त्यामध्ये कुणी गानवृंदाचे संचलन करील, तर कुणी गायक होईल. दुसरा कोणीतरी गिटार वाजवील, तर अजून एखादा आपली साक्ष सांगेल. तुमच्या भक्तीच्या सभेमध्ये प्रत्येकाला काही–न–काही विशिष्ट भाग द्या. कोणाला प्रार्थनासभेचे, तर दुसऱ्याला पवित्र शास्त्राच्या अध्ययन वर्गाचे संचालन करण्यास सांगा. काहीजण शब्बाथ शाळेत शिकवू शकतील, तर कहीजण आठवड्याभरात मुलांसाठी बाइबल क्लबचे आयोजन करतील. कळसूत्री बाहुल्यांच्या मदतीने सुवार्तासेवेचे कार्यक्रम आखा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांना इतरांना ख्रिस्ताकडे आणण्यास शिकवा.

चर्चा : अदीक्षित लोकांना प्रभूच्या सेवेसाठी प्रवृत्त करण्यासाठी व त्याची त्यांच्यावरील प्रीती दाखवण्यासाठी कोणकोणते उपाय योजता येतील, यावर चर्चा करा.

# पाठ ४० : स्त्रियांच्या कृपादानांचा वापर करणे

तुमच्या मंडळीतील स्त्रियांना फक्त देवाच्या कामाला बघण्याची भूमिका घेऊ देऊ नका. त्यांनादेखील देवाने कृपादाने दिलेली आहेत, त्यामुळे मंडळीला आशीर्वाद मिळतील, देवाला गौरव मिळेल व त्यांची स्वत:ची आध्यात्मिक स्थिती मजबूत होईल.

तुमच्या मंडळीतील स्त्रियांचा अभ्यास करा. त्यांना देवाच्या सेवेसाठी प्रवृत्त व तयार करण्यासाठी तुम्ही शक्य ते सर्व प्रयत्न करा.

१. स्त्रियांमधील सेवा:
   १. सेविका — आजाऱ्यांना व दु:खात असणाऱ्यांना भेटणे.
   २. प्रार्थनासभेचे संचालन करणे अथवा यजमानपद स्वीकारणे.
   ३. पवित्र शास्त्राभ्यासवर्ग चालवणे.
   ४. मोठी बहीण या नात्याने तरुण स्त्रियांना शिष्यत्वाचे प्रशिक्षण देणे.
२. मुलांमधील कार्य:
   १. शब्बाथ शाळेत शिकवणे.
   २. घरोघरी शास्त्राभ्यासाचे क्लब चालवणे.
३. घरामधील सेवा
   १. आपल्या मुलांना प्रभूचे अनुसरण करण्यास शिकवणे.
   २. तारण पावलेल्या व न पावलेल्या व्यक्तिचे स्वागत करणे.
   ३. नवऱ्याला मदत करणे. जर त्याचे तारण झाले असेल, तर त्याला उत्तेजन देणे व जर त्याचे तारण झाले नसेल, तर त्याला ख्रिस्ताकडे आणण्यासाठी प्रयत्न करणे.

चर्चा : तुमच्या मंडळीतील स्त्रियांसाठी तुम्हीं इतर कोणत्या सेवा सुचवू शकता?

# ५

## पवित्र जीवन
### पवित्र सेवेसाठी तयारी

### —: प्रस्तावना :—

या पाठ्यक्रमामध्ये कदाचित् हे सर्वांत महत्त्वाचे पाठ आहेत, कारण "अंतःकरणात जे भरून गेले आहे, तेच मुखावाटें निघणार" (मत्तय १२:३४). फक्त पवित्र जीवनामुळेच आध्यात्मिक फळ मिळते आणि ख्रिस्ती विश्वासणाऱ्याने त्याचा आंतरिक विजय चोरणाऱ्या व त्याच्या साक्षीचा नाश करणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून सतत सावध राहिले पाहिले.

ह्या पाठयसाहित्यातील पुष्कळ भाग

— अल्बन डग्लस यांच्या "१०० बाइबल लेसन्स्,"

— रेव्ह, आर. स्टॅनली यांच्या "प्रीचर्स एण्ड पीपल्स" आणि

— डॉ. लिलियन स्टॅनली यांच्या "दी आइडियल वुमन" या पुस्तकांतून घेतलेला आहे.

### —: अनुक्रमणिका :—


१. देवाचे भय धरा
२. आत्म्याने भरलेले जीवन
३. सैतानाचा प्रतिकार करा
४. प्रभुची इच्छा जाणून घेणे
५. शांत समय
६. दूरीकरण (वेगळे होणे)
७. वैयक्तिक जीवन
८. आंतरिक हेतू
९. पुढाऱ्याची योग्यता
१०. व्यभिचार
११. घरामध्ये नेतृत्व
१२. केवळ सत्य
१३. आर्थिक बाबीं
१४. शिस्तबद्ध अभ्यास
१५. तुमचे शरीर सुदृढ़ राखा
१६. आळस
१७. स्तुती
१८. जेव्हा मोह येतात
१९. अनुकरण करणारे
२०. विजय नक्कीच मिळेल

# पवित्र जीवन

## पाठ १ : देवाचे भय धरा

योग्य भीती आणि अयोग्य भीती असे भीतीचे दोन प्रकार आहेत. “भिऊ नका”, असा पवित्र शास्त्रात बहुमूल्य संदेश आहे. पवित्र शास्त्रात त्याचा उल्लेख ५० वेळा आलेला आहे. आणि याच अर्थाचे दुसरे शब्दप्रयोग ३६६ वेळा केले आहेत. “मी आहे; भिऊ नका” हे प्रभूचे शब्द आठवतात का? पण देवाचे भय असे आहे की ते आपण सर्वांनी धरले पाहिजे. पुढील वचने पाहा: ईयोब २८:२८; स्तोत्र १९:९; २ शमुवेल २३:३; अनुवाद ६:१३.

१. आपण ज्यांचे भय धरू नये अशा काही गोष्टीं:
   १. मूर्ती आणि इतर देव — २ राजे १७:३८
   २. मनुष्य — १ शमुवेल १५:२४ मध्ये शौलाने केलेली चूक पाहा. तसेच नीतिवचन २९:२५ पाहा.
   ३. जगिक संकटे, कारण त्यामुळे आपल्या प्रभूचे येणे जवळ आले आहे हे समजते. लूक २१:२५—२८.
   ४. भावी शिक्षा — इब्री १०:२७.
   ५. आपण “भीतीचे” भय बाळगू नये, कारण विश्वासणाऱ्यांनी आपली सर्व भीती तारणाऱ्यावर टाकली आहे. — १ पेत्र ५:७.

   फक्त एकच प्रकारचे भय शिल्लक राहते, ते म्हणजे देवाचे पवित्र भय.

२. देवाचे भय काय आहे?
   १. ते पापाचा द्वेष करणे आहे — नीतिवचन ८:१३.
   २. ते ज्ञान आहे — स्तोत्र १११:१०
   ३. ते धन आहे — नीतिवचन १५:१६; यशया ३३:६.
   ४. ते जीवनाचा झरा आहे — नीतिवचन १४:२७.
   ५. ते शुद्ध आहे — स्तोत्र १९:९.
   ६. ते सर्वकाळ टिकते — स्तोत्र १९:९.
   ७. ते दैवी आहे — इब्री १२:२८.

३. देवाचे भय धरण्याचे काय परिणाम होतात?
   १. त्यामुळे देवाला संतोष मिळतो — स्तोत्र १४७:११
   २. त्यामुळे देवाची मान्यता मिळते — प्रेषित १०:३५.
   ३. त्यामुळे देव आपल्या मुलांचे सांत्वन करतो — स्तोत्र १०३:१३.
   ४. त्यामुळे आशीर्वाद मिळतात — स्तोत्र ११२:१.
   ५. त्यामुळे दुष्टाईपासून वेगळे होता येते — नीतिवचन १६:६.

६. त्यामुळे ख्रिस्ती सहभागिता मिळते — मलाखी ३:१६.

७. त्यामुळे प्रार्थनांची उत्तरे मिळतात — स्तोत्र १४५:१९

८. त्यामुळे दीर्घायुष्य मिळते — नीतिवचन १०:२७.

चर्चा : भयग्रस्त अंतःकरणाच्या अशक्तपणावर विजय मिळविण्यासाठी काय उपययोजना करावी, यावर वर्गाला चर्चा करू द्या. नंतर देवाचे भय बाळगण्याची सूज्ञता यावर चर्चा करा.

## पाठ २ : आत्म्याने भरलेले जीवन — इफिस ५:१८

प्रत्येक विश्वासणाऱ्याला पवित्र आत्मा मिळतो (रोम ८:१६), पण कदाचित् पवित्र आत्मा त्याच्या जीवनात वास्तव्य तर करतो पण त्याच्या जीवनाच्या अध्यक्ष पदावर नसतो. आपण जितके अधिक पवित्र आत्म्याच्या अधीन होतो, तितके अधिक तो आपणास स्वतःने भरतो (लूक ११:१३). पवित्र आत्मा हा जीवनाचा प्रमुख आहे हे विश्वासणारा जेव्हा मान्य करतो व आपल्या जीवनाचे संपूर्ण — एक एक गोष्टीचे — नियंत्रण पवित्र आत्म्याच्या हाती देतो, तेव्हा विश्वासणारा आत्म्याने भरतो.

आत्म्याने भरत राहा, असा जो शब्दप्रयोग मूळ ग्रीकमध्ये केलेला आहे त्याचा अर्थ ही सतत घडणारी क्रिया आहे. पवित्र आत्म्याने भरले जाणे ही क्रिया सतत, नेहमी व्हायला हवी. प्रेषित पेत्र, प्रेषितांचे कृत्य २:४ मध्ये आत्म्याने भरला होता, नंतर पुन्हा प्रेषित ४:३१ मध्ये तो आत्म्याने भरतो. प्रत्येक दिवशी आत्म्याने भरले पाहिजे.

१. पवित्र आत्म्याने भरले जाण्यासाठी काही अटी:

   १. पापांची क्षमा — प्रेषित २:३८.

   २. पुत्र बनणे — गलती ४:६.

   ३. भरले जाण्याची इच्छा — योहान ७:३७—३९ आणि यशया ४४:३.

   ४. विश्वास — योहान ७:३९.

   ५. आज्ञा पाळणे — प्रेषित ५:३२.

   ६. प्रतीक्षा — लूक २४:४९ आणि प्रेषित १:४. घाई करू नका.

   ७. प्रार्थना — लूक ११:१३.

   ८. हे सत्य आपले झाले आहे हे मानणे — योहान १:१२.

२. आत्म्याने भरले जाण्याचे परिणाम

   १. साक्ष देण्यासाठी सामर्थ्य — प्रेषित १:८.

   २. विजयी ख्रिस्ती जीवन जगण्यासाठी सामर्थ्य — प्रेषित २०:२२—२४.

   ३. देवाला गौरव मिळते — योहान १६:२४

निष्कर्ष : आपण साठा नाही, तर वाहक, प्रवाह आहोत. आपण तुडूंब भरून वाहिले पाहिजे. आपल्यामधून आशीर्वाद वाहिले पाहिजेत. पवित्र शास्त्रामध्ये पवित्र आत्म्याचे चित्रण

कसे केले आहे ते पाहा:

१. उपळत्या पाण्याचा झरा — योहान ४:१४.

२. वाहत्या पाण्याची नदी — योहान ७:३७—३९.

३. झाडातील विपुल जीवनरस — रोम ८:११.

४. भरून वाहणारे पाणी — इफिस ५:१८.

चर्चा : तुमच्या वर्गातील काही जणांना आपण आत्म्याने भरलो नाहीत, हे समजले असेल. आता कबुलीसाठी व प्रार्थनेसाठी वेळ दिला तर आशीर्वादाचे ठरेल.

## पाठ ३ : सैतानाला प्रतिकार करणे — १ पेत्र ५:८,९

देवाच्या खऱ्या मुलांवर सैतान हल्ले करत असतो, हे आपण कधीही विसरू नये सैतानाच्या हल्यांना प्रभावी रीतीने परतवून लावण्याचे काही मार्ग व उपाय आपल्याला या पाठाद्वारे समजतील.

१. सैतान ख्रिस्ती व्यक्तिवर कसे हल्ले करतो? २ करिंथ २:११

१. तो आपल्याला आळशी करतो.

२. कामाच्या रगाड्याखाली तो आपल्याला दाबून टाकतो.

३. लहरीपणा, दिवास्वप्ने इ. नी तो आपणास फार त्रास देतो.

४. आपल्या भावना दुखावल्या जाऊन आपण भावनाविवश होतो.

५. टीकेने आपण चिडतो, निराश होतो. टीका सहन करायला आपण तयार नसतो.

६. निराशा.

७. आध्यात्मिक गर्वाचा मोह.

२. सैतानाला प्रतिकार कसा करावा?

१. आलेली समस्या म्हणजे सैतानाने केलेला हल्ला आहे, हे समजून घ्या — याकोब ४:७.

२. तरवार उपसून सैतानाचा प्रतिकार करा, त्याच्याविरुद्ध लढा — इफिस ६:११

३. इफिस ६:१०—१८ मध्ये सांगितलेली शस्त्रसामग्री धारण करा.

४. ख्रिस्ताला परिधान करा — रोम १३:१४.

५. वचनाचा वापर करा — मत्तय ४:४, ७ आणि १०

६. "मी पाप करणार नाही, माझ्यामध्ये वास करणाऱ्या ख्रिस्ताच्या सामर्थ्याने मी पापावर विजय मिळवीन," असे म्हणून आपल्या इच्छाशक्तिचा वापर करा.

७. प्रार्थना करा — इफिस ६:१८

८. ख्रिस्ताच्या रक्ताने आच्छादले जावे म्हणून विनंती करा — "त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे .... जिंकले" (प्रकटीकरण १२:११).

चर्चा : सैतानाच्या हल्ल्याचे तुम्हांला कोणते अनुभव आले? कोणत्या पद्धतीने तुम्ही त्यांचा प्रभावीपणे सामना केला.

## पाठ ४ : देवाची इच्छा कशी समजून घ्यावी

देवाची इच्छा कशी समजून घ्यावी, हा प्रश्न आज प्रत्येक विश्वासणाऱ्याला पडतो. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार, कलाकौशल्यानुसार, आवश्यकतेनुसार आणि परिस्थितीनुसार देवाची प्रत्येकासाठी निश्चित अशी योजना आहे — इफिस २:१०.

देवाची तुमच्यासाठी असलेली योजना खास तुमच्यासाठीच आहे — स्तोत्र ३२:८.

ती निश्चित स्वरूपाची आहे — यशाया ३०:२१.

आपल्या बाबतीत त्याची काय योजना आहे हे आपण त्याला विचारावे (स्तोत्र १४३:८) आणि रोजच्या मार्गदर्शनासाठी पुष्कळ प्रार्थना करावी अशी त्याची इच्छा आहे.

प्रत्येक विश्वासणाऱ्यासाठी त्याची योजना परिपूर्ण, चांगली आणि स्वीकारण्यास योग्य अशी असते (रोम १२:२).

१. देवाच्या योजनेत खालील गोष्टींचा नेहमी समावेश असतो:
   १. पापांपासून वेगळे होऊन पवित्र जीवनात येणे — १ थेस्सल. ४:३.
   २. प्रार्थना आणि उपकारस्तुती — १ थेस्सल. ५:१७, १८.
   ३. सत्कृत्ये करणे — १ पेत्र २:१५
२. मार्गदर्शनाच्या पद्धती
   १. परमेश्वर बहुतेक वेळा वचनाच्याद्वारे मार्गदर्शन करतो. तुम्ही आपणास देवाच्या वचनाने ओतप्रोत भरा. देवाची इच्छा पवित्र शास्त्राच्या विरोधात कधीही नसते.
   २. अंतःकरणात मिळणारी खात्री जी पवित्र आत्मा देतो — रोम ८:१६; प्रेषित १३:२; योहान १६:१३.
   ३. परिस्थितीद्वारे देव एक दार बंद करतो, तर दुसरे उघडतो. देवाच्या मुलांच्या जीवनात कुठलीही गोष्ट अपघाताने घडत नाही.
   ४. कधीकधी गिदोनाने देवाला लोकर ठेवण्याद्वारे विचारले त्याप्रमाणे चिन्ह मागून (शास्ते ६:३७—३९). पण खबरदारी घ्यावी की आपल्या इच्छेनुसार उत्तर मिळण्यासाठी परिस्थिती जुळवून आणण्याचा प्रयत्न करू नये.
३. मार्गदर्शन मिळवण्याची जॉर्ज म्युलरची पद्धत:
   १. तुमच्या स्वतःच्या इच्छेचे समर्पण करा. तुमची विशिष्ट अशी निवड असू नये. त्याबाबतीत तुम्ही अगदी पूर्णपणे अलिप्त राहा.
   २. देवाच्या वचनामधून आत्म्याचे मार्गदर्शन मिळवण्याचा प्रयत्न करा.
   ३. योग्य अशा परिस्थितीची नोंद करा.

४. मार्गदर्शनासाठी प्रार्थना करा.

५. देवाची प्रतीक्षा करा.

चर्चा : देवाच्या मार्गदर्शनाचा तुम्हांला निश्चित असा अनुभव आहे का? हे मार्गदर्शन देवाकडूनच आहे, हे तुम्ही कसे ठरवले?

## पाठ ५ : शांत समय

ख्रिस्ती व्यक्तिच्या विजयी जीवनाचे रहस्य म्हणजे त्या व्यक्तिचा शांत समय —प्रार्थनेचा समय. जर असा समय नसेल, तर आध्यात्मिक पराभव अटळ आहे.

१. सकाळच्या प्रसंगी प्रार्थना करण्याचे अब्राहामाचे उदाहरण:

   १. तो सकाळीच उठला. हे अगदी चांगले उदाहरण आहे.

   २. देवाला भेटण्याची त्याची विशेष जागा होती. आपली सुद्धा असावी.

   ३. तो रोज हे करीत असे, कधी कधी नव्हे.

   ४. देवाने त्याच्याशी बोलावे म्हणून तो देवासमोर उभा राहिला.

२. शांत समयासाठी आवश्यक साहित्य

   १. पवित्र शास्त्र. पवित्र शास्त्र विश्वासूपणे सुनियोजित पद्धतीने वाचा.

   २. वचनातून मिळालेले मार्गदर्शन टिपून ठेवण्यासाठी पेन व वही.

   ३. प्रार्थना, विनंत्या लिहिलेली वही. कोणत्या प्रार्थनांची उत्तरे मिळाली, हे लिहिण्यासाठी त्यात जागा असावी.

३. शांत समयासाठी योजना

   १. रोज एका ठराविक वेळीच प्रार्थनामनन करा.

   २. एक सुनिश्चित असे वेळापत्रक आखा. बहुधा अर्धा वेळ शास्त्रवाचनासाठी व अर्धा वेळ प्रार्थनेसाठी निश्चित करा.

   ३. या बाबतीत अगदीच अपरिवर्तनीय असू नका. देव जर अधिक प्रार्थनेसाठी सुचवत असेल, तर जास्त वेळ प्रार्थना करीत राहा. जर वचनातून नवीन प्रकाश पडत असेल, नवे सत्य समजत असेल, तर वचन वाचत राहा व आत्म्याने, वचनाने भरत राहा.

   ४. छोटीशी प्रार्थना, बाइबल वाचन आणि नंतर प्रार्थना हा क्रम सर्वसाधारणपणे योग्य ठरतो. प्रार्थना व विनंत्यासाठी देवाच्या वचनाचा आधार घ्या.

## पाठ ६ : दूरीकरण (वेगळे होणे) — १ योहान २:१५

“जगावर . . . प्रीति करू नका.” या ठिकाणी “जग” म्हणजे काय? पुढच्याच वचनात

याचे स्पष्टीकरण केले आहे: जग म्हणजे सैतानाचे आधिपत्य असलेली हल्लीची जगातील व्यवस्था.

१. आपणांस माहीत असलेल्या काही वाईट गोष्टी:
   १. विश्वासणारी व्यक्ति व अविश्वासणाऱ्यात विवाहसंबंध जोडण्याची मनाई आहे — २ करिंथ ६:१४–१७; आमोस ३:३.
   २. अधार्मिकतेची व अंधाराची सर्व कृत्ये — २ करिंथ ६:१४. यामध्ये कदाचित् व्यावसायिक भागीदारीसुद्धा येते.
   ३. बलियार, जुना सैतान, व धर्मनिंदक — २ करिंथ ६:१५.
   ४. मूर्ती, देवता — २ करिंथ ६:१६.
   ५. खोटे शिक्षक — १तीमथ्य ६:५.
   ६. पापाचे व अनैतिकतेचे (दारु पिणे इ.) सर्व प्रकार — १ पेत्र १:१६.
२. मूलभूत नियम:
   १. देवावरील माझा विश्वास डळमळीत करणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून मी वेगळे झाले पाहिजे.
   २. माझी साक्ष खराब करणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून मी वेगळे झोले पाहिजे.
   ३. माझे नीतीमत्त्व बिघडवून मला पापात पाडू पाहणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून मी वेगळे झाले पाहिजे.
   ४. जर माझ्या एखाद्या कृतीने माझा भाऊ अडखळवला जातो, तर ती कृती मी करू नये — १ करिंथ ८:१३.
   ५. माझ्या शरीरास नुकसान पोहंचवणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक अशा सर्व गोष्टींपासून मी वेगळे झाले पाहिजे.
   ६. माझ्या कृतीमुळे येशू ख्रिस्त संतुष्ट होईल का? जर तो हे करणार नाही, तर मी सुद्धा तसे करू नये.
   ७. यामुळे माझी साक्ष चांगली राहील का? किंवा कमजोर होईल? — २ करिंथ ६:१७.

चर्चा : पापमय सवयी, प्रथा यांपासून वेगळे होताना तुम्हाला काही अडचण आली का? अद्यापही काही विरोधी गोष्टी आहेत का? त्या तुम्ही कशा काढून टाकाल?

## पाठ ७ : पुढाऱ्याचे वैयत्तिकक जीवन

मंडळीच्या पुढाऱ्याचे वैयक्तिक जीवन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण लोक रविवारी उपदेश ऐकतात व नंतर आठवडाभर त्या उपदेशाची परिपूर्ती कशी होते, याचे निरीक्षण करतात.

तीमथ्याला — तरुण उपदेशकाला – लिहिलेल्या पत्रात पौल वारंवार पवित्र व शुद्ध

जीवनावर जोर देतो. जर उपदेशक स्वतःच्या उपदेशाप्रमाणे वागत नसेल, तर लोकांच्या ते लगेच लक्षात येते.

१. मंडळीचा पुढारी हा धार्मिक असावा. त्याच्यामधून लोकांना येशू ख्रिस्त दिसायला हवा.
२. त्याचे संबंध त्याच्या पत्नीशी व कुटुंबाशी अतिशय आदर्श असे असावेत. या बाबतीत त्याने मंडळीसमोर उदाहरण म्हणून वागावे.
३. तो प्रार्थनाशील मनुष्य असावा. त्याने दिवसातील बराच वेळ — बरेच तास — प्रार्थनेत व्यतीत करावेत, अशी त्याच्या मंडळीची इच्छा असते. स्वतःचे पावित्र्य टिकवण्यासाठी त्याने हे करावे. देवाच्या माणासावर सैतान खूप हल्ले करून अनेक मोह आणतो. आपली सर्व अशुद्धता निघेपर्यंत त्याने देवासमोर राहावे — यशया ५२:११.
   त्याने मंडळीसाठी प्रार्थना करावी — १ शमुवेल १२:२३; कलस्सै १:९. शक्य असेल तर त्याने मंडळीतील प्रत्येक व्यक्तिसाठी नावासह प्रार्थना करावी.
४. नाशाकडे जाणाऱ्या हरवलेल्या लोकांसाठी त्याला कळवळा असावा — प्रेषित २०:३१.

"परमेश्वराची पात्रें वाहणाऱ्यांनों, तुम्ही आपणास शुद्ध करा" (यशया ५२:११)

चर्चा : तुम्ही ज्यांना आदर्श समजता, अशा काही ख्रिस्ती नेत्यांची नावे सांगा. त्यांच्यामधील विशेष गुण कोणते?

## पाठ ८ : आंतरिक हेतू

देवाच्या सेवकाने योग्य उद्देशाने कार्य केले पाहिजे – देवाचे गौरव व्हावे हाच त्याच्या कार्याचा हेतू असावा. पौलाने पैशासाठी अथवा प्रसिद्धीसाठी सेवा केली नाही, तर माणसांना तारणाप्रत आणून त्यांना विश्वासात मुळावणे, हेच त्याचे उद्दीष्ट होते.

त्याच्या तत्पर कामाची तीव्र जरूरी आणि प्रेम त्याला कामासाठी प्रवृत्त करीत होते — १ करिंथ १:१५–१८.

लोकांनी विश्वास ठेवावा म्हणून तो खाणेपिणे देखील सोडण्यास तयार होता – १ करिंथ ९:४.

संशय टाळून अधिक आत्मे जिंकता यावते, म्हणून त्याने करिंथ येथे वेतन घेण्याचे देखील नाकारले. निरनिराळ्या प्रकारच्या लोकांमध्ये सेवा करण्यासाठी तो त्यांच्यासारखा झाला, १ करिंथ ९:१९–२३. अधिकाधिक लोकांचे तारण व्हावे म्हणून तो कुठलाही त्याग करण्यास तयार होता.

तारणाचा गौरवी संदेश, अतिशय कमी वेळ, जवळ येणारा मृत्यू आणि येशू ख्रिस्ताचे

दुसरे आगमन ह्या गोष्टी पौलाने ख्रिस्ताच्या गौरवासाठी केलेल्या सेवेचे प्रेरक होत्या — कलस्सै ३:१७; १ करिंथ १०:३१.

चर्चा : सेवेसाठी पौलाने कोणते वैयक्तिक त्याग केले? त्या गोष्टी महत्त्वाच्या होत्या, असे तुम्हांस वाटते का?

या लेखात उल्लेख केलेल्या पौलाच्या चार हेतूंविषयी तुमचे मत सांगा.

## पाठ ९ : आध्यात्मिक पुढाऱ्यासाठी आवश्यक गुण

१. तो निर्दोष असावा. त्याचे चारित्र्य चांगले असून समाजात त्याचे चांगले स्थान असावे.

२. त्याला एकच पत्नी असून, त्याचे एकच लग्न झालेले असावे — तीत १:६.

३. त्याची मुले आज्ञाधारक, शिस्तबद्ध व त्याच्या अधीन असावीत — तीत १:६. ही परीक्षा आहे. जर तो घर व्यवस्थित सांभाळू शकत असेल, तर तो मंडळीची सुद्धा व्यवस्थित काळजी घेईल.

४. त्याने आपलीच इच्छा पुढे रेटू नये. तो हुकूमशहा नसावा — तीत १:७.

५. त्याने शीघ्रकोपी असू नये. तीत १:७ राग व क्रोधाला येथे स्थान नहीं.

६. त्याने मद्यपान करू नये — तीत १:७.

७. तो हिंसाचारी नसावा — तीत १:७

८. त्याला पैशाचा लोभ नसावा — तीत १:७. हे महत्त्वाचे आहे, कारण मंडळीच्या पैशाचा त्याला लोभ नसावा.

९. तो आदरातिथ्य करणारा असावा — तीत १:८. विश्वासणाऱ्यांवर आणि अनोळखी लोकांवर त्याचे प्रेम असावे.

१०. सर्व चांगल्या, शुद्ध आणि परिपूर्ण गोष्टी त्याला प्रिय असाव्यात — तीत १:८.

चर्चा : प्रत्येक गुणविशेषाचा विचार करा आणि मंडळीच्या पुढाऱ्यामध्ये हे गुण असणे का महत्त्वाचे आहे, ते सांगा. या यादीमध्ये दुसऱ्या काही वैशिष्ट्यांची भर तुम्ही चालू शकता का?

## पाठ १० : व्यभिचार

देवाच्या सेवकाचा जीवनात पराभव व्हावा म्हणून सैतान हरप्रकारे प्रयत्न करील, आणि सेवेत सर्वोच्च ठिकाणी असलेल्या मनुष्याचे पतन घडवून आणण्यात तर त्याला फारच आनंद वाटतो. कारण अशा व्यक्तिचे फार जोरदार पतन होते एवढेच नाही, तर त्याच्यासोबत इतर अनेकांचे पतन होते. स्त्रियांबरोबर योग्य ते संबंध ठेवण्यात निष्काळजीपणा केला, म्हणून देवाचे अनेक सेवक आध्यात्मिक विजयाच्या टोकावरून पापाच्या खोल गर्तेत पडले आहेत. त्यांची सेवा बंद पडली, त्यांचे चारित्र्य डागाळले आणि ख्रिस्ताच्या मंडळीची थट्टा झाली.

देवाच्या सेवकाने मोहविरुद्ध सतत सावध राहिले पाहिजे. मोहाची प्रत्येक कळी त्याने खुडली पहिजे. एखाद्या महिलेला मार्गदर्शन करायचे असेल, किंवा तिच्यासाठी प्रार्थना करायची असेल, तर त्याने आपल्याबरोबर पत्नीला किंवा मंडळीतील एखाद्या वडिलाला न्यावे. अनैतिक वागणुकीचे सर्व मोह त्याने टाळावे.

सैतानाच्या बाणांपासून तुमचे रक्षण व्हावे म्हणून तुम्ही जास्तीत जास्त प्रार्थना केली पाहिजे, त्यासोबत तुम्ही स्वतःही धोक्याच्या प्रत्येक गोष्टीपासून सावध राहावे. आपण प्रार्थनाही करावी व पहाराही द्यावा.

चर्चा : शमशोन आणि दाविद यांचा विचार करा. आणि स्त्रियांशी अनैतिक संबंध ठेवल्यामुळे त्यांची काय शोकांतिका घडली ते सांगा.

## पाठ ११ : घरामध्ये नेतृत्व

पुलपीटवरील धार्मिकता ही घरातदेखील असावी. एलीला शिक्षा मिळाली, कारण तो आपल्या दुष्ट पुत्रांना स्वतःच्या ताब्यात ठेवू शकला नाही. त्याउलट अब्राहामाचे घरकारभारातील यश पाहून देवाने त्याच्यावर मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या.

१. ख्रिस्ती पुढारी हा आदर्श पती असावा : त्याची आपल्या पत्नीवरील प्रीती पाहून, इतर स्त्रिया त्याला मोहात पाडण्यापासून परावृत्त होतील. आपली सहचारिणी म्हणून तिला वागवण्याद्वारे, ख्रिस्ताच्या मंडळीत स्त्रियांना मिळणारा मान तो दाखवून देईल.
२. आपण चांगल्या व सुसंस्कृत घरात वाढलो आहोत, हे त्याच्या मुलांनी दाखवून दिले पाहिजे : १ तीमथ्य ३:१२. ती आधारक असावीत आणि मातापित्याच्या अधीन असावीत. ज्याची मुल त्याला मान देत नाहीत, त्याला मान देणे अपरिचित लोकांनादेखील कठीण जाते.
३. अपरिचितांचे आणि विश्वासणाऱ्यांचे स्वागत पुढाऱ्याच्या घरी व्हावे — तीत १:८. घरामध्ये धार्मिक वातावरण असावे, म्हणजे येणाऱ्या पाहुण्यांना समजेल की, ख्रिस्त या घराचा प्रमुख आहे.

चर्चा : मंडळीतील इतर तरुणांच्या पुढे आदर्श होण्यासाठी, मंडळीच्या पुढाऱ्याची मुले कशाने प्रभावित होतील? त्यांचे प्रशिक्षण कधी सुरू व्हावे?

## पाठ १२ : केवळ सत्य

"तुमचे बोलणे 'होय' तर 'होय' आणि 'नाही' तर 'नाही' एवढेच असावे" — मत्तय ५:३७.

ख्रिस्ती सेवकाने "थोडेसे अर्धसत्य" वगैरे काही बोलू नये. तो सर्वस्वी विश्वसनीय

असावा. लबाडी, फसवणुकीविषयी परमेश्वराने अत्यंत कडक शब्दांत सांगितले आहे — स्तोत्र १०१:७.

१. अतिशयोक्ती — सुवार्तिक बरेच वेळा अतिशयोक्तीचे पाप करतात. सभेला खूप लोक आले होते व पुष्कळ जणांनी तारण स्वीकारण्याचा निर्णय घेतला असा अहवाल ते देतात, परंतु प्रत्यक्षात काम मात्र फारच कमी प्रमाणत झालेले असते. देवाला नव्हे, तर सुवार्तिकाला गौरव मिळावे, म्हणून असे केले जाते.

२. वचन न पाळणे — जर वचन दिले असेल, तर ते पाळलेच पाहिजे. अन्यथा ते वचन म्हणजे लबाडी होते. आणि लबाडांसाठी देवाचे आशीर्वाद नाहीत.

चर्चा : पुढील वचने वाचून त्यावर स्पष्टीकरण करा : स्तोत्र १०१:७; नीतिवचन १२:२२; १९:५; कलस्सै ३:९; प्रकटीकरण २१:८.

## पाठ १३ : आर्थिक बाबीं

जगातील सर्व लोकांपेक्षा, ख्रिस्ती सुवार्तिक हा कर्ज फेडण्याच्या बाबतीत अधिक प्रामाणिक व विश्वासू असेल, अशी साहजिकच तुमची कल्पना असेल. पण वस्तुस्थिती तशी नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. अनेक व्यापारी, व्यावसायिक लोक देवाच्या सेवकांना पैसे उधार देण्यास अथवा उधारीवर काही देण्यास तयार होत नाहीत. कारण ते देवाच्या सेवकांद्वारे फसवले गेलेले असतात. ख्रिस्ती पुढाऱ्यांनी, देवाच्या नावाला असा काळिमा आणणे ही किती दुःखद गोष्ट आहे.

या बाबतीत पौलाने स्पष्ट इशारा दिला : “एकमेकांवर प्रीती करण्याव्यतिरिक्त कोणाच्या ऋणात राहू नका,” (रोम १३:८). वैयक्तिक अर्थव्यवहार करताना आणि मंडळीच्यापैशांच्या व्यवहाराच्या बाबतीत पुढाऱ्याने अगदी प्रामाणिक राहायला हवे, पैसे देण्याचे वचन पूर्ण केलेच पाहिजे. जर तसे केले नाही, तर सेवा अपयशी होईल व देवाच्या नावाला काळिमा लागेल.

चर्चा : रोम १२:१७ हे वचन वाचा. तुमच्या मते याचा अर्थ काय आहे? आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत अप्रमाणिक असलेले असे काही देवाचे सेवक तुम्हांला माहीत आहेत का? ख्रिस्ताच्या कार्यावर त्याचा काय परिणाम झाला?

## पाठ १४ : शिस्तबद्ध अभ्यास

तरुण सेवक तीमथ्य याला प्रेषित पौलाने “वाचन . . . ह्या कडे लक्ष दे” असा बोध केला — १ तीमथ्य ४:१३. जो देवाच्या वचनाचे शिक्षण देतो, उपदेश करतो, त्याने उपलब्ध असलेल्या सर्व अभ्यासविषयक साहित्यांचा उपयोग करून वचनाचा जास्तीत जास्त अभ्यास करावा. महत्त्वाची सूचना लक्षात घ्या : *प्रत्येक वेळी तुमचा उपदेश ऐकतांना लोकांना*

*काही नवीन गोष्टी शिकायला मिळाव्यात.*

पवित्र शास्त्राचे भाष्यग्रंथ आणि टीपा, स्पष्टीकरण असलेल्या पवित्र शास्त्रांचा—स्टडी बायबलचा—भरपूरपणे वापर करावा. तसेच देवाच्या निरनिराळया लोकांनी लिहिलेल्या पुस्तकांचाही वापर करावा. “भरपूर वाचनाने मनुष्य पूर्ण होतो.”

चर्चा : देवाच्या वचनाचा अधिक अभ्यास करण्यासाठी तुम्ही अलीकडे काय वाचले आहे? त्यातील काही मुद्दे सांगा.

## पाठ १५ : तुमचे शरीर सुदृढ राखा

शरीर हे देवाचे मंदिर आहे, आणि त्याची योग्य ती काळजी घेतली पाहिजे (१ करिंथ ३:१६). संतुलित आहार घ्या. प्रमाणापेक्षा जास्त खाऊ नका. लवकर झोपा आणि लवकर उठा. रोज थोडा व्यायाम करा.

आरोग्यविषयक चांगल्या सवयीमुळे तुम्हांला देवाची सेवा करायला जास्त वर्षें मिळतील. साधी राहणी आणि उच्च विचारसारणी हे तुमचे ध्येय असावे.

चर्चा : शारीरिक तंदुरूस्ती राखतील असे काही व्याायामप्रकार करून दाखवा. आरोग्यावर प्रभाव करणाऱ्या इतर काही गोष्टी सांगा.

## पाठ १६ : आळस

“आमची अशी इच्छा आहे की . . . तुम्ही आळशी होऊ नये,” इब्री ६:१२, हे लिहिण्यामागे पौलाचे आपले काही कारण होते. ख्रिस्ती सेवक प्रामाणिकपणे किती तास काम करतो, यावर देखरेख करणारा कोणी नसतो. तो पुलपीटवर जातो आणि त्याने अनेक वेळा दिलेल्या संदेशांची पुनरावृत्ती करतो. त्याच्या उपदेशामध्ये बहुधा सामर्थ्य नसते, कारण त्याने प्रार्थनेत फार कमी वेळ घालवलेला असतो. त्याच्या मंडळीतील लोकांना वाटते की, आपल्याला मेंढपाळच नाही, कारण तो भेटीगाठी, सल्लामसलत व मार्गदर्शन इ. करत नाही.

हंगामाचा काळ थोडाच असतो आणि “हंगामाच्या वेळी जो झोपेत गुंग असतो, त्याचे ते वागणे लज्जास्पद होय” (नीति १०:५). “तुम्ही आता झोपेतून जागे होण्याची वेळ आली आहे” (रोम. १३:११). तुम्ही ख्रिस्ताचे सेवक आहात, एका महान कार्यासाठी तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे आणि गौरवी कार्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. सकाळी लवकर उठा, प्रार्थना आणि भक्तीचे वेळापत्रक कटाक्षाने पाळा, म्हणजे प्रत्येक तास हा कारणी लागेल. “हे निद्रिस्ता, जागा हो!” (इफिस ५:१४).

चर्चा : सुवार्तिकाला आळशी बनवण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरते? तुम्हांला आळशी सुवार्तिक ठाऊक आहेत का? त्यांची मंडळी त्यांचा आदर करते का?

## पाठ १७ : स्तुती

आध्यात्मिक निराशेच्या, अंधाराच्या परिस्थितीतून तुम्ही जात आहात का? रानातील थकव्याचा अनुभव तुम्हांला आला आहे का? तुमच्या डोक्यावर कसले तरी ओझे आहे का?

निराशा आणि आध्यात्मिक पराभवाच्या अंधकाराचा बोगदा नष्ट करण्याची किल्ली म्हणजे स्तुती. स्तुती हे तुमचे औषध आहे. त्यामुळे तुमच्या शरीरात, आत्म्यात व मनात चमत्कार घडेल (नीतिवचन १५:१३; १७:२२). स्तुती! आपल्या परिस्थितीकरिता देवाला व दुसऱ्यांना दोष देण्यात वेळ व्यर्थ घालवू नका. तुमच्या परिस्थितीपासून तुमची दृष्टी फिरवा व ती देवावर स्थिर करा. तुमच्या जखमा आणि वेदना विसरा. तुमच्या समस्यांचे रूपांतर स्तुतीमध्ये करण्याची वेळ आलेली आहे. अगदी कठीण प्रसंगीसुद्धा ज्याची स्तुती करावी असा एकमेव देव आहे हे जगाला सांगा.

कधी–कधी स्तुती करणे सोपे नसते. तुमच्या विनंत्या, तक्रारी विसरा आणि स्तोत्र १०३ किंवा दाविदाचे दुसरे कोणतेही स्तुतीविषयक स्तोत्र वाचा. आराधना करून देवाची स्तुती करण्याकडे आपले लक्ष लावा.

पुन्हाही सांगतो, आनंद करा.

चर्चा : २ इतिहास २०:२२ हे वचन वाचा आणि स्तुतीचा काय परिणाम झाला, ते लक्षात घ्या. स्तोत्र संहितेचे पुस्तक चाळा आणि देवाची स्तुती करण्याविषयीचे अनेक हुकूम लक्षात घ्या.

## पाठ १८ : जेव्हां मोह येतात

देवाच्या सेवकावर मोह येतील; त्यांच्याविरुद्ध बचाव करणे ही त्याची जबाबदारी आहे. पाप करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याची इच्छा तुमच्या मनात निर्माण होते, तेव्हा पवित्र आत्म्याने खालील वचनांची आठवण देऊन तुम्हांला पापापासून मागे रेटावे:

१. देवाचा विचार करा — उत्पत्ती ३९:९; १ शमुवेल २:२२–२५; याकोब ४:४.
२. तुमचा स्वतःचा विचार करा — १ करिंथ ६:१८; नीतिवचन ६:३२.
३. तुमच्या जीवनसाथीचा विचार करा — मलाखी २:१४–१६.
४. पापातील तुमच्या सहकाऱ्यांचा विचार करा — मत्तय १८:६.
५. मुलांचा विचार करा — गणना १४:३३.
६. कुटुंबाचा विचार करा — उत्पत्ति १२:१७, १०:१८.
७. त्यानंतर होणारी लज्जा आणि पस्ताव्याचा विचार करा — नीति. ५:११–१४; ६:३२,३३
८. मंडळीचा विचार करा — १ करिंथ ५:१–६; १ शमुवेल २:२४.
९. विधर्मी लोकांचा विचार करा — रोम २:२२–२४.

१०. शुभवर्तमानाच्या शत्रुंचा विचार करा — २ शमुवेल १२:१३, १४.
११. तुमच्या सेवेचा विचार करा — शास्ते १६:१९,२०; १ करिंथ ९:२७.
१२. देवाच्या न्यायाचा विचार करा — इब्री १३:४; यहेज्केल १६:३८.
१३. सार्वकालिक जीवनाचा विचार करा — गलती ५:१९—२१.
१४. सरतेशेवटी, तुम्ही जर विजयी झाला, तर तुम्हांला मिळणाऱ्या महान गौरवाचा विचार करा — प्रकटीकरण १४:४.

चर्चा : वरीलपैकी कोणते कारण तुमच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे? का?

## पाठ १९ : अनुकरण करणारे

आपल्याला आवडो अथवा न आवडो, पण पुलपीटवर उभ्या राहणाऱ्या माणसाचे अनुकरण करण्याचा लोक प्रयत्न करतात. त्याच्या चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही गोष्टींचे अनुकरण केले जाते. इफिस ५:१ मध्ये पौल म्हणतो, देवाचे अनुकरण करणारे व्हा. आणि जर हा सल्ला ऐकला, तर अपयशाची अजिबात भीती नाही. पण मानवाला नेत्याचे, पुढाऱ्याचे अनुकरण करावेसे वाटते. म्हणून आपल्या लोकांसमोर योग्य ते उदाहरण ठेवण्याची जबाबदारी आध्यात्मिक पुढाऱ्यावर आहे.

जर तो, देवाबरोबरील आपल्या सहभागितेची अतिशय काळजी घेणारा मनुष्य असेल, तर त्याच्या धार्मिकतेच्या मार्गाचे अनेकजण अनुकरण करतील. पण जर तो पापाशी व ख्रिस्ती शिस्तेच्या बाबतीत थोडीफार तडजोड करणारा असेल, तर त्याची मंडळी पापात अधिकच खोल जाईल. हरवलेल्या आत्म्यांविषयी त्याला कळवळा असेल आणि त्यांना तारणात आणण्यासाठी त्याला कळवळा असेल, तर त्याला काही स्वयंसेवक मिळू शकतील व तो त्यांना साक्ष देण्याच्या बाबतीत प्रशिक्षण देऊ शकेल. पण हरवलेल्या आत्म्यांकडे जाण्याच्या बाबतीत तो निष्काळजी असेल, तर त्याची मंडळीदेखील फक्त रविवारीच भक्तीला येणाऱ्या लोकांचा भरणा होऊ शकेल. ते फक्त वचन ऐकणारे, पण आचरणात न आणणारे होतील. जर तो त्याग करणारा, देवाला देणारा असेल, तर त्याच्या मंडळीतील लोकही देवाला देऊ लागतील व त्यातील आनंद उपभोगू शकतील.

पौलाने थेस्सलनीका येथील लोकांचे कौतुक केले की, “तुम्ही आमचे व प्रभूचे अनुकरण करणारे झालां” (१ थेस्सल १:६). त्याने निष्कलंक जीवन जगण्याचा निश्चय केला आणि म्हणाला की, “माझे अनुकरण करणारे व्हा” (१ करिंथ ४:१६).

चर्चा : तुमच्या उदाहरणाद्वारे कसल्या प्रकारचे ख्रिस्ती लोक तयार होतील?

## पाठ २० : विजय नक्कीच मिळेल

फिलिप्पै. ३ व ४ हे अध्याय वाचा.

देवाच्या अनेक सेवकांना हीनगंडाच्या भावनेने पछाडलेले असते जे त्यांना आतच आत कुतरडते व त्यामुळे ते क्रियाहीन बनतात. आपण देवाचे सेवक आहोत, अशी स्वतःची ओळख करून देण्यास त्यांना भीती वाटते, पण देव त्यांना "परात्पर देवाचे सेवक" (दानीएल ३:२६) असे समजतो. देवाची सेवा करताना पौलाचा हाच दृष्टीकोन होता (१ तीमथ्य १:११, १२).

देवाने आपल्याला सामर्थ्याचा आत्मा दिला आहे. प्रेषित १:८ मध्ये सामर्थ्यासाठी जो ग्रीक शब्द वापरला आहे तो 'स्फोटक' हा आहे. दैवी सामर्थ्याविरूद्ध दुसरी कुठलीही ताकद टिकू शकत नाही.

देवाने तुम्हाला दिलले सामर्थ्य कमी लेखू नका. अशक्य गोष्टी करण्याचा प्रयत्न करा. शक्य त्या सर्व जागेत जा. श्रीमंत माणसांना किंवा उच्चशिक्षित माणसांना तुम्ही सुवार्ता सांगू शकत नाही असे समजू नका.

"छोट्या" पौलाने अनेक महत्कृत्ये केली, कारण त्याचा देवाच्या सामर्थ्यावर विश्वास होता. ते सामर्थ्य लक्षात घेऊन कामाला लागा, तुमच्याद्वारे देवाला आपले सामर्थ्य दाखविण्याची संधी द्या.

देवाला **तुमची** गरज आहे.

चर्चा : खालील वचने वाचा आणि कोणत्या कमजोर गोष्टींचा वापर करून देवाने आपले सामर्थ्य प्रगट केले व महान चमत्कार केले ते लक्षात घ्या:

निर्गम ४:२; शास्ते १५:१५; १ शमुवेल १७:४०;

जखऱ्या ४:१०; मत्तय १३:३२; योहान ६:९.

१ करिंथ. १:२७—२९ मध्ये एक महान सत्य आढळते. ही वचने पाठ करा.

# ६ डिनॉमिनेशसंबंधी अभ्यास

प्रत्येक डिनॉमिनेशनची काही विशिष्ट तत्त्वे आणि वैशिष्ट्ये असतात. हा अभ्यासक्रम सर्व मंडळयांसाठी असल्यामुळे सर्व डिनॉमिनेशनची माहिती या लिखित पाठामध्ये देणे अशक्य आहे. तरी देखील आपापल्या डिनॉमिनेशनचा इतिहास व वैशिष्ट्ये सांण्यासाठी शिक्षक खालील मार्गदर्शक मुद्द्यांचा वापर करू शकतील.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ख्रिस्ती सेवकाला आपल्या डिनॉमिनेशनच्या आपल्या सेवाक्षेत्राविषयी व सेवाकार्याविषयी पुरेशी माहिती मिळायला हवी आणि अदीक्षित सेवक म्हणून सहजपणे सेवाकार्य सुरू करता आले पाहिजे.

पाठ 1: आपल्या डिनॉमिनेशनचा विदेशामधला इतिहास. इतर डिनॉमिनेशनमध्ये असणारे त्याचे मूळ; त्याचे संस्थापक आणि त्याचे आद्य पुढारी, त्याच्या स्थापनेमागची कारणे.

पाठ 2: डिनॉमिनेशनचा भारतामधील इतिहास. कोणत्या राज्यांमध्ये त्याचे कार्य चालू आहे, प्रत्येक राज्यातील मंडळीचा आकार आणि निरनिराळया मंडळयांचे पुढारी.

पाठ 3,4,5, आपल्या डिनॉमिनेशनचे वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत. इतर डिनॉमिनेशनपेक्षा ते निराळे कसे आहेत? विशेष सेवा आणि या भिन्नतेसाठी पवित्र शास्त्राचा आधार.

पाठ 6: डिनॉमिनेशनची राष्ट्रीय संस्था, त्याचे मुख्य कार्यालय आणि अधिकारी. अधिकाऱ्यांच्या कार्याचा कालावधी आणि त्यांच्या निवडीची पद्धत.

पाठ 7: डिनॉमिनेशनच्या शाळा आणि दवाखाने, त्यांचे विभाग प्रमुख, त्यांच्या वार्षिक किंवा राष्ट्रीय सभा.

पाठ 8: डिनॉमिनेशनचे जिल्हा कार्यालय आणि जिल्ह्याचे अधिकारी. जिल्ह्यातील सभा आणि त्यांची कार्यक्रमपत्रिका.

पाठ 9: त्यांच्या स्थानिक शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधा. जिल्ह्यातील गावे आणि किती गावांमध्ये सुवार्तिक आहेत.

पाठ 10: नवीन सुवार्तिकांसाठी डिनॉमिनेशनची प्रशिक्षण केंद्रे.

पाठ 11: नवीन सेवकांची डिनॉमिनेशनच्या बाबतीतील जबाबदारी आणि त्यांच्याकडून अपेक्षित असलेली सेवाकार्ये.

पाठ 12: नवीन विश्वासणाऱ्यांच्या बाप्तिस्म्याविषयी डिनॉमिनेशनच्या तत्त्वाप्रमाणे तयारी.

पाठ 13: एखादा सभासद पापात पडला असेल, तर सेवकाने काय करावे? अशा समस्या हाताळण्याची डिनॉमिनेशनची पद्धत.

पाठ 14: मांत्रिक अथवा आदिवासी नेत्यांनी विरोध केल्यास सेवकांनी काय करावे?

पाठ 15: विवाहाची तयारी कशी केली जाते?

पाठ 16: मंडळीतील दानार्पण व त्या पैशांचा विनियोग.

पाठ 17: खेड्यांमध्ये उपासनामंदिरे बांधणे.

पाठ 18: आजूबाजूच्या खेड्यांमध्ये सुवार्ताप्रसार, सुवार्ताप्रसार टोळ्या.

पाठ 19: सुवार्ता प्रसार मोहिमेसाठी जिल्ह्यातील कार्यालयांचे सहकार्य व सेवकांची देवाणघेवाण.

पाठ 20: मंडळीमध्ये एखादी गंभीर समस्या निर्माण झाली तर सेवकाने मदतीसाठी व मार्गदर्शनासाठी कोणाकडे जावे?